CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat


छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. १४ मे २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ३० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## सर्व मंत्र्यांचा ताफा कमी करणार : देवेंद्र फडणवीस

तभा वृत्तसेवा

नाशिक : जागतिक तेल संकटाच्या पार्श्र्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला इंधनाचा वापर जपून करण्याचं आवाहन केलं आहे. यासाठी पंतप्रधान मोदींनी खासगी वाहनांचा वापर कमी करण्याचं आवाहन केलं आहे. त्याऐवजी मेट्रो, इलेक्ट्रिक बसचा वापर करण्याचं आवाहन केलं आहे. पंतप्रधान मोदी यांनी इलेक्ट्रिक वाहनं वापरण्याचं आवाहन केलं आहे. यासोबतच वर्क फ्रॉम होम, खाद्य तेलाचा वापार कमी करणे, विदेशात जाणं टाळावं, अशादेखील सूचना दिल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या आवाहनानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय घेतला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांचा ताफा कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. मंत्र्यांच्या ताफ्यात अनेक वाहनं असतात. पण आता इंधनाचा वापर जपून करायचं असल्याने आता ताफ्यातील गाड्या कमी करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला आहे. तसेच मंत्री असो किंवा बडा अधिकारी, त्यांच्या विदेश दौऱ्यावर तात्पुरते निर्बंध घातले जाणार असल्याची माहिती स्वत: मुख्यमंत्र्यांनी दिली आहे.



मला विरोधी पक्षांना सांगायचं आहे, ज्यावेळी जागतिक संकटाची परिस्थिती असते, त्यावेळी देशाच्या पंतप्रधानांनी काही उपाययोजना सांगितल्या त्या तुमला करता येत नसतील तर किमान थट्टा, मस्करी तरी करु नका. आज जगासमोर संकट आहे. भारतासमोर नाहीय. म्हणून आपलं परकीय चलन वाचलं पाहिजे. आपल्या इथे महागाई वाढू नये या दृष्टीने मोठ्या प्रमाणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलेल्या आहेत, प्रत्येक व्यक्तीला थोडी जीवनशैली बदलली तरी आपण देशाला मदत करु शकू. पंतप्रधान मोदींनी केलेल्या अवहानानुसार सहा महिने जरी जीवनशैली बदलली तरी दिलासा मिळेल, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. विरोधी पक्षाने कितीही थट्टा मस्करी केली, तरी वैश्र्विक संकटात आपण देशाच्या पाठिशी उभे राहिलो नाहीत तर हे योग्य होणार नाही, असं देवेंद्र फडणवीस विरोधकांना उद्देशून म्हणाले.

महाराष्ट्रातदेखील आम्ही निर्णय केलेला आहे. मुख्यमंत्र्यांसह मंत्र्यांचे ताफे हे छोटे करतोय. अधिकारी असतील किंवा मंत्री असतील, त्यांच्या विदेश यात्रांवर निर्बंध आणतोय. ज्या गोष्टींमध्ये परकीट चलन कमी होतंय त्या गोष्टींची खपत कमी कशी होईल याचा आम्ही प्रयत्न करतोय. आपल्या देशी गोष्टींना वेगवेगळ्या पद्धतीने प्रमोट करता येईल यासाठी आम्ही प्रयत्न करतोय. हे काही एका दिवसांत होणार नाही. पण आपण सर्वांनी एकत्र मिळून प्रयत्न केला तर निश्र्चितपणे आपण पूर्ण करु शकतो. देशाच्या पंतप्रधानांनी केवळ सहा महिने मागितले असतील तर ते न देणं हे अतिशय अयोग्य ठरेल, अशी भूमिका देवेंद्र फडणवीस यांनी मांडली.

मला अतिशय आनंद आहे की, नागपूर विमानतळ म्हणून एक ब्राऊनफिल्ड एअरपोर्ट नव्याने डेव्हलोप करण्याकरता मागच्या काळात महाराष्ट्र सरकारने टेंडर दिलं होतं. त्यानंतर त्याची हँडिंग ओव्हर आणि बऱ्याच प्रक्रियांकरता मंत्रिमंडळाची परवानगी हवी होती. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता दिली आहे. त्यामुळे नागपूरला अतिशय सुंदर ब्राउनफिल्ड एअरपोर्ट तयार करण्यासाठी मार्ग मोकळा झाला आहे. मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार व्यक्त करतो, अशी भावना मोदींनी व्यक्त केली.

## मुख्यमंत्री विजय यांनी जिंकला विश्वास दर्शक ठराव



वृत्तसंस्था

चेन्नई : तमिळनाडू विधानसभेत विजय थलपती सरकारने विश्र्वासदर्शक ठराव जिंकला आहे. विजय सरकारला १४४ आमदारांचा पाठिंबा मिळाला, तर प्रमुख विरोधी पक्षांनी विश्र्वासदर्शक ठरावाच्या मतदानापूर्वी सभागृहातून सभात्याग केला. यासह, टीव्हीकेच्या (ढतघ) नेतृत्वाखालील आघाडी सरकारनं विधानसभेत विश्र्वासदर्शक ठराव जिंकला.

२३४ सदस्यांच्या तमिळनाडू विधानसभेत टीव्हीके आघाडी सर्वात मोठी शक्ती म्हणून उदयास आली, परंतु स्वबळावर त्यांच्याकडे बहुमत नव्हतं. विजय यांनी काँग्रेस, सीपीआय, सीपीआय (एम), व्हीसीके, इंडियन युनियन मुस्लिम लीग (आययूएमएल) आणि काही अपक्ष व लहान पक्षांच्या पाठिंब्याने सरकार स्थापन केलं. विश्र्वासदर्शक ठरावादरम्यान, आघाडीने एकूण १४४ आमदारांचा पाठिंबा मिळवला. विधानसभेचे कामकाज सुरू झाल्यानंतर मुख्यमंत्री विजय यांनी विश्र्वासदर्शक ठराव मांडला. चर्चे दरम्यान, सत्ताधारी पक्षाच्या मित्रपक्षांनी सरकारला पाठिंबा दर्शवला, तर विरोधी पक्षांनी अनेक मुद्द्यांवरून सरकारवर टीका केली. मात्र, मतदान सुरू होण्यापूर्वीच प्रमुख विरोधी पक्षांनी सभागृहातून सभात्याग केला.

तमिळनाडू विधानसभेचे कामकाज आज सकाळी वाजता सुरू झाले. ज्यादरम्यान मुख्यमंत्री जोसेफ विजय थलपती यांनी सभागृहात बहुमत सिद्ध करण्याचा ठराव मांडला. सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये संक्षिप्त चर्चेनंतर, सरकारला बहुमत आहे की नाही हे ठरवण्यासाठी मतदान झालं. ज्येष्ठ नेते सी.व्ही.शणमुगम यांच्या नेतृत्वाखालील ३० हून अधिक एआयएडीएमके आमदारांनी सत्ताधारी सरकारला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतल्यानं राजकीय समीकरणं टीव्हीके सरकारच्या बाजूने जास्त प्रमाणात झुकली.

## प्रफुल पटेल- सुनिल तटकरे भाजपमधून लढणार: आ. रोहित पवार

तभा वृत्तसेवा

पुणे : २२ आमदार घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दिग्गज नेते सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल हे भारतीय जनता पक्षातून लढणार, असा सनसनाटी दावा राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षाचे नेते रोहित पवार यांनी केला आहे. भाजपप्रवेश कधी करायचा, हे ठरणं बाकी असल्याचं रोहित पवार म्हणाले. ते पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होते.



राष्ट्रवादीत पक्षांतर्गत वाद सुरु असतानाच, सुनेत्रा पवारांनी केंद्रीय निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात पटेल-तटकरेंची पदं वगळल्याची कारकुनी चूक काल समोर आली होती. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी रोहित पवारांनी केलेल्या दाव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

त्यांचं ठरलेलं आहे ऑलरेडी. २२ आमदारांचं ठरलं आहे. एकनाथ शिंदे यांच्याही काही आमदारांचं ठरलं आहे. ज्या गोष्टी ठरल्या आहेत, त्याबद्दल मोघम बोलून चालत नाही. जे आहे ते आहे. भाजपमधून ते लढणार आहेत. फक्त प्रक्रिया फास्ट झाली. २०२९ च्या निवडणुकांपूर्वी होणं अपेक्षित होतं. कारण आताच प्रवेश झाला, तर पुन्हा निवडणूक लागेल. असं रोहित पवार म्हणाले. भाजपसोबत जे आहेत, त्यांच्याबरोबर आम्ही जाणार नाही, पण भाजपची साथ सोडून कोणी आमच्याकडे आलं, तर त्यांना स्वीकारु, असंही रोहित पवार म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अंतर्गत लाथाळ्या थांबण्याची चिन्हे नाहीत. प्रफुल्ल पटेल यांना पदच्युत केल्याचे सोमवारी सायंकाळी उघड झाल्याने एकच खळबळ उडाली होती. त्यातच मध्यरात्री पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात कारकुनी चूक झाल्याचे स्पष्ट केले. परंतु राष्ट्रीय कार्यरकारिणीत पटेल यांना कायम ठेवले असले, तरी त्यांना पद न देणे; तसेच सुनील तटकरे यांच्याही नावासमोर राष्ट्रीय सरचिटणीस किंवा प्रदेशाध्यक्ष असे न लिहिल्याने कमालीचा गोंधळ निर्माण झाला आहे. यावरून नेत्यांमध्येही कमालीची नाराजी निर्माण झाली आहे.

## दुबईहून सोने आणणे आता महागणार

तभा वृत्तसेवा

मुंबईः दुबई हे जगभरातील एक प्रसिद्ध खरेदीचे ठिकाण आहे. हे विशेषतः उच्च-गुणवत्तेच्या आणि परवडणाऱ्या सोन्यासाठी प्रसिद्ध आहे, त्यामुळे दुबईला जाणारे भारतीय अनेकदा सोने खरेदी करून भारतात परत आणण्याच्या उद्देशाने जातात. आता हे सोपे राहणार नाही, कारण सरकारने सोने आणि चांदीवरील आयात शुल्क वाढवले आहे आणि दुबईतून सोने आणणाऱ्यांसाठी नियम अधिक कडक केले आहेत.

१३ मे २०२६ रोजी, भारत सरकारने सोन्यावरील प्रभावी आयात शुल्क ६% वरून १५% पर्यंत वाढवले आहे. यामुळे दुबईतून सोने आयात करणे लक्षणीयरीत्या महाग होईल.अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, सोन्यावर आता १०% मूलभूत सीमा शुल्क (इउऊ) आणि ५% कृषी पायाभूत सुविधा आणि विकास उपकरआकारला जाईल. स्थानिक जीएसटी जोडल्यास, प्रभावी दर १८.४५% होईल. या वाढीमुळे, भारतीय बाजारात २४-कॅरेट सोन्याच्या स्पॉट किमतीत आज प्रति १० ग्रॅम अंदाजे १३,९०० ची लक्षणीय वाढ दिसून आली.

पूर्वी, दुबईहून निर्धारित मर्यादेपलीकडे सोने आयात करण्यासाठी कमी कर लागत असे. आता, सरकारने कर दर १५% पर्यंत वाढवला असून, त्यावर ३% जीएसटी जोडला आहे. याचा अर्थ असा की, सोन्याच्या किमतीचा एक मोठा भाग आता केवळ करांमध्येच जाईल. जर तुम्ही तुमच्या निर्धारित मर्यादेपलीकडे दुबईहून १० ग्रॅम सोने आणले, तर तुम्हाला विमानतळावर ६,५०० ते ७,५०० कर भरावा लागेल.

**डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.**
**DNS BANK (मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक)**
अर्थाला विश्वास मिळे अन् विश्वासाला अर्थ मिळे!

**नोंदणी क्र. : टी.एन.ए./बी.एन.के./१२७, दिनांक ०४ जुलै १९७०**
**नोंदणी क्र. : एम.एस.सी.एस./सी.आर./१२७५/२०१७, दिनांक २८ जुलै २०१७**
**भारतीय रिझर्व्ह बँक लायसन्स-एसीडी.एमएच.-२२७(पी) दिनांक ०९.१०.१९८०**
नोंदणीकृत कार्यालय - मधुकुंज, प्लॉट क्र.पी-५२, एम.आय.डी.सी.फेज-२, सोनारपाडा, कल्याण शिळ रोड, डोंबिवली (पूर्व)-४२१२०४

**५६व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

बँकेची ५६वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ३१ मे २०२६ रोजी सकाळी ०९.३० वा. पाटीदार भवन, कल्याण शिळ रोड, व्यंकटेश पेट्रोल पंपाच्या मागे, डोंबिवली (पूर्व) येथे खालील विषयांवर विचार व निर्णय घेण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. तरी कृपया सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील कामकाजाचे विषय -**

१. दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला वार्षिक अहवाल, लेखापरीक्षित ताळेबंद व नफा-तोटा खाते, नफ्याचे वाटप यास मंजुरी देणे तसेच वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.
२. आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीचा दोष-दुरुस्ती /अनुपालन (Compliance) अहवाल सादर करण्यात आल्याची नोंद घेणे.
३. आर्थिक वर्ष २०२६-२७ करीताच्या बँकेच्या अंदाजपत्रकास (Budget) मंजूरी देणे.
४. बँकेने सुचविलेल्या पोटनियम/उपविधी (Bye-laws) दुरुस्तीस मंजुरी देणे.
५. आर्थिक वर्ष २०२७-२८ साठी वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचे सेवाशुल्क ठरविण्यासाठीचे वार्षिक सर्वसाधारण सभेचे अधिकार संचालक मंडळास देणे.
६. दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर संचालक व त्यांच्या नातेवाईकांना (केवळ त्यांच्या स्वत:च्या मुदत ठेवींच्या तारणावर) दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
७. संचालक मंडळाने सादर केलेली बँकेची आर्थिक वर्ष २०२६-२७ ची वार्षिक योजना (Annual Operational Plan) सभेपुढे मंजुरीसाठी सादर करणे.
८. सभेस अनुपस्थित राहिलेल्या सर्व सभासदांची रजा मंजूर (condone) करणे.
९. मा. अध्यक्षांच्या परवानगीने इतर कोणतेही विषय

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**(वि. द. दीक्षित)**
**व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी**

दिनांक : १४ मे २०२६

**टीप :-**
१) गणसंख्ये अभावी सभा स्थगित झाल्यास, अशी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर म्हणजे सकाळ १०.०० वा. घेण्यात येईल. अशा सभेसाठी गणसंख्यापूर्तीचे बंधन असणार नाही.
२) सभेचे संचालन सुरळीत होण्यासाठी, दिनांक ३१ मार्च २०२६ अखेरचा वार्षिक अहवाल अथवा बँकेची प्रगती यासंदर्भात काही प्रश्न असल्यास सभासदांनी २५ मे २०२६ पूर्वी व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी स्वरुपात विचारणा करावी म्हणजे माहिती देणे शक्य होईल. तसेच या प्रश्नावर आवश्यकता वाटल्यास समर्पक चर्चा होईल. सदर लेखी विचारणा नजिकच्या शाखेत अथवा बँकेच्या केंद्रीय कार्यालयात सादर करण्यास हरकत नाही. दैनंदिन कामकाजाविषयक प्रश्न हे नोंदणीकृत कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन विचारता येतील.
३) आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या वार्षिक अहवालाची छापील प्रत दिनांक २० मे २०२६ पासून बँकेच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध असेल तसेच बँकेचे संकेतस्थळ https://dns.bank.in येथेही नोटीस दिल्याच्या तारखेपासून उपलब्ध असेल.



# आ.अर्जुनराव खोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश; जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना येथे अत्याधुनिक एमआरआय सेंटरचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची आणि दिलास-ादायक बातमी समोर आली असून, शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना येथे अत्याधुनिक चठ्ख सेंटरचे उद्घाटन आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

काही दिवसांपूर्वी मुंबई येथे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेतली होती. या बैठकीदरम्यान जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना येथे चठ्ख सेंटर उपलब्ध करून देणे, आधुनिक आरोग्य सुविधा वाढवणे तसेच नागरिकांना तातडीच्या वैद्यकीय सेवा मिळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली होती. या



बैठकीनंतर तातडीने निर्णय घेत जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना येथे आधुनिक चठ्ख मशीन मंजूर करण्यात आले. आज या चठ्ख सेंटरचा शुभारंभ करण्यात आला असून, यामुळे जालना जिल्ह्यातील रुग्णांना आता तपासणीसाठी छत्रपती संभाजीनगर, पुणे किंवा इतर शहरांकडे धाव घ्यावी लागणार नाही. कमी वेळेत आणि कमी खर्चात स्थानिक पातळीवरच अत्याधुनिक तपासणी सुविधा उपलब्ध होणार आहे. याशिवाय, जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना येथे उढ ड्लरप मशीन देखील २४ तारखेपासून सुरू करण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली. त्यामुळे जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेला मोठी बळकटी मिळणार आहे. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, जालना जिल्ह्यातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात, ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे सक्षम व्हावीत, रिक्त वैद्यकीय पदे भरली जावीत, तसेच आधुनिक वैद्यकीय यंत्रणा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. जालना जिल्ह्याच्या आरोग्य क्षेत्रासाठी हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे असून, नागरिकांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या या प्रयत्नांचे स्वागत केले आहे. या वेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब गोरे, डॉ. राजेंद्र पाटील जिल्हा शल्य चिकित्सक , डॉ.राजेंद्र गाडेकर अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक, डॉ. प्रदीप कुलकर्णी रेडिओलॉजिस्ट, डॉ.वायाळ , डॉ.मनोज जाधव, तसेच कृष्णा इमेजिंग सेंटर व्यवस्थापक व तांत्रिक अधिकारी कर्मचारी रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक उपस्थित होते.

## संक्षिप्त

### जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केली मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्त्यांची पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ता योजना अंतर्गत जिल्ह्यातील शेत व पाणंद रस्त्यांची कामे नियोजनबद्ध आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण व्हावीत, यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज जालना व घनसावंगी तालुक्यातील विविध गावांमध्ये प्रस्तावित शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. यामध्ये जालना तालुक्यातील लोंढ्याचीवाडी तसेच घनसावंगी तालुक्यातील राणी उचेंगाव, राजेगाव, वडीरामसगाव आणि बाचेगाव येथील प्रस्तावित शेत/पाणंद रस्त्यांची त्यांनी पाहणी केली. यावेळी संबंधित महसूल अधिकाऱ्यांकडून प्रस्तावित रस्त्यांची सविस्तर माहिती घेतली.

पाहणीदरम्यान रस्त्यांची उपलब्ध जागा, अतिक्रमण स्थिती, मोजणी प्रक्रिया, तांत्रिक बाबी तसेच कामांच्या अंमलबजावणीचा आढावा जिल्हाधिकारी यांनी घेतला. शेतकऱ्यांना शेतीमाल वाहतुकीसाठी बारमाही सुविधा उपलब्ध होणे, शेतीपर्यंत कृषी यंत्रसामग्री पोहोचण्यास सुलभता निर्माण होणे तसेच ग्रामीण भागातील शेती रस्ते सक्षम करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील प्रस्तावित कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिल्या. ज्या ठिकाणी अतिक्रमण अथवा अन्य तांत्रिक अडचणी आहेत, त्या तातडीने निकाली काढून कामांना गती देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. रस्त्यांच्या कामांमध्ये गुणवत्ता राखणे, मुरूम व खडी दबाई योग्य प्रकारे करणे तसेच रस्त्यांचा टिकाऊपणा सुनिश्चित करण्यावर विशेष भर द्यावा. तसेच मौजे लोंढ्याचीवाडी (ता. जालना) तसेच राणी उचेंगाव, राजेगाव, वडीरामसगाव आणि बाचेगाव (ता. घनसावंगी) येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अपूर्ण कामांचाही आढावा घेत, अपूर्ण कामांबाबत नियमानुसार कार्यवाही करून ती तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या. यावेळी उपजिल्हाधिकारी (रोहयो) श्रीमती मनीषा दांडगे, तहसीलदार घनसावंगी रमेश पागोटे, प्रभारी तहसीलदार जालना राजू निहाळ, नायब तहसीलदार शैलेश राजमाने, नायब तहसीलदार (रोहयो) डॉ. नीलम लुणावत, कार्यक्रम व्यवस्थापक सतीश देवढे यांच्यासह संबंधित गावांचे तलाठी व ग्रामरोजगार सहाय्यक उपस्थित होते.

### आष्टीत 'स्वाभिमानी दिनी' शाही विवाह सोहळा; पुस्तक भेट देऊन सामाजिक बांधिलकी जोपासली



**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

परतुर तालुक्यातील आष्टी गावात १० मे या 'स्वाभिमानी दिना'चे औचित्य साधून आष्टी (जि.जालना) येथे एका आगळ्यावेगळ्या विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. चळवळीतील खंदे कार्यकर्ते सौंदर्य नाना यांचे चिरंजीव आयु. महेंद्र यांचा शुभविवाह मोठ्या उत्साहात पार पडला.या सोहळ्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे, यात केवळ विवाह विधीच नव्हे, तर सामाजिक विचारांचा जागरही पाहायला मिळाला. या मंगल परिणय सोहळ्याचे औचित्य साधून सौंदर्य परिवाराच्या वतीने वंचित बहुजन आघाडीचे नेते आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांचा वाढदिवस अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे, नवदाम्पत्य वधू आणि वर यांच्या हस्ते केक कापून साहेबांना शुभेच्छा देण्यात आल्या. विवाह सोहळ्यात राजकीय नेतृत्वाचा वाढदिवस साजरा करून कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्याप्रती असलेली निष्ठा व्यक्त केली. केवळ सत्कार आणि हार-तुरे न थांबता, वैचारिक प्रबोधन करण्याच्या उद्देशाने सौंदर्य नाना यांनी उपस्थित मान्यवरांना शिवाजी कोण होता हे प्रबोधनात्मक पुस्तक भेट स्वरूपात दिले. लग्नासारख्या कौटुंबिक सोहळ्यात ज्ञानाची भेट देऊन त्यांनी समाजासमोर एक नवा आदर्श ठेवला आहे.या सोहळ्याला जालना जिल्ह्यातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष रामप्रसाद थोरात सर, वंचित चे जेष्ठ नेते माणिकरावजी करवंजे,साहित्यिक डॉ.ऋषिकेश कांबळे,रमेशभाई खंडागले,गणेश वैद्य,प्रकाश म्हस्के,फरीद शेख शाकेर मणियार,राजू शेख,शेख जमीर भाई, प्रा. मोहन सौंदर्य ,शिवाजी डोळस,अंकुशराव जाधव, धम्मानंद साळवे,बाबासाहेब गालफाडे,समाधान तोडके,हनुमंत दांडे,गणेश वैद्य बाबासाहेब शिंदे, मोरे यांसह अनेक कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांनी नवदाम्पत्यास उदंड आयुष्य आणि सुखी सहजीवना साठी शुभेच्छा दिल्या.या सोहळ्याची चर्चा सध्या संपूर्ण जिल्ह्यात होत आहे.

## भोकरदन येथे 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा' संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना आणि स्वातंत्र्यसेनानी पुंडलिक हरि दानवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, भोकरदन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आज उत्साहात संपन्न झाला. या रोजगार मेळाव्याला युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना येथील सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी उपस्थित उमेदवारांना रोजगाराच्या विविध संधी, कौशल्य विकासाचे महत्त्व आणि उद्योग क्षेत्रातील बदलत्या गरजांविषयी मार्गदर्शन केले. यावेळी कौशल्य विकास मार्गदर्शन अधिकारी विशाल येवले, आयटीआयचे आयएमसी समन्वयक एस. एस. नाईक तसेच आर. डी. देशपांडे शिल्पनिदेशक यांची प्रमुख उपस्थिती होती. रोजगार मेळाव्यात विविध नामांकित संस्था व कंपन्यांनी सहभाग नोंदवून उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. एकूण १०३ उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या, त्यापैकी ५५ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. यामध्ये मोर्याश्री ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, भोकरदन यांनी १९ उमेदवार, परम कोचिंग क्लासेस, भोकरदन यांनी १३ उमेदवार, अर्थक्रांती अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, जालना यांनी ३ उमेदवार, इंडियन पब्लिक स्कूल, भोकरदन यांनी ३ उमेदवार, इंडियन अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, भोकरदन यांनी ४ उमेदवार, कैवल्य इंडस्ट्रीज, भोकरदन यांनी १ उमेदवार तर क्रॉम्पटन ग्रीव्स, छत्रपती संभाजीनगर यांनी १२ उमेदवारांची निवड केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन के. एच. चौधरी यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. अमोल परिहार यांनी मानले. रोजगार मेळावा यशस्वी करण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास विभागातील अमोल बोरकर, आत्माराम दळवी, योगेश बहुरे, विशाल जगरवाल, दिपक पालवे तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, भोकरदन येथील आर. खरात, व्ही. बरोटे, एस. अक्से, एन. पाचुंदे, आर. जाधव, एम. भिवसनकर, एस. शिरसाठ, एस. वाघ, एस. देशमुख, आर. जगदाळे, बी. राऊत, जी. भवर आदी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी योग्य नियोजन केले.

## प्रशासनाच्या दिरंगाईला सतीश घाटगे यांचे सडेतोड उत्तर

### डाव्या कालव्याचे एस्केप गेट उघडून नारोळा नदीत सोडले पाणी





**तभा वृत्तसेवा**
**अंबड । प्रतिनिधी**

अबड घनसावंगी तालुक्यातील मुरमा, कंडारी, खालापुरी, पिं-परखेड, कोठी, अंतरवाली टेंभी, मुद्रेगाव आणि पाडुळी या गावांमध्ये सध्या पाण्यासाठी तीव्र हाहाकार माजला असताना भीषण पाणीटंचाईच्या स्थितीत प्रशासनाकडून जायकवाडीच्या डाव्या कालव्यातून नदीपात्रात पाणी सोडण्यास टाळाटाळ करण्यात आली. स्थानिक ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांनी वारंवार उपजिल्हाधिकारी, तह-सीलदार आणि पाटबंधारे विभागाकडे दाद मागितली. रविवारी मध्यरात्री भाजपा नेते सतीश घाटगे यांनी शेतकऱ्यांसह तीर्थपुरी येथील 'एस्केप गेट'वर धडक देऊन तीर्थपुरी एस्केप गेटचे दरवाजे उघडले आणि जायकवाडीच्या डाव्या कालव्यातील पाणी नारोळा नदीपात्रात वळवून घेतले.

प्रशासकीय स्तरावर वारंवार विनंत्या आणि अर्ज देऊनही, विशेषतः मुक्या जना-वरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी कोणतीही हालचाल न झाल्याने शेवटी शेतकऱ्यांचा संयम सुटला. रविवारी शेकडो शेतकऱ्यांनी समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन तथा भाजप नेते सतीश घाटगे यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सतीश घाटगे यांनी आक्रमक भूमिका घेतली. रविवारी मध्यरात्री सतीश घाटगे यांनी शेतकऱ्यांसह तीर्थपुरी येथील 'एस्केप गेट'वर धडक दिली. यावेळी त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन एस्केप गेटचे दरवाजे उघडले आणि जायकवाडीच्या डाव्या कालव्यातील पाणी नारोळा नदीपात्रात वळवून घेतले. सोमवारी सकाळी नदीपात्रात पाणी दाखल होताच शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असून संबंधित गावांचा पाण्याचा प्रश्न तात्पुरता सुटला आहे. जेव्हा संवेदनशील विषयावरही प्रशासन हेतुपुरस्सर दुर्लक्ष करते, तेव्हा लोकशाहीत संघर्षाशिवाय दुसरा पर्याय उरत नाही. शेतकऱ्यांच्या आणि मुक्या प्राण्यांच्या जिवाचा प्रश्न असल्याने नाईलाजाने आम्हाला ही भूमिका घ्यावी लागली, असे सतीश घाटगे यांनी यावेळी स्पष्ट केले. प्रशासनाच्या या 'कुंभकर्णी' झोपेमुळे सर्वसामान्य जनतेला अशा प्रकारे टोकाचे पाऊल उचलावे लागत असल्याचे चित्र या घटनेतून समोर आले आहे. सतीश घाटगे यांच्या या भूमिकेमुळे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असून कडक उन्हाळ्यात नदीला पाणी आल्याने शेतकरी वर्गाने आनंद व्यक्त करत सतीश घाटगे यांचे आभार मानले.

## जाफ्राबाद तालुक्यात अवैध वृक्षतोड!

**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद । प्रतिनिधी**

फार मोठ्या प्रमाणात सर्रास अवैध वृक्ष कटाई होत असून संबंधित शासकीय अधिकारी कोणतीही कार्यवाही करीत नसल्याने तस्करांना रान मोकळे झाले आहे. याबाबत माहिती अशी की, जाफ्राबाद तालुक्यातील देळेगव्हाण, निमखेड, देऊळझरी, सिपोरा, हनुमंतखेडा, डोलखेडा , वरुड, कोन्नड, चिचंखेडा, वानखेडा भारज . शिंदी, या शिवारांमधून बाभळीचे झाड, कडूनिंब व इतरही आड जातीच्या झाडाची मोठ्या प्रमाणात कटाई होत असून कटाई केलेला माल मालवाहू गाडीने बिनधास्त शहरातील काही आरामशीन वर अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने येत आहे. महसूल अधिकारी, मंडल अधिकारी, तलाठी त्याचप्रमाणे वन विभागाचे व पोलीस विभागांचे अधिकारी हे कार्यवाही करीत नसल्याची चर्चा जनतेत असून या संपूर्ण प्रकाराकडे वरिष्ठ अधिकाऱ्याची सुद्धा लक्ष नसल्याचे जनतेत बोलल्या जात आहे. झाडे कटाईच्या तस्करी धंद्यामध्ये शहरातील काही तस्करांचा सहभाग असून हे तस्कर सकाळपासून जंगलातील



माल शोधून त्याबाबतचे वृक्ष कटाई चे नियोजन आखत असतात. या तस्करांचे मधुर संबंध काही अधिकारी कर्मचाऱ्यांसोबत असल्याची चर्चा सुद्धा शहरात असून संपूर्ण तालुक्यातून वृक्ष कटाई चा माल दिवसाढवळ्या शहरात येत असताना अधिकारी कर्मचारी कार्यवाही का करत नाही असा संतप्त सवाल जनतेत केल्या जात असून महसूल प्रशासन तसेच वन विभागाच्या कर्तव्यदक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वन विभागाच्या तसेच महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शहरातील व ग्रामीण भागातील आरा मशीन वर येणाऱ्या मालाची तपासणी मोहीम सुरू करण्याची मागणी जनतेत केल्या जात आहे. त्याचप्रमाणे या गंभीर प्रकाराकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देणे गरजेचे असून अवैध झाडाच्या कटाई विरुद्ध पोलिसांनी सुद्धा कार्यवाही करण्याची गरज आहे.

जाफ्राबाद तालुक्यात सर्रास सुरू असलेल्या अवैध झाड कटाई बाबत महसूल मंडळ निहाय मंडल अधिकारी आणि तलाठ्यांनी किती कार्यवाही केल्यात याबाबत तपासणी करण्यात यावी अशी मागणी जनतेत होत आहे. अवैध वृक्षतोड करणारे गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून अनेक वेळा या तस्करावर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. शेतातील झाड तोडत असताना अनेक वेळा शेतकरी या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या तस्कराना पाहून शेतातून पळून जातात. त्यामुळे या तस्करांचे मनसुबे वाढत चालले आहे, हे तस्कर मध्य रात्री झाडांची कटाई करत असून सुर्योदय होण्यापूर्वी शहरात दाखल होतात. हे सर्व प्रकार वन विभाग, पो-लीस विभाग, महसूल विभागाशी संगनमत करून होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे वृक्षतोड तस्कर पोलीसांना दाखवण्यासाठी झाड तोडण्याचा परवाना सोबत ठेवता तर एक झाड तोडण्याची परव-ानगी आणि दिवस भर अनेक झाडे तोडून तीच परवानगी दाखवण्यात येते यात सर्व काही आलबेल असताना संबंधित विभाग कानाडोळा करुन सोडून देण्यात येते.

## पदाधिकाऱ्यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका जिंकण्यासाठी सज्ज रहावे – माजीमंत्री आ.बबनराव लोणीकर

### जनकल्याणकारी योजना जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करावे- आ.नारायण कुचे

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी कार्यकर्त्यांना न्याय देणारा व संधी देणारा पक्ष असल्याचे मत भाजपा जालना ग्रामीण जिल्हा प्रभारी खा.रामराव वडकुते यांनी आज दिनांक ११ मे २०२६ रोजी भाजपा जिल्हा जालना कार्यालयामध्ये भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्याच्या बैठकीत मार्गदर्शन करतांना केले.

यावेळी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना खा.वडकुते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्रभाई मोदीजी व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व भाजपाच्या वरीष्ठ नेत्यानी माझ्या सारख्या सामान्य भाजपाच्या कार्यकर्त्याला संधी देऊन राज्यसभा खासदार केले. भाजपाचे देशामध्ये दोन खासदार असतांना आज भाजपा देशातच नाही तर जगामध्ये नंबर एकचा पक्ष झाला आहे. त्यामुळे भाजपा पदाधिकाऱ्यांने बुथ जितेगा तो निवडणूक



जितेगी या तत्वावर बुथवर भाजपा कार्यकर्त्याची टीम सक्षम करुन मतदार यादी पुर्नरचनेसाठी शासनाने नेमून दिलेल्या बी.एल ओला सहकार्य करावे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदीजींना २०४७ ला विकसित भारत करावयाचा आहे त्यासाठी भाजपा कार्यकर्ते व भाजपा पदाधिकाऱ्यांना काम करावे व भाजपा जालना जिल्हयात क्रमांक एक चा पक्ष करण्यासाठी मेहनत घ्यावी असे आवहाण केले. यावेळी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतांना माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर म्हणाले की, खासदार रामराव वडकुते यांना भाजपाचे विचार पटल्यामुळे त्यांनी भाजपात प्रवेश केला. भाजपा पदाधिकाऱ्यांनी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती व विधानसभा व लोकसभा मध्ये भाजपा क्रमांक एक चा पक्ष करण्यासाठी कार्यकर्त्यांनी संघटीत होऊन पक्षाने दिलेले काम करावे, आज रोजी जालना जिल्हयामध्ये ७ पैकी ६ नगराध्यक्ष भाजपाचे असून जालना महानगर पालिकेचा महापौर सुध्दा भाजपाचा असल्यामुळे आता उर्वरीत स्थानिक स्व-राज्य संस्था भाजपाच्या ताब्यात घेण्यासाठी भाजपा कार्यकर्त्यांनी सज्ज राहण्याचे आवाहन माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर यांनी केले.

यावेळी भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे म्हणाले की, केंद्रात व राज्यात भारतीय जनता पार्टीचे सरकार असल्यामुळे भाजपा कार्यकर्त्यांनी सामान्य जनतेचे कामे करुन त्यांच्या पर्यंत शासनाच्या जनकल्याणरी योजना पोहचविण्याचे काम भाजपा कार्यकर्त्यानी करावे व जालना जिल्हयामध्ये भाजपा पक्ष संघटनेत व स्थानिक स्वाराज्य संस्थेमध्ये सर्व संस्था भाजपाच्या ताब्यात घेतल्याशिवाय राहणार नाही यासाठी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यानी व बुथ प्रमुखांनी पक्ष संघटन मजबुत करण्याचे आवाहन आ.कुचे यांनी केले. यावेळी माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर,भाजपा जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, मा.आ.कैलास गोरंट्याल, मा.आ.विलास बापु खरात, देविदास कुचे, बद्रीनाथ पठाडे, अनिलराव कोलते, गणेश ठाले, गोविंद ढेंबरे, अवधुत नाना खडके, संध्याताई देठे, जिजाबाई जाधव, अश्विनी पवार, केदारनाथ कुलकर्णी, विश्वजीत खरात, मुकेश चिने, ज्ञानेश्वर शेजुळ, सर्जेराव जाधव, अकुंशराव बोबडे, संपत टकले, पदमाकर जऱ्हाड, नामदेव तिडके, भगवान मात्रे, बाबासाहेब कोलते, दिपक जाधव, गजानन नागवे, संजय आटोळे, शत्रुघ्न कणसे, प्रदीप पवार, सौरभ कुलकर्णी, विक्रंम उफाड,विष्णु जाधव,राजु साळवे, सतिष निर्वळ, एकनाथ मोरे, भाऊसाहेब काकडे, शंकर लहामगे, बबनराव सिरसाठ, हरीश्चंद्र बाबा शिंदे, परीक्षीत शिंदे, भिमराव भुजंग, गणेश बावणे, विकास कदम, गणेश कोल्हे, बाबा उगले, नंदकिशोर पिंगळे, भिमराव जावळे, नंदू घोडे यांच्यासह जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...

### सिंगणापूरातील कालव्यात आढळला अनोळखी तरुणाचा मृतदेह ; घातपाताचा संशय : ओळख पटविण्याचे पोलिसांचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी :** तालुक्यातील दैठणा पोलीस ठाणे हद्दीतील मौजे सिंगणापूर शिवारात जायकवाडी डाव्या कालव्यात एका २५ ते ३० वर्ष वयोगटातील अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. याप्रकरणी दैठणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून मृताची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १० मे २०२६ रोजी सायंकाळी ५.१५ वाजण्यापूर्वी सिंगणापूर गावाजवळील प्रभाकर ढेंगळे यांच्या शेतालगत असलेल्या जायकवाडीच्या डाव्या कालव्यात एका अनोळखी पुरुषाचे सडलेल्या अवस्थेतील प्रेत आढळून आले. या प्रकरणी फिर्यादी राजेभाऊ शेषेराव रत्नपारखे यांच्या तक्रारीवरून दैठणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत पुरुषाचे वय अंदाजे २५ ते ३० वर्षे असून त्याने लाल रंगाचा डिझाईन असलेला शर्ट व निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट परिधान केली होती. प्रेताचे डावे हात व दोन्ही पाय दोरीने बांधलेल्या अवस्थेत आढळून आले. तसेच गळा, हात व कानावर खरचटल्याच्या खुणा असून जीभ व डोळे बाहेर आलेले असल्याचे पोलिसांनी सांगितले. सदर अनोळखी मृत व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी अथवा त्याच्या नातेवाईकांबाबत माहिती असल्यास नागरिकांनी तात्काळ पोनि गुन्हे शाखा विवेकानंद पाटील - ८९९९६३०९१२, सपोनि जी. जी. सोनेत (ठाणे प्रभारी अधिकारी) - ८६९८९८७४७०, पोउपनि विशाल प्रल्हाद सूर्यवंशी - ९९७५८०२८९० व पोलीस नियंत्रण कक्ष, परभणी - ७७४५८५२२२२ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### स्वच्छ सर्वेक्षण २०२६ अंतर्गत देशमुख हॉटेलजवळील कचराकुंडी बंद : महानगरपालिकेकडून जागेचे सुशोभीकरण; नागरिकांना स्वच्छतेचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी :** स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छ




सर्वेक्षण २०२६ निमित्त परभणी महानगरपालिकेच्या वतीने शहरातील प्रभाग क्रमांक ४ मधील देशमुख हॉटेलजवळ निर्माण झालेली मोठी कचराकुंडी बंद करून त्या जागेचे सुशोभीकरण करण्यात आले आहे.

महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख तसेच आयुक्त तथा प्रशासक नितीन नार्वेकर यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. उपायुक्त प्रज्ञावंत कांबळे आणि विभाग प्रमुख मिर्झा तन्वीर बेग यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने ही कारवाई केली.

सदर कचराकुंडी स्वच्छता निरीक्षक प्रल्हाद देशमाने व सफाई कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून बंद करण्यात आली. परिसर स्वच्छ व सुंदर करण्याच्या उद्देशाने त्या जागेचे सुशोभीकरणही करण्यात आले आहे. आपले शहर, वॉर्ड आणि परिसर स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. नागरिकांनी घरातील कचरा महानगरपालिकेच्या घंटागाडीतच द्यावा. सर्वांच्या सहकार्याने परभणी शहर स्वच्छ आणि सुंदर होऊ शकते, असे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

यावेळी शहर समन्वयक तुराब खान, मुख्य स्वच्छता निरीक्षक श्रीकांत कुर्रा, स्वच्छता निरीक्षक प्रल्हाद देशमाने, संबंधित प्रभागातील मुकादम व सफाई कर्मचारी उपस्थित होते.

# पावसाळ्यात आपत्तीचा सामना करताना योग्य समन्वय ठेवा - जिल्हाधिकारी चव्हाण

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचा मान्सूनपूर्व तयारी आढावा, विजेपासून बचावासाठी दामिनी ॲप डाऊनलोड करा

**परभणी ,/प्रतिनिधी:-** आगामी पावसाळ्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवून काम करावे, तसेच आपत्ती काळात मदत व पुनर्वसन कार्य तात्काळ सुरू करून नागरिकांमध्ये जनजागृती वाढवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या वतीने आयोजित मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होते. बैठकीस महापौर सय्यद इकबाल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, मनपा आयुक्त नितीन नार्वेकर, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी तसेच जिल्हा शल्य चिकित्सक नागेश लखमावार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, पोलीस, अग्निशमन दल, आरोग्य विभाग, महसूल प्रशासन तसेच संबंधित यंत्रणांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांनी जलद प्रतिसाद पथकांची तयारी, आपत्कालीन संपर्क यंत्रणा, वैद्यकीय सुविधा, पूरप्रवण भागातील उपाययोजना आणि जनजागृती मोहिमांवर विशेष भर देण्याच्या सूचना दिल्या. संभाव्य पूरस्थिती, वीज गळती, आरोग्यविषयक आपत्ती आणि आपत्कालीन सेवांच्या कार्यक्षमतेबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रत्येक विभागाने आपआपल्या जबाबदाऱ्या निश्चित करून तातडीच्या उपाययोजना राबविण्याचे निर्देश देण्यात आले. जिल्ह्यातील गोदावरी, पूर्णा, दुधना, करपरा, मासोळी तसेच इतर लहान-मोठ्या नद्यांमुळे काही गावांना पुराचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सर्व यंत्रणांनी दक्ष राहून मान्सूनपूर्व कामे वेळेत पूर्ण करावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यातील आपत्ती पूरप्रवण गावात २४ तास नियंत्रण कक्ष कार्यरत ठेवणे, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे संपर्क क्रमांक अद्ययावत ठेवणे आणि आवश्यक साहित्यांची तपासणी करण्याचे आदेश दिले. आरोग्य विभागाने ग्रामीण भागात जलजन्य आजारांवरील उपचार प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध करून द्यावेत. औषधसाठा, रक्तसाठा आणि अन्य आवश्यक साहित्य मुबलक प्रमाणात ठेवण्यासोबतच साथीच्या रोगांवर नियंत्रणासाठी विशेष दक्षता घेण्याचे निर्देशही देण्यात आले. मुबलक ब्लिचिंग पावडरचा सुरक्षित वापर आणि साठवणूक करण्यावरही भर देण्यात आला. बैठकीत एल-निनोच्या प्रभावामुळे यंदाच्या पावसाच्या अनिश्चिततेबाबत माहिती देण्यात आली. जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी दामिनी ॲप डाऊनलोड करावे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या प्रतिनिधींनी बदलत्या हवामान परिस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांना अद्ययावत माहिती देण्यात येणार असल्याचे सांगितले.



तालुकास्तरावरही संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने आपत्तकालीन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

अशा सूचना जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी दिल्या. नागरिकांनी विशेषतः शेतकरी आणि शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दामिनी ॲपसह आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित मोबाईल ॲप डाऊनलोड करून सज्ज राहावे, असे आवाहनही करण्यात आले. धरणांची दुरुस्ती, पूर रेषा क्षेत्रातील बांधकामांवर नियंत्रण, शहरातील नाल्यांची स्वच्छता आणि धोकादायक इमारतींची पाहणी करून आवश्यक कारवाई करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. पूरपरिस्थिती निर्माण झाल्यास नदीकाठच्या नागरिकांचे स्थलांतर करण्यासाठी पर्यायी सुरक्षित स्थळांची व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले. महावितरण, शिक्षण, पशुसंवर्धन, कृषि विभागांनीही आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात, असे जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी जिल्हास्तरीय यंत्रणेला निर्देश देण्यात आले. पाटबंधारे विभागाने धरणनिहाय समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती करून नदीपात्रातील पाणीपातळी व धोक्याच्या इशारा पातळीबाबत सर्व विभागांशी समन्वय ठेवावा, असे निर्देश देण्यात आले. नगरपालिका प्रशासनाने शहरातील नाल्यांची साफसफाई युद्धपातळीवर करण्यास सांगितले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी सादरीकरणाद्वारे विभागनिहाय कार्यवाहीची माहिती दिली. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पवन खांडके यांनी आभार मानले.

### कर्जाच्या विवंचनेतून तरुण शेतकऱ्याची आत्महत्या : धानोरा काळे येथील घटना; ताडकळस पोलिसांत नोंद

**परभणी,/प्रतिनिधी :** शेतीतील नापिकी आणि बँकेचे कर्ज कसे फेडावे, या आर्थिक विवंचनेतून एका ३० वर्षीय तरुण शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना पूर्णा तालुक्यातील धानोरा काळे येथे घडली आहे. या प्रकरणी ताडकळस पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

रामेश्वर किशनराव काळे (वय ३०) असे मयत शेतकऱ्यचे नाव आहे. काळे यांनी कर्जाच्या वाढत्या तणावामुळे आपल्या राहत्या घरी लोखंडी पाइपला दोरीच्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली. या घटनेची माहिती परमेश्वर काळे यांनी पोलिसांना दिली. या घटनेबाबत ताडकळस पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पुढील तपास ताडकळस पोलिसांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## गुरुवारी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सार्वजनिक जयंती महोत्सव

**परभणी,/प्रतिनिधी:** संभाजी सेना आयोजित धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सार्वजनिक जयंती महोत्सव २०२६ निमित्त आ.डॉ.राहुल पाटील यांच्या उपस्थितीत परभणी शहरात भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १४ मे २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे.

मिरवणुकीची सुरुवात खंडोबा कॉर्नर, धार रोड, परभणी येथून होणार आहे. मिरवणुकीचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे करण्यात येणार आहे. या मिरवणुकीत भव्य रथामध्ये शंभूराजेंची आकर्षक मूर्ती, घोडेस्वार मावळे, गोंधळी-वसुदेव पथक, मर्दानी खेळ, प्रसिद्ध लेझीम पथक, हलगी पथक (सोलापूर), पालखी-वारकरी, फटाक्यांची आतिषबाजी, पुणे येथील सुप्रसिद्ध बँड पथक सहभागी होणार आहेत. या जयंती महोत्सवाचे आयोजक विठ्ठल तळेकर पाटील, संभाजी सेना जिल्हाध्यक्ष परभणी हे असून आ.डॉ. राहुल पाटील साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच शिवसेना महानगरप्रमुख डॉ. विवेक नावंदर, सुभाष दादा जावळे, बाळासाहेब मोहिते, सुधाकर माने, रामेश्वर शिंदे, अजय भाऊ गव्हाणे, रविभाऊ पतंगे, केपी कणके, अरुण मराठे, अनिल कांबळे, सुनील देशमुख, अरविंद काका देशमुख, विशाल बुधवंत, नितीन लोहट, डॉ. विक्रम पाटील, डॉ. राजू सुरवसे, राजू कापसे, व्यंकटराव शिंदे, नितीन देशमुख, बाळासाहेब पानपट्टे, प्रवीण देशमुख, सचिन सामले, नितेश देशमुख, अक्षय देशमुख, गजानन जोगदंड, बालाजी मोहिते, सुशील नरसीकर, द्यानेश्वर पवार व शंकर देशमुख यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी सर्व शिवभक्त, शंभूप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जयंती महोत्सव यशस्वी करावा, असे आवाहन जयंती उत्सव समिती अध्यक्ष विशालराजे तळेकर व स्वराज्य मित्रमंडळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. कार्यक्रमाच्या तयारीसाठी नारायण देशमुख, बाळराजे तळेकर (युवा सेना शहरप्रमुख), सोनू पवार, प्रताप पवार, गोविंद तळेकर, पवन कुरील, अरुण पवार, सुधाकर सोळंके, प्रमोद जोगदंड, दौलत शिंदे, राजू शिंदे, गजानन लव्हाळे, गजानन शिंदे, उद्धव पवार, पवन शिंदे, गोरख तावडे, अझर कुरेशी, बालाजी तरवटे, रोहित घनघाव, शुभम बोबडे, विकी जोगदंड, आनंद ढाकरगे, कुशल जोगदंड, अजय भिसे व ओमकार चौधरी हे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

## नागरिकांनी स्वगणना करून घ्यावी-महापौर सय्यद इकबाल यांचे आवाहन

**परभणी ,/प्रतिनिधी:** भारताची जनगणना २०२७ अंतर्गत पहिल्या फेरीत घर यादी, घराची गणना व 'स्व-गणना' १ ते १५ मे या कालावधीत होणार आहे. याची नोंदणी प्रक्रियाही सुरू झाली आहे. महापौर सय्यद इकबाल यांनी स्वतः स्वगणना केली असून नागरिकांनी देखील स्वगणना करावी असे आवाहन त्यांनी केले आहे. यंदाच्या जनगणनेचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे 'डिजिटल नोंदणी' होय. नागरिकांना गणनेसाठी कर्मचाऱ्यांची (गणक) वाट पाहण्याची गरज नाही; ते स्वतः आपली आणि आपल्या कुटुंबाची माहिती ऑनलाइन पोर्टलद्वारे नोंदवू शकतात. यालाच 'स्व-गणना' म्हणतात. ही प्रक्रिया अत्यंत सोपी आणि सुटसुटीत असून नागरिकांना सहज करता येण्याजोगी आहे.

मोबाईल नंबर आणि 'ओटीपी' पडताळणी करा पोर्टलवर नोंदणी आणि लॉगिन करा,मोबाईल नंबरवरओटीपी मिळेल. कुटुंबप्रमुख आणि घराचे लोकेशन कुटुंबप्रमुखाचे नाव नोंदवून मॅपद्वारे घराचे अचूक 'लोकेशन सेट' करा,कुटुंबप्रमुख नाव,लोकेशन अशी माहीती 'सबमिट' केल्यावर मोबाइलवर येणारा संदर्भ क्रमांक जतन करून ठेवा ...संदर्भ क्रमांक.... मोबाईलवर येणार संदर्भ क्रमांक जणगणनेत जातींची मोजणी होणार असे सांगितले जात होते. प्रत्येक्षात केवळ एससी, एसटी आणि इतर असाच पर्याय देण्यात आला आहे. माहिती पूर्ण भरून सबमिट केल्यानंतर, मोबाईलवर एक संदर्भ क्रमांक (रेफरन्स नंबर) येईल. गणक आल्यावर काय करावे? जनगणना कर्मचारी घरी येतील, तेव्हा त्यांना संदर्भ क्रमांक दाखवा, तुम्ही भरलेली माहिती त्यांना 'डिव्हाइस'मध्ये दिसेल. हे नोंदविले म्हणजे झाले...? नाही, यामध्ये फक्त तुमच्या नावाची नोंद होते, तुमच्या घरच्यांच्या नावाची नाही. ते किती आहेत त्याचा आकडा द्यावा. घरची परिस्थिती आणि इतर प्रश्नांची उत्तरे त्यांना मिळतात. त्यामुळे जनगणना कर्मचारी घरी आल्यावर दीर्घकाळ बसून माहिती देण्याची गरज उरणार नाही. तसेच नागरिक स्वतः माहिती भरत असल्याने चुकांची शक्यता कमी असते. जनगणना कर्मचारी आणखी काही माहिती घेऊ शकतात.




## भरदुपारी घरफोडी करणारा आरोपी २४ तासांत जेरबंद

### जालना येथून आरोपीला अटक; १ लाख ८७ हजारांचा मुद्देमाल जप्त : स्थागुशाची कारवाई

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील सारडा कॉलनी परिसरातील एका शिक्षकाच्या घरात भरदुपारी घरफोडी करून सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या आरोपीला गंगाखेड पोलिसांनी अवघ्या २४ तासांत जालना येथून अटक केली. चोरीतील सुमारे १ लाख ८७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सारडा कॉलनी परिसरात राहणारे शिक्षक संजीवकुमार व्यंकटराव गबाळे हे शनिवारी (दि. ९ मे) बाहेरगावी गेले असता अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने चोरून नेले होते. ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली होती. याप्रकरणी रविवारी गंगाखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांनी आरोपीचा तातडीने शोध घेण्याचे आदेश दिले. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक चंदन परिहार, पोहेकॉ महेश कवठाळे, राहुल परसोडे, माणिक वाघ, लक्ष्मण कांगणे, पांडुरंग तुपसुंदर, मुकेश बुधवंत, सिद्धेश्वर चाटे, सचिन भदरगे, नामदेव दुबे, राम पौळ, मधुकर ढवळे, उमेश चव्हाण, केशव लटपटे, निलेश परसोडे, दिलीप निलपत्रेवार, शरद सावंत, हुसेन, गायकवाड, साने, हनवते आदींच्या पथकाने तपास सुरू केला. तेव्हा ही घरफोडी समर्थ नारायण मुळे, रा. गंगाखेड याने केल्याची व तो जालना येथे असल्याची माहिती मिळाल्यावरुन सायबर सेलचे गणेश कौटकर यांची मदत घेत सोमवार ११ मे रोजी समर्थ मुळे यास जालना येथून ताब्यात घेत घरफोडीच्या गुन्ह्यातील चोरीस गेलेले १५ ग्रामपेक्षा अधिक वजनाचे सोन्याचे दागिणे ज्यांची किंमत अंदाजे १ लाख ७१ हजार ५०० रुपये व रोख १६ हजार रुपये असा एकूण १ लाख ८७ हजार ५०० मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# शिवसेना ठाकरे गटाच्या परभणी जिल्ह्यातील विविध पदांच्या नियुक्त्या जाहीर : विविध तालुके व शहरांमध्ये संघटन मजबुतीसाठी पदाधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या

**परभणी ,/प्रतिनिधी:** शिवसेना ठाकरे गटाच्या परभणी जिल्ह्यातील विविध पदांच्या नियुक्त्या जाहीर : विविध तालुके व शहरांमध्ये संघटन मजबुतीसाठी पदाधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या दिल्या आहेत.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार परभणी जिल्ह्यातील विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने या नियुक्त्या करण्यात आल्याची माहिती पक्षाकडून देण्यात आली. यामध्ये पाथरी विधानसभा प्रमुखपदी कल्याणराव रेंगे तर जिंतूर विधानसभा प्रमुखपदी राम पाटील खराबे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सोनपेठ येथील उपजिल्हाप्रमुखपदी कृष्णा पिंगळे, तालुकाप्रमुखपदी संतोष गवळी आणि शहरप्रमुखपदी अमोल दहिवाळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पाथरी-मानवत विभागासाठी उपजिल्हाप्रमुखपदी मुंजाभाऊ कोल्हे तर मानवत तालुकाप्रमुखपदी प्रभाकर कदम आणि शहरप्रमुखपदी बालाजी दहे यांची निवड करण्यात आली आहे. पाथरी तालुकाप्रमुखपदी हरिभाऊ वाकणकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जिंतूर उपजिल्हाप्रमुखपदी भारत पवार, तालुकाप्रमुखपदी किरण देशमुख, जिंतूर-बोरी विभाग तालुकाप्रमुखपदी ऋतिक पांडे, शहरप्रमुखपदी अरविंद कटारे व शहर संघटकपदी कांतराव धानोरकर यांची निवड करण्यात आली आहे. तर गंगाखेड उपजिल्हाप्रमुखपदी माधवराव शेंडगे, तालुकाप्रमुखपदी जानकीराम पवार, तालुका संघटक पदी धोंडीराम जाधव, शहर संघटकपदी अमोल खटिंग व युवासेना तालुका अधिकारी पदी भागवत शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच पूर्णा उपजिल्हाप्रमुखपदी साहेबराव कल्याणकर, तालुकाप्रमुखपदी छगनराव मोरे आणि शहरप्रमुखपदी प्रताप कदम यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पालम उपजिल्हाप्रमुखपदी बालाजी लोखंडे, तालुकाप्रमुखपदी बापूराव पौळ, शहरप्रमुखपदी शेख मुकरम आणि तालुका संघटक पदी एकनाथ मोहिते यांची निवड करण्यात आली आहे. तसेच सेलू तालुकाप्रमुखपदी अरुण ताठे, शहर संघटकपदी शक्ती बोराडे तर राणीसावरगाव शहरप्रमुखपदी माधव जाधव व परभणी तालुका संघटकपदी आत्माराम वाघ यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे.

दरम्यान, नव्या पदाधिकाऱ्यांवर पक्ष संघटना अधिक बळकट करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली असून या सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे आमदार डॉ. राहुल पाटील यांनी अभिनंदन केले आहे. तसेच पुढील वाढचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## अग्रलेख...

# भविष्य घडवणे म्हणजे काय?

सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी विकास प्रकल्पांना विरोध दर्शविण्यासाठी दाखल केल्या जाणाऱ्या याचिकांबद्दल तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. न्यायालयाची ही भूमिका खरोखर योग्य आणि समजून घेण्यासारखी आहे. देशाला रस्ते, उद्योग, धरणे, रेल्वेमार्ग, विमानतळ, ऊर्जा प्रकल्प आणि आधुनिक शहरे हवी आहेत. लाखो लोकांच्या रोजगाराचा, अर्थव्यवस्थेच्या वाढीचा आणि देशाच्या भविष्याचा प्रश्न त्याच्याशी जोडलेला आहे. विकास थांबवून कोणताही समाज पुढे जाऊ शकत नाही, हे सत्यच आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केलेला मुद्दा योग्यच आहे यात वाद नाही. मात्र, या विषयाची दुसरी बाजूही आहे आणि ती फार अस्वस्थ करणारी आहे. आज जगभरात विकासाची जी व्याख्या रूढ झाली आहे, ती प्रचंड काँक्रिटीकरण, वेग, उत्पादन आणि बाजारपेठ यांभोवती फिरताना दिसते. मोठे पूल, उंच इमारती, सहा-आठपदरी महामार्ग, विस्तीर्ण औद्योगिक वसाहती यांनाच प्रगतीचे प्रतीक मानले जाते. पण या चकाकणाऱ्या विकासाच्या मागे नष्ट होत असलेली जंगले, टेकड्या, सुकणाऱ्या नद्या, हरवत जाणारे पक्षी, तापत जाणारी जमीन आणि विस्थापित होणारी माणसं फारशी कुणाच्या नजरेत येताना दिसत नाहीत. खरे तर विकास आणि पर्यावरण हे एकमेकांचे शत्रू नाहीत. पण आपण त्यांना ज्या पद्धतीने हाताळतो आहोत, त्यामुळे हा संघर्ष निर्माण झाला आहे. प्रत्यक्षात प्रश्न आहे विकासाच्या पद्धतीचा.

एखादा रस्ता जंगल फोडूनच जावा का? एखादा उद्योग नदी प्रदूषित करूनच का उभा राहावा? शहरांचा विस्तार फक्त झाडे तोडूनच व्हावा का?...या व अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याऐवजी आपण अनेकदा विकास विरुद्ध पर्यावरण अशी सरळ मांडणी करतो. त्यामुळे या विषयाकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलतो. मुसळधार पावसात दरडी कोसळू लागल्या. उत्तराखंडमधील आपत्ती असो किंवा हिमाचलमधील भूस्खलन म्हणजे निसर्गाने वेळोवेळी दिलेले इशारे आहेत. पश्चिम घाटात जंगलतोड वाढली आणि पावसाचे चक्र बदलते. शहरांमध्ये तर नद्या गटारांमध्ये बदलल्या आहेत. पावसाचे पाणी झिरपण्यासाठी जागाच उरली नाही आणि मग थोड्या पावसातही पूर येऊ लागले. आपण निसर्गाशी किती बेफिकीरपणे वागलो आहोत, याची ही उदाहरणे आहेत. विकासाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे विस्थापन. मोठे प्रकल्प उभे राहताना हजारो लोक आपली जमीन, घरे व जीवनपद्धती गमावून बसतात. जंगले संपतात किंवा कमी होतात. कागदावर नुकसानभरपाई मिळते; पण विस्थापित लोकांच्या संस्कृतीचे काय होते? आदिवासी भागात हा प्रश्न अधिक तीव्र आहे. जंगल हे त्यांच्यासाठी फक्त संसाधन नसते. ते त्यांचे जग असते. विकासाच्या नकाशांमध्ये या जंगलांची ओळख अडथळा म्हणूनच दिसते. तंत्रज्ञानाने माणसाला मोठी शक्ती दिली; पण त्याचबरोबर एक भ्रमही दिला की, आपण निसर्गावर पूर्ण नियंत्रण मिळवले आहे. ही भावना अतिशय धोकादायक आहे. कारण निसर्गाला जिंकण्याचा प्रयत्न अखेरीस माणसालाच हरवून टाकतो, हे वारंवार सिद्ध होत आले आहे. हवामान बदल ही त्याचीच किंमत आणि ती आपण मोजत आहोत. तापमान वाढत आहे, ऋतू बदलत आहेत, पाणीटंचाई गंभीर होत आहे. समुद्र किनाऱ्यावरील शहरे धोक्यात आली आहेत. ही संकटे अचानक निर्माण झालेली नाहीत; ती विकासाच्या चुकीच्या मॉडेलचे आणि एकूणच मानवजातीने निसर्गाशी केलेल्या घातक खेळाचे परिणाम आहेत.

आजच्या मुलांना आपण कोणती पृथ्वी देणार आहोत, हा प्रश्न आता केवळ भावनांपुरता मर्यादित राहिलेला नाही; तो अस्तित्वाचा प्रश्न बनला आहे. झाडे ऑक्सिजन देतात. ती हवामानाचे संतुलनही राखतात. नद्या पाणीपुरवठा करतात. शिवाय त्या संस्कृती निर्माण करतात. पर्वत-टेकड्या ही फक्त पर्यटनस्थळे नसतात, ते संपूर्ण मानवतेचा आधारस्तंभ असतात. निसर्ग हा केवळ स्रोत नाही. त्याचे नुसते दोहन करायचे नसते. त्याला सोबत घेऊन चालायचे असते. विकासाच्या नव्या व्याख्यांमध्ये या जाणिवा हरवत आहेत. परिणामांबद्दल वेगळे बोलायची गरज नाही. म्हणूनच विकासाची व्याख्या नव्याने समजून घेण्याची वेळ आली आहे. विकास म्हणजे फक्त जीडीपी वाढ नव्हे. विकास म्हणजे माणसाचे जीवन अधिक सन्मानाने, सुरक्षितपणे आणि संतुलितपणे जगता येणे. विकास म्हणजे शहरे चांगल्या पद्धतीने वाढणे, तेथील जीवनाचा दर्जा चांगला असणे. माणसे वाढत आहेत. झाडेही वाढायला हवीत. ती वाढताना दिसत नाहीत. उलट असलेली कमी होताना दिसतात. उद्योग उभे राहायला हवेत, पण नद्याही जिवंत राहायला हव्यात. कारखान्यांच्या माध्यमातून रोजगार हवा, पण प्रदूषण होऊ नये. विकास म्हणजे भविष्यातील पिढ्यांच्या हक्कांवर वर्तमानाने मिळविलेला ताबा नसतो. आपण शाश्वत विकास हा शब्द वारंवार वापरतो; पण तो केवळ भाषणांपुरताच राहतो. प्रत्यक्षात शाश्वत विकास म्हणजे प्रत्येक निर्णय घेताना पुढच्या पन्नास-शंभर वर्षांचा विचार करणे. एखादा प्रकल्प उभा राहताना त्याचा पर्यावरणावर, स्थानिक समाजावर, पाण्यावर, हवामानावर काय परिणाम होईल, याचा प्रामाणिक अभ्यास होणे गरजेचे आहे. पर्यावरणीय मंजुरी ही फक्त औपचारिकता असता कामा नये. ती समाजाशी केलेली नैतिक बांधिलकी असावी.

या विषयात न्यायालयांची भूमिकाही महत्त्वाची आहे. अनेक वेळा न्यायालयांनी पर्यावरण संरक्षणासाठी ऐतिहासिक निर्णयही दिले आहेत. न्यायालयांकडून विकास प्रकल्पांना सतत प्रश्नांकित केले जाऊ शकत नाही. तसे होणे योग्यही नाही. त्यांचे काम संतुलन राखण्याचे आहे. शासन, उद्योग आणि समाज या तिन्ही स्तरांवर प्रामाणिकपणा नसेल, तर न्यायालयांच्याही मर्यादा आहेत. प्रश्न असा आहे की, आपण कोणत्या प्रकारचा समाज घडवू इच्छितो?... फक्त उपभोगावर उभा राहिलेला समाज की संवेदनशीलतेवर उभा राहिलेला समाज? निसर्गाशी नाते तुटले की माणूस आतूनही कोरडा होतो. आज शहरांमध्ये वाढती मानसिक अस्वस्थता, ताणतणाव आणि एकटेपणाही काही प्रमाणात निसर्गापासून दूर जाण्याशी जोडलेली आहे. हिरवाई हरवली की मनातील उष्णता वाढते. भारतीय संस्कृतीने निसर्गाला नेहमीच पूजनीय मानले. नदीला माता म्हटले, झाडांना देवत्व दिले, पर्वतांना पवित्र मानले. या परंपरांमध्ये केवळ श्रद्धा नव्हती, त्यामागे पर्यावरणाच्या रक्षणाचा शहाणपणा होता. आधुनिकतेच्या धावपळीत आपण ते शहाणपण विसरत चाललो आहोत. विज्ञान-विकास आणि परंपरा यांच्यात संघर्ष व्हावा, हे आवश्यक नाही. उलट दोघांच्या समन्वयातूनच उद्याचे भविष्य घडू शकते. भविष्य म्हणजे केवळ अधिक डिजिटल, अधिक वेगवान आणि अधिक उपभोगवादी जग नव्हे. भविष्य म्हणजे अधिक मानवी, अधिक संतुलित आणि अधिक जबाबदार जग. जिथे मानवाला श्वास घेण्यासाठी व चांगल्या वातावरणात मोकळे जगता येईल. शुद्ध हवा, पाणी मिळवण्यासाठी खटाटोप करावा लागणार नाही. विकासाचा अर्थ फक्त काही लोकांच्या संपत्तीत वाढ करणे नव्हे. सर्वांच्या जीवनमानात सुधारणा म्हणजे विकास होय. त्यासाठी निसर्ग आणि माणूस यांच्यातील नाते सहजीवनाचे असायला हवं. तसे ते आता-आतापर्यंत होते. आता सारेच बदललेले दिसते. एकीकडे उत्तुंग विकास प्रकल्पांना विरोध होतो तर दुसरीकडे विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा नाश केला जातो. कुणाचीही बाजू घेण्याचे कारण नाही. विकास हवाच, पण पर्यावरणाची शुद्धता आणि शाश्वतता राखूनच हवा. निवड आपल्यालाच करायची आहे. आपण भविष्य घडवायचे निघालो आहोत म्हणजे श्वास सुद्धा घेता येणार नाही, असा तुंबलेला, अस्वच्छ कुबट असा भवताल मागे सोडून जाणार आहोत का, हे एकदा तपासून पाहिले पाहिजे. भविष्य म्हणजे पुढच्या पिढ्यांसाठी सोडलेली संपत्ती एवढाच अर्थ नव्हे आपल्या मुलांना-नातवंडांना, त्यांच्या पुढच्या अनेक पिढ्यांना मोकळा श्वास घेता येईल असे वातावरण आपण त्यांच्यासाठी निर्माण करू शकणार असू तर आपल्याला भविष्याचा खरा अर्थ कळले, असे म्हणता येईल. पुढच्या काळात आपली कर्तबगारी किती मोठे प्रकल्प उभारले यावरून नव्हे, तर किती नद्या वाचवल्या, किती जंगले जपली आणि विकासाच्या धावण्यात माणुसकी व निसर्ग दोन्ही जिवंत ठेवले का, यावरूनच ठरेल.

---

## विशेष

# 'गंगा एक्सप्रेस वे'च्या निमित्ताने...

**प्रा. सुखदेव बखळे**

'गंगा एक्सप्रेस वे' हा एक स्वतंत्र रस्ता नसून, तो अनेक महामार्ग, एक्सप्रेस वे आणि कनेक्टिव्हिटी प्रकल्पांना जोडणारा एक मध्यवर्ती कणा आहे. मेरठपासून प्रयागराजपर्यंतचा हा मार्ग राज्यातील १२ महत्त्वाच्या जिल्ह्यांना जोडतो; पण त्यापलीकडे जाऊन तो संपूर्ण उत्तर भारतातील वाहतूक व्यवस्थेला नव्याने आकार देतो. मेरठजवळ हा मार्ग 'दिल्ली-मेरठ एक्सप्रेस वे'शी जोडला जातो. त्यामुळे दिल्ली आणि 'एनसीआर'मधून थेट या 'एक्सप्रेस वे'वर प्रवेश मिळतो. परिणामी, दिल्ली ते प्रयागराज हा दीर्घ आणि थकवणारा प्रवास आता निम्म्या वेळेत पूर्ण होऊ शकतो. वेळेची ही बचत केवळ प्रवाशांसाठी सोयीची नसून आर्थिक हालचालींना वेग देणारी ठरते. व्यापार, मालवाहतूक आणि उद्योग यांना याचा थेट फायदा होतो. आग्रा, लखनऊ आणि कानपूरसारख्या शहरांना या मार्गामुळे अखंड द्रुतगती मार्ग मिळतो. एका 'एक्सप्रेस वे'वरून दुसऱ्यावर सहजपणे जाण्याची क्षमता ही भविष्यातील वाहतूक व्यवस्थेची गरज आहे आणि गंगा एक्सप्रेस वे ती गरज पूर्ण करताना दिसतो. पूर्वेकडील उत्तर प्रदेशासाठी या प्रकल्पाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. या 'एक्सप्रेस वे'चा विस्तार उत्तराखंडकडे नेण्याची कल्पनादेखील महत्त्वाची आहे. हरिद्वार आणि हृषीकेशसारख्या धार्मिक स्थळांशी थेट जोडणी झाल्यास, प्रयागराज आणि हरिद्वार यामधील अंतर केवळ भौगोलिक न राहता आर्थिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीचे माध्यम बनेल. दिल्ली, हरयाणा, उत्तराखंड, उत्तर प्रदेश आणि पुढे बिहारपर्यंत पसरलेला हा कॉरिडॉर उद्योग, व्यापार आणि गुंतवणुकीसाठी नवे दरवाजे उघडतो. 'गंगा एक्सप्रेस वे'चा भविष्यातील विस्तार, विशेषतः प्रयागराज ते बलिया हा टप्पा, या प्रकल्पाला आणखी व्यापक बनवतो. बिहारच्या सीमेशी थेट संपर्क निर्माण झाल्यास, हा मार्ग केवळ राज्यांतर्गत न राहता, आंतरराज्य आर्थिक वाहतुकीचा मुख्य मार्ग बनेल. यामुळे उत्तर भारतात एक नवीन आर्थिक पट्टा तयार होण्याची शक्यता आहे.

'गंगा एक्सप्रेस वे' हे उत्तर प्रदेशच्या विकासाच्या मॉडेलमध्ये झालेल्या बदलाचे प्रतीक आहे. विकासाच्या पारंपरिक पद्धतींपासून दूर जाऊन, कनेक्टिव्हिटीला केंद्रस्थानी ठेवून विकास साधण्याचा हा प्रयत्न आहे. रस्ते सक्षम होतात, तेव्हा उद्योग येतात; उद्योग आल्यावर रोजगार निर्माण होतो आणि रोजगार निर्माण झाला की समाजात स्थैर्य आणि प्रगती येते. मेरठपासून प्रयागराजपर्यंत सुमारे ५९४ किलोमीटर लांबीचा हा महामार्ग राज्याच्या पश्चिम आणि पूर्व भागाला



एकाच धाग्यात बांधतो. सुमारे ३६ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च करून उभारण्यात येत असलेला हा प्रकल्प भारतातील सर्वांत मोठ्या 'ग्रीनफील्ड एक्सप्रेस वे'पैकी एक मानला जातो. 'गंगा एक्सप्रेस वे'च्या उभारणीसाठी होणाऱ्या खर्चामध्ये केवळ रस्त्याचे बांधकाम समाविष्ट नाही, तर जमीन संपादन, आधुनिक सुरक्षा प्रणाली, सेवा सुविधा आणि भविष्यातील विस्ताराच्या शक्यता यांचा समावेश आहे. त्यामुळे हा खर्च केवळ खर्च म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. तो राज्याच्या भविष्यातील आर्थिक क्षमतेमध्ये केलेली दीर्घकालीन गुंतवणूक आहे. 'गंगा एक्सप्रेस वे' ची खरी ताकद त्याच्या कनेक्टिव्हिटीमध्ये आहे. मेरठ, हापूर, बुलंदशहर, संभल, अमरोहा, बदायूं, शाहजहांपूर, हरदोई, उन्नाव, रायबरेली, प्रतापगड आणि प्रयागराज अशा सुमारे बारा जिल्ह्यांना हा मार्ग थेट जोडतो. याशिवाय या मार्गाच्या आसपास असलेली शेकडो गावे अप्रत्यक्षपणे या नेटवर्कचा भाग बनतात. आजपर्यंत ग्रामीण भागातील उत्पादने मोठ्या बाजारपेठांपर्यंत पोहोचणे कठीण होते; परंतु या 'एक्सप्रेस वे'च्या माध्यमातून ही दरी कमी होणार आहे. शेतमाल, लघुउद्योग उत्पादने आणि स्थानिक संसाधने आता कमी वेळात आणि कमी खर्चात मोठ्या बाजारपेठांपर्यंत पोहोचू शकतील. दळणवळणाच्या दृष्टीने पाहता हा 'एक्सप्रेस वे' राज्यासाठी क्रांतिकारक ठरणार आहे. मेरठ ते प्रयागराज हा प्रवास सध्या दहा ते बारा तासांचा असतो, तो कमी होऊन सहा ते सात तासांवर येईल. ही केवळ वेळेची बचत नाही, तर आर्थिक कार्यक्षमतेची वाढ आहे. मालवाहतुकीचा वेळ कमी झाल्यामुळे उद्योगांना जलद पुरवठा साखळी तयार करता येईल. यामुळे उत्पादन खर्च कमी होईल आणि स्पर्धात्मकता वाढेल. दीर्घकालीन दृष्टीने हे उत्तर प्रदेशाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात अधिक सक्षम बनवेल.

या प्रकल्पाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तो एक आर्थिक कॉरिडॉर म्हणून विकसित होण्याची क्षमता ठेवतो. 'एक्सप्रेस वे'च्या दोन्ही बाजूंना औद्योगिक क्लस्टर, लॉजिस्टिक पार्क, गोदामे आणि सेवा उद्योग विकसित होण्याची शक्यता आहे. राज्य सरकारने यासाठी नियोजनही सुरू केले आहे. यामुळे टेक्सटाईल, अन्न प्रक्रिया, औषधनिर्मिती आणि इतर उद्योगांना चालना मिळेल. गुंतवणूकदारांसाठी सुलभ पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे नवीन उद्योग उभारले जातील. त्याचा थेट परिणाम रोजगारनिर्मितीवर होईल. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरही लॉजिस्टिक्स, सेवा, हॉटेल व्यवसाय, वाहतूक आणि औद्योगिक क्षेत्रात हजारो संधी निर्माण होतात. ग्रामीण भागातील युवकांना त्यांच्या स्वतःच्या परिसरात रोजगार उपलब्ध झाल्यास शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होऊ शकते. त्यामुळे सामाजिक स्थैर्य वाढण्यास मदत होईल. 'गंगा एक्सप्रेस वे'चा परिणाम सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही दिसून येईल. प्रयागराजसारखे धार्मिक आणि ऐतिहासिक शहर अधिक जवळ येईल. कुंभमेळ्यासारख्या मोठ्या धार्मिक कार्यक्रमांदरम्यान वाहतुकीचे व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करता येईल. पर्यटनाला चालना मिळाल्यास स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा फायदा होईल. 'एक्सप्रेस वे'च्या आसपासच्या भागात जमीनदर वाढण्याची शक्यता आहे. नवीन टाऊनशिप, औद्योगिक क्षेत्रे आणि निवासी प्रकल्प विकसित होऊ शकतात. नियोजित शहरीकरणाला चालना मिळाल्यास अनियंत्रित शहरवाढीवर नियंत्रण ठेवता येईल. यामुळे दीर्घकालीन शाश्वत विकास साधता येईल.

तांत्रिक आणि सुरक्षा सुविधांच्या बाबतीतही हा 'एक्सप्रेस वे' आधुनिकतेचे उदाहरण ठरतो. आपत्कालीन परिस्थितीत विमान उतरवता येईल अशी एअर स्ट्रीप, इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन्स, ट्रॉमा सेंटर आणि विश्रांती केंद्रे यांसारख्या सुविधा या मार्गावर उपलब्ध आहेत. यामुळे हा मार्ग आजच्या गरजांसाठीच नव्हे, तर भविष्यातील वाहतुकीसाठीही तयार आहे. अशा प्रकारचे प्रकल्प केवळ पायाभूत सुविधा उभारण्यापुरते मर्यादित नसतात, तर संपूर्ण प्रदेशाच्या भवितव्याला दिशा देतात. योग्य नियोजन, अंमलबजावणी आणि व्यवस्थापन यांचा समतोल राखला गेला, तर 'गंगा एक्सप्रेस वे' उत्तर प्रदेशाला देशाच्या विकासाच्या अग्रस्थानी नेण्याची क्षमता ठेवतो.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

---

## वेध

**विजय निचकवडे**

# 'समर' नव्हे, 'संस्कार' कॅम्प!

जे सगळे करतात, तेच आपण करायचं ही आमची मानसिकता! शेजारची लेकरं म्हणे मोठे पैसे भरून उन्हाळी शिबिराला जातात. समर कॅम्प असे त्याचे नाव! म्हणून मग आमच्याही मुलाने जावं, असा आग्रह असतो. पण या आग्रहात 'त्या' मुलाचं भविष्य असते का हो? असे असताना आजही आधुनिकतेच्या या मायाजाळात युवा पिढीत ग्रामीणसह शहरी भागात संस्कार रुजविण्याचे काम करताहेत, वारकरी घडविणारे बाल संस्कार शिबिरे. समर कॅम्पच्या तुलनेत याचा गजावाजा नसतो, पण माणूस म्हणून पिढी तयार करण्याची क्षमता अपार असते.

आज समाजात वावरताना आपण जे पाहतो, ते चित्र विदारक आहे. घरातून मिळणारे संस्कार संपत चालले आहेत. पैसा मिळविण्याच्या नादात नोकरीनिमित्त घराबाहेर राहणारे आई-वडील, विभक्त कुटुंब पद्धतीमुळे घरात दिसत नसलेले आजी-आजोबा हरविलेल्या संस्काराचे कारण आहे. मुलं मोबाईलच्या आहारी गेले आहेत. माध्यमे त्याच्यासाठी संस्काराची पेटी झाली असून माध्यमातील पात्र त्यांचे आदर्श ठरू पाहात आहेत. यातूनच संस्कार पाझरूलागले आणि पिढी नको त्या मार्गाने निघाली. लहान लहान मुलेच नव्हे, मुलीसुद्धा व्यसनाच्या आहारी गेल्या. मानसन्मान, वडीलधाऱ्यांचा आदर, आमची संस्कृती, देशभक्ती ही पिढी विसरली आणि आज संस्कार रुजविण्याची गरज निर्माण झाली. महाराष्ट्राच्या मातीला संतांच्या विचारांचा सुगंध आहे आणि या सुगंधाचा खरा वारसदार म्हणजे आपली 'युवा पिढी.' आजच्या धकाधकीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात जेव्हा संस्कारांची जपणूक करणे कठीण झाले आहे, तेव्हा 'वारकरी बाल संस्कार शिबिरे' एक आशेचा किरण म्हणून समोर आली आहेत. आज गावागावांत वारकरी बाल संस्कार शिबिरांचं आयोजन होत आहे. कुठे गुरुदेव सेवा मंडळ असेल ते कुठे आणखी कुठल्या संस्थेचा पुढाकार. सगळ्यांचा हेतू एकच आणि स्पष्ट; तो म्हणजे संस्कारक्षम पिढी घडविणे. तिथे स्वीमिंग पूल नसतो. आधुनिक साधनांचा सहवास नसतो, ना आरामदायी वातावरण. पण तेथे होणाऱ्या हरिनामापासून ते शुभंकरोतीपर्यंतची दिनचर्या समर कॅम्पमधील आधुनिकतेलाही मागे टाकून जाते.

*'देह जावो अथवा राहो' पांडुरंगी दृढ भावो'*

हा विचार केवळ अभंगापुरता मर्यादित नसून तो जगण्याचा एक मार्ग आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. येथे वारकरी संप्रदायाने केवळ भक्तीच शिकवली नाही, तर माणुसकी आणि संस्कारांचे धडे दिले आहेत. आजच्या विज्ञानाच्या युगात आपली युवा पिढी जागतिक स्तरावर प्रगती करीत असताना, त्यांना आपल्या मुळांशी जोडून ठेवण्याचे काम वारकरी बाल संस्कार शिबिरे अत्यंत प्रभावीपणे करीत आहेत. वारकरी बाल संस्कार शिबिर म्हणजे केवळ टाळ-मृदंगाचा सराव नव्हे, तर ती एक जीवन जगण्याची कार्यशाळा आहे. येथे शिस्त, नीतिमत्ता आणि सामाजिक जबाबदारी यांचे बाळकडू दिले जाते. मुलांमध्ये वेळेचे नियोजन आणि शिस्त निर्माण करते. ज्ञानेश्वरी गाथा आणि भागवत धर्माच्या तत्त्वांचे सोप्या भाषेत केलेले विवेचन मुलांना आपल्या समृद्ध परंपरेची ओळख करून देते. आजच्या काळात पालकांसमोर सर्वात मोठे आव्हान आहे ते म्हणजे मुलांना व्यसनांपासून आणि विघातक प्रवृत्तींपासून दूर ठेवणे. वारकरी शिबिरे यावर रामबाण उपाय ठरत आहेत. लहानपणापासूनच सात्त्विक आहार आणि विचारांची सवय लागल्यामुळे ही मुले कोणत्याही चुकीच्या मार्गाला जाण्याचा प्रश्नच नसतो.

*'तुका म्हणे जे जे भेटे, ते ते मानिजे दैवत'*

या उक्तीप्रमाणे प्रत्येक माणसात देव पाहण्याची दृष्टी या शिबिरात मिळते. संस्कार हे केवळ मानसिक नसून ते एक प्रकारचे संरक्षणदेखील आहेत. ज्या मुलाचे विचार शुद्ध असतात, त्याचे आचरण कधी भरकटत नाही. ध्यान, धारणा आणि नामस्मरणामुळे मुलांची एकाग्रता वाढते. ताणतणावाच्या काळात खचून न जाता धैर्याने सामोरे जाण्याचे बळ वारकरी विचार देतात. शिबिरातून बाहेर पडलेला युवक हा समाजाचा एक जबाबदार घटक असतो. तो पर्यावरणाचे रक्षण करतो, गरजूंना मदत करतो आणि स्त्रीशक्तीचा सन्मान करतो. हेच खऱ्या अर्थाने समाजाचे संरक्षण आहे.

वारकरी असणे म्हणजे जुनाट विचारांचे असणे नव्हे; उलट वारकरी विचार हे जगातील सर्वात प्रगत विचार आहेत, जे समता, बंधुता आणि प्रेमाची शिकवण देतात. एकूणच, वारकरी बाल संस्कार शिबिरे ही भविष्यातील 'आदर्श नागरिक' घडविणारी टांकसाळ आहे. ही केवळ धार्मिक केंद्रे नसून ती राष्ट्र निर्मितीची केंद्रे आहेत. आज आपल्या मुलांच्या हातात लहानपणीच या संस्कारांची 'पताका' दिल्यास भविष्यात आपल्या पिढीबद्दल चिंता आणि पश्चात्ताप करण्याची वेळच आपल्यावर येणार नाही, हे नक्की!

९७६३७१३४१७

---

## धर्म-संस्कृती

# सप्तद्वीप आणि सप्तसागर...!

**प्रा. दिलीप जोशी**

आपल्या विविध पुराणानुसार ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मिती केली. त्यात आपली पृथ्वी महत्त्वाचा घटक आहे. श्रीमद्‌भगवत महापुराण, विष्णू, वराह, मार्कंडेय पुराणात याबाबत उल्लेख आहेत. या पृथ्वीचे सात द्वीप आणि सप्तार्णव कसे निर्माण झाले याची कथाही पुराणात आली आहे.

पृथ्वीच्या परिवलनामुळे दिवस रात्र होतात. स्वायंभुव मनुपुत्र राजे प्रियव्रत यांना पृथ्वीवर अर्ध्या भागात प्रकाश त्याच वेळी अर्ध्या भागात अंधार ही गोष्ट खटकली आणि पृथ्वीवर कुठेच अंधार नको या हेतूने त्यांनी स्वतःच ज्योतिर्मय रथ तयार करून प्रतिसूर्याप्रमाणे ज्या भागावर अंधार तिथे उजेड निर्माण करण्यासाठी आपला रथ नेत सात फेऱ्या मारल्या. त्यामुळे त्याच्या रथाच्या चाकाने सात प्रचंड चाकोल्या आणि खड्डे पडले. ते सात खड्डे म्हणजे सप्तार्णव अर्थात सप्त सागर. त्यामुळे समुद्राने वेढलेले सात भूभाग पडले. त्यांना द्वीप म्हणू लागले. ते द्वीप राजा प्रियव्रताने आपल्या सात पुत्रांना वाटून दिले. विष्णुपुराणातील पुढील श्लोकात त्यांची नावे आहेत.

जम्बू-प्लक्ष-शाल्मलि-कुश-क्रौञ्च- शाक-पुष्कर-नामानि,
सप्त-द्वीपाः पृथिव्याः, ते सप्त-सागर-परिवेष्टिताः।

ते सप्त सागर आणि सप्त द्वीप आजही आहेत. जंबुद्वीप, प्लक्षद्वीप, शाल्मलीद्वीप, कुशद्वीप, क्रौंचद्वीप, शाकद्वीप आणि पुष्कर द्वीप ही ती सप्तद्वीपांची नावे आहेत. खाऱ्या पाण्याचा लवण सागर, ऊसाच्या रसासारख्या पाण्याचा इक्षू सागर, मदिरेसारख्या पाण्याचा सुरा सागर, तुपासारख्या पाण्याचा घृत सागर, दह्यासारख्या पाण्याचा दधि सागर, दुधासारख्या पाण्याचा क्षीर सागर, गोड पाण्याचा स्वादु जल किंवा शुद्धोदक सागर. सप्त सागरांच्या वेढ्यामुळे आपण पृथ्वीला 'सप्तद्वीप वसुंधरा'' म्हणतो.

१) पौराणिक द्वीपानुसार सप्त द्वीपांपैकी सर्वांत प्रथम द्वीप म्हणजे जंबुद्वीप. प्रियव्रतांनी हा द्वीप आपला पुत्र अग्निध्र याला दिला. ज्यामध्ये देवभूमी अखंड भारत, आशिया खंडातील भूभाग येतो. जंबुद्वीप लवण सागराने वेढलेला प्रदेश आहे. एक लक्ष योजन भूभाग राजा अग्निध्र यांनी आपल्या नऊ पुत्रांना नऊ समान भागात विभाजित करून वाटून दिले. ज्याला पुराणात नऊ वर्ष म्हटले. त्यांच्या पुत्रांच्या नावावरून भारत वर्ष, हरी वर्ष, भद्राश्व वर्ष, केतुमाल वर्ष इत्यादी भाग पडले. आपण राजा अग्निध्र यांनी त्यांच्या ज्येष्ठ पुत्र भारताला दिलेल्या भारत वर्षात राहतो. भारतवर्ष जांबुद्वीपाचा नववा भाग आहे. भरतवर्षे, भरतखंडे, जंबुद्वीपे, दंडकारण्ये असे आपण संकल्पात म्हणतो. जंबुद्वीपातील प्रत्येक वर्षात एक पर्वत आहे. जसे हिमाद्री, गंधमादन, निलगिरी, सुमेरू इत्यादी. या द्वीपांवर जंबू वृक्ष म्हणजे जांभळाची झाडे इतक्या विपुल प्रमाणात होती की ती फळे नदीत पडून ते पाणी जांभूळ रसासारखे होऊन त्या नदीला जंबू नदी नाव पडले. म्हणून हा जंबुद्वीप.

२) यातील दुसरा द्वीप प्लक्षद्वीप असून तो पौराणिक इक्षुरससागराने वेढला आहे. जंबुद्वीपापेक्षा दुप्पट मोठा म्हणजे दोन लक्ष योजने विस्तारित हा द्वीप राजा प्रियव्रताने आपला पुत्र वपुष्मान याला दिला होता. त्याने आपले सात पुत्र गोमेद, ऋषभ, वैभ्राज, सोमक इत्यादींना वाटून दिला. त्यांच्या नावावरूनच त्या त्या भागाला गोमेद वर्ष, ऋषभ वर्ष अशी नावे पडली. प्रत्येक वर्षात एक मोठी नदी होती. अमृता, शिखी, अनुतप्ता इत्यादी त्यांची नावे असून या प्रदेशात प्लक्ष वृक्षाची म्हणजे पारस पिंपळ वृक्षाची अरण्ये होती म्हणून याला प्लक्षद्वीप संबोधित असत. तज्ज्ञांच्या मते, दक्षिण अमेरिका खंड प्लक्षद्वीप तर इक्षुरस सागर म्हणजे अटलांटिक समुद्र आहे.

३) शाल्मली द्वीप. शाल्मल म्हणजे काटशेवर वृक्ष ज्याच्या फळातून रेशमी कापूस निघतो. ही झाडे अधिक असल्यामुळे याला शाल्मली द्वीप म्हणतात. प्रियव्रताचे पुत्र यज्ञबाहू यांच्या वाट्याला आलेला हा प्रदेश त्यांनी त्यांच्या सात पुत्रांना वाटून दिला. त्यांच्या नावावरूनच या भागांना सुरोचन वर्ष, रमणक वर्ष, आप्यायन वर्ष अशी नावे पडली. हा द्वीप पौराणिक सूरासागराने वेष्टित आहे. तज्ज्ञांच्या मते ऑस्ट्रेलिया खंड व सूरासागर म्हणजे पॅसिफिक महासागर होय.

४) पुढील द्वीप कुशद्वीप असून हा प्रदेश कुश नावाच्या गवताने आच्छादित होता म्हणून कुशद्वीप. हा द्वीप पौराणिक घृतसागराने अधिक वेढला गेला. प्रियव्रत राजाचे पुत्र हिरण्यरेत यांच्या वाट्याला आला होता. त्यांनी या द्वीपाचे सात भाग म्हणजे सातवर्ष आपल्या सात पुत्रांना वाटून दिले. त्यामुळे या द्वीपाचे वसुवर्ष, विविक्त वर्ष, वसू वर्ष, नाभिगुप्त वर्ष इत्यादी भाग असून त्या प्रत्येक वर्षात एक पर्वत नामे चक्र, चित्रकूट, देवानिक इत्यादी आणि एक नदी-देवगर्भा, मंत्रमाला, मधुकुल्या इत्यादी नद्या होत्या. सध्याचा अंटार्क्टिका खंड हा भाग असून घृतसागर म्हणजे कॅस्पियन समुद्र होय.

५) पुढील द्वीप म्हणजे क्रौंच द्वीप. क्रौंच पक्ष्यांचे इथे प्रचंड प्रमाणात वास्तव्य असून पौराणिक दधीसागर किनाऱ्यावर हा द्वीप आहे. राजा प्रियव्रताने आपला पुत्र घृतपृष्ठ याला आणि त्यांनी आपले सात पुत्र मेघपृष्ठ, सुधामा, मधुरूह, लोहितार्ण इत्यादींना वाटून दिल्यामुळे त्यांच्याच नावे सप्तभाग म्हणजे सप्त वर्ष आहेत. या प्रत्येक वर्षात एक अशा अभया, तीर्थवती, पवित्रवती, आर्यका अशा नद्या तर सर्वतोभद्र, नंद, नंदन, वर्धमान अशी पर्वतांची नावे आहेत. सध्याचा आफ्रिका खंड आणि दधीसागर म्हणजे हिंदमहासागर हा भाग आहे असे तज्ज्ञांचे मत आहे.

६) पुढील द्वीप आहे शाकद्वीप. क्षीरसागराने वेढलेला हा द्वीप शाक म्हणजे सागवान वृक्षांचा प्रदेश. इथे राहणाऱ्यांना शक म्हणतात म्हणून द्वीपाचे नाव शाकद्वीप आहे. राजा प्रियव्रताने आपला पुत्र मेघातिथी याला आणि त्याने आपले सात पुत्र पुरोजव, मनोजव, पवामान, धूम्राणिक इत्यादींना वाटून दिल्यामुळे त्यावरून तेथील वर्ष आहेत. प्रत्येक वर्षात एक प्रमुख नदी जसे अनघा, निजधृती, पंचपदी, अपराजिता इत्यादी आणि प्रत्येक वर्षात एक पर्वत ईशान, उरूशृंग, देवपाल इत्यादी पर्वत आहेत. तज्ज्ञांच्या मते, युरोप खंड म्हणजे हा भाग आणि क्षीरसागर म्हणजे बाल्टिक सागर आहे.

७) सातव्या द्वीपाचे नाव आहे पुष्कर द्वीप. लक्षावधी पाकळ्यांच्या कमळासारखा दिसतो म्हणून हा पुष्कर द्वीप. पौराणिक स्वादुजल सागराचा हा प्रदेश. प्रियव्रत राजाने हा प्रदेश वितिहोत्र नावाच्या पुत्राला दिला. त्याने आपल्या दोन पुत्रांना रमणक आणि धातकी यांना समान वाटून दिला. पुष्कर द्वीपावर एक महाप्रचंड उंच मानसोत्तर पर्वत आहे. त्यामुळे या द्वीपाचे दोन नैसर्गिक भाग पडतात. सूर्याचे उत्तरायण आणि दक्षिणायन याच पर्वतामुळे पडले अशी धारणा आहे. सध्याचा उत्तर अमेरिका खंड म्हणजे पुष्करद्वीप आणि स्वादुजल म्हणजे आर्क्टिक महासागराचा भाग आहे असे तज्ज्ञांचे मत आहे.

आपली पुराणे, रामायण, महाभारत 'इतिहासं पुरातनम्' म्हणून साक्ष आहेत. दिलीपराजे, रघुराजे त्यानंतर भगवान श्रीराम, भीष्म पितामह इत्यादींनी सप्तद्वीपांवर अधिराज्य करून सप्तद्वीपाधिपती चक्रवर्ती सम्राट झाल्याच्या पुराणात नोंदी आहेत. 'वसुधैव कुटुंबकम्' ही केवळ पुस्तकातील भावना नसून ती प्रत्यक्षात कृती होती हे सप्तद्वीप समन्वयातून लक्षात येईल.

९८२२२६२७३५

---

### 'नीट' कधीतरी नीट होणार का?

भारतातील सर्वांत मोठी वैद्यकीय प्रवेश परीक्षा 'नीट' २०२६ रद्द होण्याच्या निर्णयाने देशात खळबळ उडाली आहे. ३ मे रोजी झालेली परीक्षा ज्या पद्धतीने वादाच्या भोवऱ्यात अडकली व अखेर रद्द करावी लागली, त्यावरून एकच प्रश्न विचारला जात आहे की देशातील सर्वांत महत्त्वाची परीक्षा पद्धत कधीतरी नीट म्हणजेच सुरळीत होईल का? नॅशनल टेस्टिंग एजन्सीने यंदा परीक्षेसाठी कडेकोट बंदोबस्त केला होता. ५जी जॅमर्स, एआय-असिस्टेड सीसीटीव्ही, बायोमेट्रिक पडताळणी आणि जीपीएस ट्रॅकिंग असलेल्या वाहनांतून प्रश्नपत्रिकांची ने-आण... इतकेच नव्हे तर साध्या ड्रेस कोडवरूनही कडक नियम लादले गेले होते. अर्ध्या बाह्यांचे कपडे, बुटांना बंदी अशा नियमांमुळे विद्यार्थी आणि पालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. विद्यार्थ्यांचे पूर्ण हाताचे कपडे सुद्धा फाडण्यात आले. कपड्यांना असलेल्या बटन सुद्धा काढण्यात आल्या पण, इतक्या हायटेक सुरक्षेला राजस्थान कथित पेपर फुटीच्या घटनांनी सुरुंग लावला. ३ मे रोजी २३ लाख विद्यार्थ्यांनी दिलेली ही परीक्षा सुरक्षित असल्याचा दावा एनटीएने केला होता, मात्र त्यानंतर राजस्थान आणि उत्तराखंडमधून समोर आलेल्या प्रश्नपत्रिकांमधील साम्यामुळे पेपर फूट प्रकरण समोर आले. राजस्थानच्या तपासात १३५ प्रश्न तंतोतंत जुळल्याचे समोर आल्यानंतर राजकीय दबाव वाढला आणि अखेर एनटीएने फेरपरीक्षेचा निर्णय घेतला. २०२४ मध्येही नीट परीक्षा वादात सापडली होती. बिहारमधील पेपर फुटीचे आरोप आणि १५०० हून अधिक विद्यार्थ्यांना मिळालेले ग्रेस मार्क्स यामुळे सर्वोच्च न्यायालयापर्यंत धाव घ्यावी लागली होती. मात्र, त्यावेळी केवळ विशिष्ट विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा झाली होती. पण २०२६ मध्ये परिस्थिती हाताबाहेर गेली आहे. तब्बल २३ लाख विद्यार्थ्यांच्या कष्टावर पेपर फुटीच्या घटनेने पाणी फेरले आहे. नीट परीक्षा केवळ डॉक्टर बनण्याचे साधन नाही, तर ती मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलांच्या जिद्दीचे प्रतीक आहे. पण वारंवार होणारे घोळ पाहता, गुन्हेगारांना वचक बसेल अशी शिक्षा करावी अन्यथा, नीटचा हा घोळ देशातील गुणवत्तेला ग्रहण लावेल.

**वैभव बावनकर**/नागपूर. ९५४५७४५५८०

## वाचक पत्रे

### त्यांना वठणीवर आणा

'तुष्टीकरणाला खतपाणी घालणाऱ्या शक्ती सक्रिय : पंतप्रधान मोदी' ही बातमी वाचली. या वक्तव्यात नवीन काही नाही. गेल्या हजारो वर्षांचा भारताचा इतिहास बघितला तर अशा शक्ती देशात अस्तित्वात आहेत. धर्म, जातपात, पंथ, भाषा आणि प्रांत अशा मुद्यांवर जनतेमध्ये फोडा आणि झोडा धोरण राबवून भारतातील विविध धर्मीयांना एकमेकांविषयी भीती दाखवणे आणि सत्तेची मलई खाण्याचा ठेका स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ब्रिटिशांकडून काँग्रेसच्या नेत्यांनी घेतला होता आणि आजही ते याच मुद्यावर आपले राजकारण करत आहेत. या सत्कार्यात त्यांना सहकार्य करण्यासाठी इंडिया आघाडी नावाची एक टोळी तयार झाली आहे. देशात अराजकता माजवण्याची एकही संधी ते सोडत नाहीत. देशात हिंसाचार करून सत्ता बळकावण्यासाठी काँग्रेसचे नेते उघडपणे जनतेला बंड करण्याचे आवाहन करतात. लोकसभेतील विरोधी पक्षनेते विदेशात जाऊन भारतविरोधी शक्तींच्या गाठीभेटी घेतात. पाकिस्तानी अतिरेकी हल्ल्यानंतर पाकिस्तानी भाषा बोलून पाकिस्तानचा बचाव करतात. अतिरेक्यांच्या मृत्यूनंतर आसवे ढाळतात. चीनच्या कम्युनिस्ट पार्टीबरोबर काँग्रेस गुप्त करार करते. देशातील अर्बन नक्षलवादी आणि विचारवंत आपापल्या परीने देशात अशांतता माजवण्याचा, सरकारविरोधी वातावरण निर्माण करण्याचा उघडपणे प्रयत्न करतात. अशा कितीतरी गोष्टी आहेत की ज्या केंद्र सरकारला ठावूक आहेत.

पण अशा देशविरोधी शक्तींविरोधात कारवाईची गरज आहे. तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांच्या विरोधात देशद्रोही खटले भरून त्यांना वठणीवर आणले पाहिजे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### शालेय विद्यार्थी मराठीत अडकले

यावर्षी दहावी बोर्डाचा निकाल लागला. त्यामध्ये मराठी विषयामध्ये ९४ हजार विद्यार्थी अनुत्तीर्ण झालीत. खरोखर हे मराठी माणसाचं दुर्दैव आहे आणि त्या मुलांच्या आई-बापाचं पण दुर्दैव आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला, शाळेमध्ये मराठी सक्ती झाली तरीही मराठीचं मराठीपण शाळेमध्ये कुठे दिसून आलं नाही, विशेष म्हणून पहिलीपासून ते दहावीपर्यंत मराठी विषयाचे जे शिक्षक असतील त्यांनी मराठी विषय चांगला शिकविण्याचा प्रयत्न करावा. सध्या काय होत आहे की बेस्ट फाईव्हमध्ये मराठी विषयात जरी अनुत्तीर्ण असला तरी तो उत्तीर्ण होतो. बेस्ट फाईव्ह जरी असलं तरी बोर्डाने मराठी अनिवार्य ठेवावं असं वाटतं. खरोखर बोर्डाने मराठीसाठी काही नियम करायला हवेत. महाराष्ट्रमध्ये मराठी आपली मातृभाषा असून जर त्या विषयात विद्यार्थी अनुत्तीर्ण होत असतील तर मराठी भाषेला अभिजात दर्जा दिला असून त्याचा काय उपयोग?

**शिरीष बने**/९२२४२९९२३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# अंबाजोगाईत परिचारिकांचे दोन तास काम बंद आंदोलन

## प्रलंबित मागण्यांसाठी शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी



**अंबाजोगाई** | अंबाजोगाई परिचारिका संघटना शाखा लातूर यांच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांसाठी आज अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दोन तास काम बंद आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनाचे नेतृत्व अंबाजोगाई शाखेच्या अध्यक्षा आशा यादव, सचिव कृष्णा शिंदे, यांनी केले. यावेळी संघटनेचे पदाधिकारी, परिचारिका व असंख्य सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शासनाने परिचारिकांच्या विविध मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

परिचारिकांना महागाई भत्ता वेतनवाढ, रिक्त पदांची भरती, संबंधित रुग्णालयातील ओपीडी चिठ्ठी, एक्स-रे एमआरआय आशा संबंधित परिचारिकांना मोफत करण्यात यावे, इतर प्रलंबित मागण्या तातडीने मंजूर करण्याची मागणी केली. “जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल,” असा इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

दोन तासांच्या काम बंद आंदोलनामुळे रुग्णालयातील काही सेवा विस्कळीत झाल्या होत्या. मात्र, अत्यावश्यक सेवा सुरू ठेवण्यात आल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली. रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना काही प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागला.

दरम्यान, परिचारिकांच्या आंदोलनामुळे प्रशासनावर दबाव वाढला असून शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत धानोरा खुर्द ग्रामपंचायतीची तालुकास्तरीय तपासणी



**अंबाजोगाई** | मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत धानोरा खुर्द तालुका अंबाजोगाई या ग्रामपंचायतीची तालुकास्तरीय तपासणी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या तपासणीदरम्यान ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांची तसेच गावातील मूलभूत सुविधांची पाहणी करण्यात आली.

तपासणी पथकाने गावातील स्वच्छता, पाणीपुरवठा व्यवस्था, सांडपाणी व्यवस्थापन, नाली स्वच्छता, हरित उपक्रम, सार्वजनिक सुविधा, परसबाग,व्यायाम शाळा, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, उर्दू शाळा,शौचालय, समशानभूमी आधी ग्रामविकास योजनांची पाहणी अक्कलकोट येथून आलेले गटविकास अधिकारी यांच्या टीमने केली. तपासणीसाठी गटविकास अधिकारी पंचायत समिती अक्कलकोट श्री कविक्के,' विस्तार अधिकारी श्री. माने,श्रीपाटील, श्री. पोतदार या पथकाने धानोरा खुर्द गावाचे तालुकास्तरीय तपासणी केली . तपासणी कामी ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे तालुका अध्यक्ष नितीन धुमाळ सचिव शौलेश शिंदे कृषी अधिकारी प्रवीण मोरे, गडदे, ग्रामपंचायत अधिकारी श्री निकम, मेंगले , सुनील मामडगे , प्रमोद जोगदंड, सरपंच पार्वतीबाई पोळ,सहाय्यक कृषी अधिकारी पंडित काकडे, सूर्यकांत धायगुडे, शिपाई असलम सय्यद,जमालुद्दीन सय्यद, माऊली वाघमारे यांनी सहकार्य केले

यावेळी ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामसेवक, पंचायत समिती अधिकारी तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावाच्या विकासासाठी ग्रामस्थांनी दिलेल्या सहकार्याचेही अधिकाऱ्यांनी विशेष कौतुक केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामुळे ग्रामीण भागातील विकासकामांना गती मिळत असून गावांच्या सर्वांगीण विकासासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्यास 19 मेपर्यंत मुदतवाढ



**बीड** | क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्या वतीने सन 2020-21, 2021-22 आणि 2022-23 या वर्षांकरिता देण्यात येणाऱ्या जिल्हा क्रीडा पुरस्कारांसाठी अर्ज सादर करण्याची मुदत आता 19 मे 2026 पर्यंत वाढविण्यात आली आहे. प्राप्त प्रस्तावांना अत्यल्प प्रतिसाद मिळाल्याने ही मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर यांनी दिली.

जिल्ह्यातील गुणवंत खेळाडू व क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचा गौरव व्हावा तसेच त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने शासनाच्या जिल्हा क्रीडा पुरस्कार नियम 2020 व 2022 नुसार हे पुरस्कार दिले जाणार आहेत. यामध्ये 01 गुणवंत क्रीडा मार्गदर्शक, 01 पुरुष खेळाडू, 01 महिला खेळाडू आणि 01 दिव्यांग खेळाडू अशा एकूण चार पुरस्कारांचा समावेश आहे.

# अधिक मासानिमित्त संत जगमित्र मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन



**परळी वैजनाथ (प्रतिनिधी )** | येथील संत जगमित्र नागा मंदिर येथे अधिक मासानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले असून त्यामध्ये य संत तुकाराम महाराज गाथा पारायण कार्यक्रम होणार आहे. याचा सर्वांनी लाभ घ्यावा.

काकड आरती,विष्णुसहस्रनाम, संत तुकाराम महाराज गाथा पारायण, धोंडे माहात्म्य कथा,तसेच धुपारती आणि हरिकीर्तन सायंकाळी 7ते 9 यावेळेत किर्तने होणार आहेत. ह. भ.प श्री राम महाराज गीते,ह. भ.प श्री विश्वनाथ महाराज घोडके, ह. भ.प श्रीसचिन महाराज गीते, ह. भ.प श्रीगंगाधर महाराज फड, ,ह. भ.प श्री कृष्णा महाराज गुट्टे, ह. भ.प श्रीसंजय महाराज तांबडे, ह. भ.प श्रीश्याम महाराज नेरकर यांचे तर पुजेचे कीर्तन दिनांक 23मे 2026 सकाळी 11ते 1 ह. भ. प.ॲड.दत्तात्रय महाराज आंधळे तर काल्याचे किर्तन दिनांक 24मे 2026 रोजी दुपारी 12ते 2 या वेळेत श्री.ह.भ.प संदिपान महाराज हासेगावकर यांचे होईल . या सप्ताहाचा प्रारंभ दि. 17मे 2026रोजी सकाळी 6वाजता श्री बाजीराव भैया धर्माधिकारी यांच्या हस्ते ग्रंथ पूजन होऊन होईल. या कार्यक्रमाचा लाभ भाविकांनी घ्यावा व संत तुकाराम महाराज गाथा पारायणाला भाविकांनी जास्तीत जास्त भाविकांनी बसावे असे आवाहन संत जगमित्र नागा मंदिर देवल कमिटी व परळी भाविक भक्त मंडळ परळी वैजनाथ तसेच यांनी केले आहे.

# ऊसदरात जयभवानीकडून शेतकऱ्यांची लूट, 3100 रु भाव द्या, अन्यथा आंदोलन करू - बाळराजे पवार



गेवराई - जय भवानी सहकारी साखर कारखान्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पून्हा एकदा फसवले आहे. अन्य कारखान्याने टना मागे तीन हजारांहून अधिकचा भाव दिलेला असतानाही, जय भवानीने मात्र शेतकर्यांना 2775 रू भावाने पैसे दिले आहेत. निवडणूक आली की, शेतकर्यां विषयी खोटी सहानुभूती दाखवायची आणि शेतकर्यांच्या हक्काचे पैसे द्यायची वेळ आल्यावर मात्र आखडता हात घ्यायचा, त्यांची आर्थिक लूट करून दुटप्पी भूमिका घेणाऱ्या माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी शेतकर्यांचा विश्वासघात केला आहे. गेवराई मतदारसंघातील सर्व शेतकर्यांना तीन हजार शंभर रू टनाने रक्कम द्यावी, नसता शेतकर्यांच्या हक्काच्या पैशासाठी जय भवानी सहकारी साखर कारखान्या विरूद्ध आंदोलन करण्यात येईल, असा इशारा भाजपाचे नेते बाळराजे पवार यांनी दिला आहे.

जय भवानी सहकारी साखर कारखान्याने 2775 रू टना प्रमाणे जानेवारी पर्यंतचा पहिला हप्ता शेतकर्यांच्या खात्यावर वर्ग केला आहे. बारामती ॲग्रो, सोलापूर, जालना, अहिल्यानगर जिल्ह्यातील

साखर कारखान्याने शेतकर्यांच्या उसाला टना मागे तीन हजारांहून अधिकचा भाव दिला आहे. जय भवानी सहकारी साखर कारखान्याने जानेवारी नंतर एक पैसाही दिला नाही. केवळ 2775 रू देऊन, शेतकर्यांची नेहमीप्रमाणेच चेष्टा केली असून, पावसाळा तोंडावर आला आहे. शेतीची कामे करून करायला शेतकर्यांच्या हाती पैसा नाही. शेतकर्यांना आतापर्यंत दुसरा हप्ता दिला नाही. निवडणूक काळात मात्र, शेतकर्यांना विषयी कळवळा दाखवून मोठा आव आणायचा, या सगळ्या खोट्या गोष्टी माजी आमदार अमरसिंह पंडितांना तोंडपाठ झाल्या आहेत. त्यांना शेतकर्यांविषयी काही देणे घेणे नाही. जय भवानी कारखान्याने आजवर शेतकर्यांची आर्थिक लूट करून, त्यांचा मानसिक छळ केला आहे. असा आरोप पवार यांनी केला असून, अन्य दहा कारखाने ऊस वाहतूक करून, शेतकर्यांचा ऊस घेऊन जातात. असे असताना ही, सदरील कारखानदार शेतकर्यांच्या ऊसाला चांगला भाव देतात. जय भवानी चे कारखानदार मनमानी करून, मापात पाप करत आहेत. अरेरावी करून शेतकर्यांवर अन्याय करायचा, ही झुंडशाही आहे. यापुढे, अशा झुंडशाही विरूद्ध भारतीय जनता पक्ष शेतकर्यांच्या पाठिशी राहणार असून, पेरणी तोंडावर आलेली असताना

खते, बियाणे, औषधे, मजुरी आणि वीज यांचे दर प्रचंड वाढले आहेत.

# परळीत महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे वीज खंडित; जनता त्रस्त, महादेव गंगणे पाटील यांचा तीव्र संताप



**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)** | शहरात महावितरणच्या (MSEDCL) अत्यंत ढिसाळ आणि भोंगळ कारभारामुळे सातत्याने वीज पुरवठा खंडित होत आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिक, व्यापारी आणि शेतकरी प्रचंड त्रस्त झाले आहेत. या गंभीर समस्येवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे परळी शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून महावितरण प्रशासनाला थेट आंदोलनाचा इशारा दिला आहे.

शहरात कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय दिवसातून अनेक वेळा तासनतास अघोषित वीज पुरवठा खंडित केला जात आहे. कडक उन्हाळ्याच्या दिवसांत वीज गुल होत असल्याने लहान मुले, वृद्ध आणि रुग्णांचे अतोनात हाल होत आहेत. वारंवार वीज जात असल्यामुळे स्थानिक व्यापाऱ्यांचे धंदे कोलमडले असून आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे. अनेक भागांत उघड्या डीपी (DP) आणि लोंबकळणाऱ्या वीज तारा दुरुस्त करण्याकडे महावितरण दुर्लक्ष करत आहे.

महावितरणच्या या मनमानी कारभाराविरोधात बोलताना शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील म्हणाले की, नागरिक जेव्हा तक्रारी घेऊन महावितरण कार्यालयात जातात, तेव्हा जबाबदार अधिकारी जागेवर उपलब्ध नसतात. फोन केले तरी त्यांना योग्य उत्तरे दिली जात नाहीत. "महावितरणने आपला भोंगळ कारभार त्वरित सुधारावा आणि परळीतील वीज पुरवठा सुरळीत करावा. अन्यथा, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या वतीने महावितरण कार्यालयावर तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडण्यात येईल आणि अधिकाऱ्यांना जाब विचारला जाईल" असेही महादेव गंगणे म्हणाले.

# ओम गायकवाडची धर्मादाय निरीक्षक पदी निवड



**बीड** | बीड येथील स्वा. सावरकर महाविद्यालयाचा विद्यार्थी ओम संजय गायकवाड याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षेत देदीप्यमान यश संपादन केले आहे. ओमची धर्मादाय निरीक्षक (Charity Inspector) या पदावर नियुक्ती झाली असून, त्याच्या या यशाबद्दल बीडमधील डॉ. हेडगेवार सार्वजनिक वाचनालयात त्याचा विशेष सत्कार करण्यात आला.

ओम गायकवाड हा गेल्या पाच वर्षांपासून डॉ. हेडगेवार सार्वजनिक वाचनालयात स्पर्धा परीक्षेचा अत्यंत चिकाटीने अभ्यास करत होता. ग्रामीण भागातून येऊन, प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्याने अभ्यासात सातत्य ठेवले. वाचनालयातील शांत आणि समृद्ध वातावरणाचा फायदा घेत त्याने अहोरात्र परिश्रम घेतले. त्याच्या या अथक परिश्रमाचे फळ आज त्याला धर्मादाय निरीक्षक या महत्त्वाच्या पदाच्या रूपाने मिळाले आहे.

या यशाचे कौतुक करण्यासाठी वाचनालय प्रशासनाच्या वतीने एक विशेष गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी वाचनालयाचे कार्यवाह नंदकिशोर झरीकर, कोषाध्यक्ष रवींद्र देशमुख आणि वाचनालयाचे सदस्य प्रा. शशिकांत पसारकर उपस्थित होते. तसेच संतोष जोशी, इंदुलाल सोनवणे, निनाद सोनवणे, पाठक सर आणि बडे सर यांनीही ओमच्या यशाचे कौतुक करून त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या शेवटी वाचनालयाचे ग्रंथपाल रमाकांत शेरकर यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. ओमने मिळवलेले हे यश वाचनालयात अभ्यास करणाऱ्या इतर अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# पंतप्रधान मोदींकडून बजाज समूहाच्या वारशाचा गौरव

## पुढील ५ वर्षांत २ कोटी तरुणांना कौशल्य विकासाशी जोडण्याचे उद्दिष्ट

**बीड / मुंबई , दि. १२ (वृत्तसंस्था)** | भारतीय उद्योजकतेचा कणा आणि विश्वासाचे दुसरे नाव असलेल्या बजाज समूहाने आपल्या व्यवसायाची १०० वर्षे पूर्ण केली आहेत. १४८ अब्ज अमेरिकन डॉलर्सचे मार्केट कॅप असलेल्या या समूहाने केवळ व्यापारच केला नाही, तर भारताच्या स्वातंत्र्यलढ्यापासून ते आधुनिक भारताच्या आर्थिक उत्थानापर्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या ऐतिहासिक प्रसंगी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बजाज परिवाराचे अभिनंदन करताना समूहाच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचा गौरव केला. "कोणत्याही संस्थेसाठी शंभर वर्षांचा प्रवास हा केवळ काळ नसून तो बदलत्या काळाशी जुळवून घेण्याच्या क्षमतेचा पुरावा आहे. बजाज समूहाने केवळ रोजगाराच्या संधी निर्माण केल्या नाहीत, तर नाविन्यपूर्ण संकल्पनांद्वारे देशाला स्वावलंबी बनवण्यात मोठे योगदान दिले आहे," अशा शब्दांत पंतप्रधानांनी आपल्या शुभेच्छा संदेशात भावना व्यक्त केल्या.




तसेच बजाज समूहाने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व (CSR) उपक्रमांतर्गत १० दशलक्षाहून अधिक लाभार्थ्यांचे जीवन उजळले असून, पुढील ५ वर्षांत २ कोटी तरुणांना कौशल्य विकासाशी जोडण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

मुंबईतील नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया येथे आयोजित या दिमाखदार सोहळ्यात उद्योजक, राजकीय नेते आणि सेलिब्रिटींची मांदियाळी जमली होती. १९२६ मध्ये स्वातंत्र्यसेनानी जमनालाल बजाज यांनी मुंबईत या समूहाची मुहूर्तमेढ रोवली होती. महात्मा गांधींचे 'पाचवे मानसपुत्र' मानल्या जाणाऱ्या जमनालालजींच्या तत्त्वांवर आधारित हा समूह आज भारतातील दर तीनपैकी एका घरापर्यंत पोहोचला आहे. १ लाख ३० हजारांहून अधिक कर्मचारी असलेल्या या समूहाने आता आरोग्य क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे.

या सोहळ्यात बजाज समूहाच्या नेतृत्वाने भविष्यातील वाटचालीवर प्रकाश टाकला. बजाज ऑटोचे अध्यक्ष नीरज बजाज म्हणाले की, "बजाज आणि भारताची कथा कधीच वेगळी नव्हती. आमचे संस्थापक जमनालालजींचा 'स्वतःच्या फायद्यापेक्षा समाजहित महत्त्वाचे' हा विचार आजही आमचा मार्गदर्शक आहे. आम्ही 'मेक इन इंडिया'वर तेव्हापासून विश्वास ठेवला जेव्हा तो शब्दही अस्तित्वात नव्हता." याच प्रवासाला जागतिक पातळीवर नेणारे राजीव बजाज यांनी नमूद केले की, आज बजाज केवळ भारतीय कंपनी राहिलेली नाही, तर आफ्रिका ते लॅटिन अमेरिकेपर्यंत १०० हून अधिक देशांत आमची उत्पादने धावत आहेत. पल्सरसारखे ब्रँड आज जागतिक स्पर्धेत आघाडीवर आहेत, हे भारताच्या वाढत्या ताकदीचे प्रतीक आहे.

संजिव बजाज यांनी तंत्रज्ञानाच्या महत्त्वावर भर देताना सांगितले की, पुढील १०० वर्षे ही 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' आणि आर्थिक समावेशनाची असतील. तसेच, शेखर बजाज यांनी समूहाच्या सामाजिक बांधिलकीची आठवण करून दिली. केवळ नफा कमावणे हा उद्देश नसून, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत प्रगती पोहोचवणे हेच बजाज समूहाचे अंतिम ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या शताब्दी सोहळ्यानिमित्त 'कथनी करणी एकसी' हा लघुपट आणि '१०० इयर्स ऑफ बजाज' या विशेष बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले .

**दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई**

मुख्य कार्यालय- मुख्य कार्यालय, बस डेपो शेजारी, परळी-रोड, अंबाजोगाई
फोन क्र. ०२४४६-२४६९२७
ऑफिस पत्ता:- मुख्य कार्यालय, बस डेपो शेजारी, परळी-रोड, अंबाजोगाई
फोन क्र. ०२४४६-२४६९२७

जा.क्र. दीन/मु.का./वसुली/०२/७००२-१२८०/२७/२०२६-२७ दिनांक- १२.०५.२०२६

परिशिष्ट ४ अ
नियम ८ व ९ नुसार

**मालमत्ता विक्रीची सुचना**

विक्री नोटीस (अचल मालमत्ता)

सिक्युरिटायझेशन आणि सुरक्षितीकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकार अंमलबजावणी कायदा २००२ अंतर्गत नियम ८ व ९ नुसार या नोटीसद्वारे सर्वसाधरण लोकास तसेच कर्जदार व सहकर्जदार/गहाणदार व जामीनदार यांना सुचित करण्यात येते की, खालील वर्णन केलेली अचल मालमत्तेचे गहाणखत बँकेच्या नावे कर्जाची परतफेड करण्याची हमी देवुनही **१.कर्जदार** मे. मैत्री एजन्सीज् प्रोप्रा. चैतन्य सुधाकर माने (कर्जदार) **पत्ता:-** अजिंक्यतारा निवास, पिताजी सारडा नगरी, जोगाईवाडी,ता.अंबाजोगाई जि.बीड ४३१ ५१७ **२.जामीनदार** प्रताप योगीराज निकम **पत्ता:-** सायगाव नाका, पोखरी रोड, अंबाजोगाई, जि.बीड ४३१ ५१७ **३.जामीनदार** रणजित अनिल मंगे **पत्ता:-** रेणुका मेडीकल आणि जनरल स्टोअर्स, प्रशांत नगर, अंबाजोगाई, जि. बीड ४३१ ५१७

सदर कर्जदार/गहाणदार यांनी दिनांक **०५.०८.२०२०** रोजी दस्त क्रं.२८४३/२०२० रु.५,००,०००/-(अक्षरी रु.:- पाच लाख रु. फक्त) चे गहाणखत बँकेच्या नावे करुन दिले आहे. निम्न लिखीत **मालमत्तेचा ताबा दिनांक २७.०३.२०२६** रोजी घेतला आहे.

वर नमुद केलेल्या कायद्यांर्तगत नियमानुसार खाली सही करणारे प्राधिकृत अधिकारी, खालील वर्णनाचे गहाण स्थावर मालमत्तेची निविदाद्वारे विक्री करण्याकरीता नोटीस देत आहे. बँकेनी खालील गहाण स्थावर मालमत्ता ज्या ठिकाणी आहे आणि ज्या परिस्थितीत आहे तशीच विक्री करण्याकरिता सिल बंद निविदा मागविण्याचे ठरविले आहे. दिनांक **३०.०४.२०२६** रोजी थकीत रक्कम **रु.६,१७,१२६/-(अक्षरी रु.सहा लाख सतरा हजार एकशे सव्विस रु.)** अधिक पुढील व्याज व इतर खर्च बाकी असलेल्या वसुली करिता निविदा मागविण्यात येत आहे.

ज्या कुणास खालील वर्णन केलेली स्थावर मालमत्ता विकत घ्यावयाची असेल त्यांनी आपली निवीदा प्राधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा-**मुख्यशाखा-अंबाजोगाई** या पत्यावर सिलबंद पाकीटमध्ये अनामत रक्कम राशी रु.५०००/- प्राधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा **मुख्यशाखा-अंबाजोगाई** यांच्या नावे असलेला डिमांड ड्राफ्ट/पे-ऑर्डर जोडुन दिनांक १२.०६.२०२६ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे.

**गहाण मालमत्तेचा तपशील:-**

श्री. चैतन्य सुधाकर माने गहाणदार/कर्जदार यांचे मौजे जोगाईवाडी ता.अंबाजोगाई, जि.बीड येथील घर क्र.५२२७ ज्यांचा प्लॉट क्र.४० (उत्तरबाजु) जागा सर्वे क्र.३३४ क्षेत्रफळ पुर्व-पश्चिम १५ मी. दक्षिण उत्तर पुर्व बाजु २.७० मी. दक्षिण उत्तर पश्चिम बाजु ३.२ मी. एकुण ४४.२५ स्वे.मी. ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:-
**पुर्व:-** प्लॉट क्र.४१
**पश्चिम:-** ९ मी. रस्ता
**दक्षिण:-** संगिता पवार यांचा प्लॉट क्र.४० चा भाग
**उत्तर:-** प्लॉट क्र.३९
(वरील मालमत्ता “जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत”)

**१.मालमत्ता राखीव किंमत रु.७,६५,०००/-(अक्षरी रु.: सात लाख पासष्ट हजार रु फक्त)**

**२.अनामत रक्कम रु.५०००/- (अक्षरी रु.:-**पाच हजार फक्त**).**

**विक्रीच्या शर्ती व अटी:-**

१. इच्छुक खरेदीदारांना कोरे निविदा पत्र रु.१००/- (अक्षरी रु.- शंभर रु. फक्त)अधिक जीएसटी नगदी अथवा डिमांड ड्राफ्ट ने जमा करुन बँकेच्या शाखा-**मुख्यशाखा-अंबाजोगाई** शाखेतुन प्राप्त करता येईल.
२. ईच्छुक खरेदीदारांनी त्यांच्या मोहरबंद निविदा सुरक्षा राशी रु. ५,०००/- (अक्षरी रु.- पाच हजार रु. फक्त) (डिमांड ड्राफ्ट/नगदी स्वरुपात/ACCOUNT TRANSFER/ अधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई या नावाचा) सह बँकेच्या शाखा कार्यालय, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा-**मुख्यशाखा-अंबाजोगाई** येथे दिनांक १२.०६.२०२६ सायं.०५.०० पर्यंत जमा कराव्यात.
३. मोहरबंद निविदा विहीत सुरक्षा राखी रु. ५,०००/- (अक्षरी रु.- पाच हजार रु फक्त) नसल्यास जमा केलेल्या निविदा तात्काळ रद्द करण्यात/समजण्यात येतील.
४. विहीत कालावधीत प्राप्त झालेल्या सर्व मोहरबंद निवीदा दिनांक १५.०६.२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता बँकेच्या शाखा-**मुख्यशाखा-अंबाजोगाई** येथे उघडण्यात येतील.
५. यशस्वी खरेदीदारास बोली रक्कमेच्या २५ टक्के रक्कम तात्काळ बँकेत जमा करावी लागेल व तो/ती/ते तसे न करु शकल्यास इतर सक्षम खरेदीदारास सदर मालमत्ता विकत घेण्याचा अधिकार प्राप्त होईल व अशा खरेदीदारास सुध्दा बोली रक्कमेच्या २५ टक्के रक्कम तात्काळ बँकेत जमा करावी लागेल.
६. जर यशस्वी निवीदा धारकाने निवीदा रक्कमेच्या २५ टक्के रक्कम तात्काळ बँकेत जमा केली नाही तर यशस्वी निवीदा धारकांची अनामत रक्कम जप्त करणे अथवा परत करणे हा अधिकार अधिकृत अधिकारी राखुन ठेवीत आहेत.
७. यशस्वी खरेदीदारास बोली रक्कमेची उर्वरित ७५ टक्के रक्कम त्यापासुन १५ दिवसाचे आत जमा करावी लागेल. जर १५ वा दिवस हा सुट्टीचा दिवस असेल तर त्याच्या दुस-या दिवशी पर्यन्तचा दिवस विहीत कालावधी समजण्यात येईल.
८. सदर मालमत्तेवर इतर कोणत्याही प्रकारचा बोजा, कर, ई. वा इतर देणे बाकी असल्यास त्याची खालील हस्ताक्षराकर्तास कल्पना नाही व अशी सर्व रक्कम यशस्वी खरेदीदारांसच द्यावी लागेल व त्यास खालील हस्ताक्षरकर्ता अधिकारी जबाबदार राहणार नाही.
९. अधिकृत अधिकारी कुठलेही कारण न देता बोली/निविदा स्विकार/अस्विकार करण्याचा तसेच विक्रीची कारवाई तहकुब/स्थगीत रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवीत आहे. या दरम्यान अधिकृत अधिकारी यांच्याकडे भरणा केलेल्या रक्कमेवर कुठलेही व्याज दिले जाणार नाही.
१०. मालमत्ते संदर्भातील चौकशी करीता बँकेच्या शाखा कार्यालय, **मुख्यशाखा-अंबाजोगाई** वेळ सकाळी ११.०० ते संध्याकाळी ०५.०० पर्यंत संपर्क करता येईल तसेच अधिकृत अधिकारी यांना दुरध्वनी क्र. ७६६६५७७९९०० पत्ता शाखा-**मुख्यशाखा-अंबाजोगाई** मो.क्र.९०४९९९८२६८ वर सुध्दा संपर्क साधता येईल.
११. नियमाप्रमाणे विक्रीपत्रा करीता लागणारा मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर सर्व खर्च यशस्वी खरेदीदारास/बोलीकर्त्यासच करावा लागेल.
१२. सदर मालमत्तेवर कर्जदाराचे कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष किवा अप्रत्यक्ष देणे निघाल्यास त्यास बँक जबाबदार राहणार नाही.

स्थळ:- मुख्यशाखा-अंबाजोगाई
दिनांक:-१२.०५.२०२६


अधिकृत अधिकारी,
(सिक्युअर्ड क्रेडीटर)
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई,
मो. ७६६६५७७९९००

# ‘हा प्रामाणिक विद्यार्थ्यांचा नाही तर देशाच्या भविष्याचा पराभव आहे ’ : डॉ राजेश इंगोले

## नीट 2026 परीक्षा रद्द : लाखो विद्यार्थ्यांच्या विश्वासाला तडा, परीक्षा पद्धतीत मूलभूत बदलांची मागणी

**अंबाजोगाई** | नीट 2026 परीक्षा रद्द होणे हा केवळ एका परीक्षेपुरता विषय नाही, तर देशातील लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या विश्वासाला बसलेला मोठा धक्का आहे, अशी भावना सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ राजेश इंगोले यांनी व्यक्त केली आहे.

यावर्षी देशभरातून तब्बल 22.7 लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नीट परीक्षा दिली. 5400 पेक्षा अधिक परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा पार पडली. महाराष्ट्र हा नीटसाठी सर्वाधिक विद्यार्थी देणाऱ्या राज्यांपैकी एक आहे. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान आणि बिहार या चार राज्यांमधूनच देशातील 41% पेक्षा अधिक विद्यार्थी परीक्षेला बसतात. इतक्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांचे भविष्य एका केंद्रीकृत यंत्रणेवर अवलंबून असणे हीच चिंतेची बाब ठरत आहे.



यावेळी डॉ इंगोले यांनी सरकारी भोंगळ कारभारामुळे शासकीय व्यवस्थेचे अक्षरशः धिंडवडे निघाले आहेत असे मत व्यक्त केले.

प्रत्येक विद्यार्थ्याच्या यशामागे वर्षानुवर्षांची मेहनत आहे. अनेकांनी मोबाईल, मनोरंजन, सण, मित्र आणि सामाजिक आयुष्य बाजूला ठेवून फक्त अभ्यासावर लक्ष केंद्रित केले. पालकांनी कर्ज काढले, शेती विकली, बचत खर्च केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शहरात येऊन संघर्ष केला. डॉक्टर होण्याचे स्वप्न हे फक्त करिअर नसून अनेक कुटुंबांच्या आशा आणि आयुष्याशी जोडलेले आहे.

अशा परिस्थितीत परीक्षा प्रक्रियेत गैरप्रकार, पेपर लीक किंवा सुरक्षेतील त्रुटी समोर येतात तेव्हा केवळ परीक्षा रद्द होत नाही, तर गुणवत्तेवरचा विश्वास हादरतो. प्रामाणिक विद्यार्थ्यांना अन्याय सहन करावा लागतो. मानसिक ताण, नैराश्य आणि असुरक्षिततेची भावना वाढते. यां प्रकारामुळे जर विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या तर याला कोण जबाबदार राहतील असा संतप्त सवाल डॉ इंगोले यांनी यावेळी केला.

यावेळी डॉ इंगोले यांनी 2024 मध्येही असाच प्रकार घडला होता तरीही शासकीय यंत्रणा सावध नव्हत्या ही दुर्दैवी बाब आहे.

यावर अधिक भाष्य करताना डॉ इंगोले यांनी 22 लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांसाठी एकाच दिवशी, एकाच पद्धतीने, अत्यंत केंद्रीकृत स्वरूपात परीक्षा घेण्याची सध्याची प्रणाली अधिक जोखमीची ठरत आहे. आता विकेंद्रीकरणाचा गंभीर विचार होणे आवश्यक आहे. राष्ट्रीय गुणवत्ता निकष कायम ठेवून राज्यनिहाय किंवा विभागनिहाय परीक्षा मॉडेल विकसित करणे ही काळाची गरज बनली आहे असे डॉ इंगोले यांनी मत मांडले.

पुढे डॉ इंगोले यांनी “विद्यार्थ्यांना स्पर्धा मान्य आहे. कठोर परिश्रम मान्य आहेत. परंतु व्यवस्थेतील त्रुटींमुळे होणारा हा अन्याय मान्य असू शकत नाही,” अशी स्पष्ट भूमिका मांडली.

देशाच्या आरोग्य व्यवस्थेचे भविष्य आजच्या विद्यार्थ्यांच्या हातात आहे. त्यांचा आत्मविश्वास आणि प्रामाणिकपणा जपणे ही शासन आणि परीक्षा यंत्रणांची सर्वोच्च जबाबदारी आहे. केंद्र शासन आणि एन टी ए यांनी पुनर्परीक्षेची तारीख तातडीने जाहीर करावी. आगामी परीक्षा पूर्ण पारदर्शकता, अभेद्य सुरक्षा आणि शून्य गैरप्रकार या तत्त्वांवर पार पाडली गेली पाहिजे.

कारण प्रामाणिक विद्यार्थ्यांचा पराभव झाला, तर देशाच्या भविष्याचाच पराभव होईल असेही डॉ इंगोले यांनी यावेळी सांगितले.

# हिंगोली-नांदेड परिसरासाठी गॅस सब-लाईन व सिटी गॅस सुविधा देण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ मे**

वाशीम जिल्ह्यातील मालेगाव परिसरातून जाणाऱ्या नैसर्गिक गॅस पाइपलाइनवरून राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ मार्गे हिंगोली - नांदेड परिसरासाठी गॅस सब-लाइन व सिटी गॅस वितरण सुविधा पुरविण्यात यावी अशी मागणी अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, गेल इंडिया लिमिटेड, नवी दिल्ली यांच्याकडे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचे मार्फत आमदार तानाजीराव मुटकुळे यांचे उपस्थित हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र राज्यामध्ये मुंबई-नागपूर नैसर्गिक गॅस पाइपलाइन प्रकल्प समृद्धी महामार्गालगत उभारण्यात आलेला असून वाशीम जिल्ह्यातील मालेगाव परिसर हा या ऊर्जा कॉरिडॉरमध्ये समाविष्ट आहे. मालेगाव-हिंगोली-नांदेड हा राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ वरील महत्त्वाचा औद्योगिक व वाहतूक मार्ग असल्यामुळे या मुख्य पाइपलाइनवरून हिंगोली जिल्ह्यासाठी गॅस सब-लाइन देणे अत्यंत आवश्यक व भविष्यातील विकासासाठी उपयुक्त ठरणार आहे.

हिंगोली जिल्ह्यात वारंगा फाटा परिसरात नांदेड अतिरिक्त चखूउ विकसित होत असून तसेच येलकी परिसरातही हिंगोली अतिरिक्त औद्योगिक क्षेत्र विकसित होण्याच्या प्रक्रियेत आहे. या दोन्ही औद्योगिक क्षेत्रांना नैसर्गिक गॅस उपलब्ध झाल्यास उद्योग विकासाला मोठी चालना मिळेल. स्वच्छ, सुरक्षित व तुलनेने स्वस्त इंधन उपलब्ध झाल्यामुळे नवीन उद्योग गुंतवणूक वाढून स्थानिक युवकांसाठी रोजगार निर्मिती होण्यास मदत होईल.तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ हा भविष्यातील औद्योगिक, वाहतूक व लॉजिस्टिक दृष्टीने महत्त्वाचा कॉरिडॉर बनत असून हिंगोली व नांदेड जिल्ह्यांना गॅस नेटवर्कशी जोडल्यास मराठवाडा विभागाच्या औद्योगिक विकासाला मोठा हातभार लागेल.सदर गॅस सब-लाइन मंजूर झाल्यास हिंगोली व नांदेड जिल्ह्यात सीएनजी स्टेशन उभारणीस चालना मिळेल, घरगुती पीएनजी गॅस सुविधा उपलब्ध होईल, वारंगा फाटा एमआयडीसी व येलकी औद्योगिक क्षेत्राला स्वच्छ व परवडणारे इंधन उपलब्ध होईल, नवीन उद्योग, कोल्ड स्टोरेज, अन्न प्रक्रिया उद्योग व लघुउद्योगांना चालना मिळेल, परिसरातील प्रदूषण कमी होऊन पर्यावरणपूरक विकासास मदत होईल.राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ औद्योगिक ऊर्जा कॉरिडॉर म्हणून विकसित होण्यास मदत मिळेल.

त्यामुळे वाशीम जिल्ह्यातील मालेगाव परिसरातून जाणाऱ्या मुख्य गॅस पाइपलाइन वरून राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ मार्गे हिंगोली-नांदेड जिल्ह्यास गॅस सब-लाइन देण्याबाबत तांत्रिक व प्रशासकीय स्तरावर सकारात्मक कार्यवाही करून हिंगोली जिल्ह्याचा सिटी गॅस वितरण योजनेत समावेश करावा अशी मागणी हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघाने केली आहे. निवेदनावर आ. तान्हाजीराव मुटकुळे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष नंदकिशोर तोष्णीवाल, राज्य उपाध्यक्ष अनिल नैनवाणी, सचिव प्रविण सोनी, नितीन राठौर, गौरव झुनझुनवाला, सिद्धेश धुत, दिलीप बांगर, रमेश पंडित, प्रविण हेडा, विक्की अग्रवाल, शेख शारीक यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कर्मचारी समाधान शिबीर आयोजित करा- जिल्हाधिकारी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ मे**

शासन सेवेत कार्यरत तसेच शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवासंबंधित विविध अडचणी वेळेवर व कार्यक्षमतेने सोडविण्यासाठी हिंगोली जिल्ह्यात विशेष कर्मचारी समाधान शिबिर आयोजित करण्यात येणार असल्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी परिपत्रकाद्वारे दिले आहेत.

वेतन, बढती, बदली, निवृत्तीवेतन, सेवानिवृत्ती उपदान, रजा, सेवापुस्तिका अद्ययावतीकरण, वरिष्ठता आदी सेवाविषयक बाबींसाठी कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना अनेक कार्यालयांमध्ये वारंवार पाठपुरावा करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे. काही किरकोळ कारणांमुळे प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित राहत असल्याने कर्मचारी वर्गाला विभागीय कार्यालय तसेच मंत्रालय स्तरावर अर्ज सादर करण्यासाठी जावे लागत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. या पार्श्वभूमीवर प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी दि. २ मे २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार हिंगोली जिल्ह्यात जिल्हा मुख्यालय तसेच सर्व तालुका मुख्यालयांवर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी कर्मचारी समाधान शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. पहिल्या शुक्रवारी शासकीय सुट्टी असल्यास त्यापूर्वीच्या कार्यालयीन दिवशी शिबिर घेण्यात येईल. जिल्हा मुख्यालयावरील शिबिर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तर तालुका मुख्यालयावरील शिबिर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून संबंधित सर्व विभागांचे जबाबदार अधिकारी उपस्थित राहून कर्मचाऱ्यांच्या अडचणींचे निराकरण करतील. सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांची उपस्थिती अनिवार्य राहणार आहे. अपरिहार्य परिस्थितीत अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील.

या शिबिरात संबंधित तक्रारदार अधिकारी-कर्मचारी तसेच कर्मचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनाही उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात येणार आहे. जिल्हास्तरीय अडचणी जिल्हाधिकारी कार्यालयात, तालुकास्तरीय अडचणी तहसील कार्यालयात तर विभागीय स्तरावरील अडचणी विभागीय आयुक्त कार्यालयातील शिबिरात स्वीकारण्यात येणार आहेत. परिपत्रक निर्गमित झालेल्या दिनांकापर्यंतची तसेच पुढील शिबिरापर्यंत प्राप्त होणारी सर्व प्रलंबित प्रकरणे प्रथम प्राधान्याने निकाली काढण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यासाठी सर्व कार्यालयांनी सेवाविषयक प्रलंबित प्रकरणांची अद्ययावत यादी तयार करून त्यांचा शिबिरामध्ये समावेश करावा, असेही नमूद करण्यात आले आहे.

कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही सेवाविषयक अडचणी प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता घेऊन नियमानुसार तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्ये उच्च प्राधिकरणाची मंजुरी आवश्यक असल्यास निर्धारित कालावधीत प्रस्ताव संबंधित प्राधिकरणाकडे सादर करावेत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रत्येक कार्यालयाने प्राप्त प्रकरणांची नोंदवही अद्ययावत ठेवून तक्रारी निकाली काढेपर्यंत त्यामध्ये नियमित नोंदी कराव्यात. तसेच प्रत्येक महिन्याच्या अखेरीस स्थितीदर्शक अहवाल उपविभागीय कार्यालय, तालुका कार्यालय व इतर कार्यालयांनी पुढील महिन्याच्या २ तारखेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा, असे निर्देशही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले आहेत.

# हिंगोलीत चौथा सर्वधर्मीय विवाह सोहळा संपन्न




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ मे**

शहरातील हिंगोली नगरपालिकेच्या कल्याण मंडपम् येथे संबोधी ॲकडमी महाराष्ट्र, सरस्वती महिला सेवाभावी संस्था व हिंगोली सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने चौथा सर्वधर्मिय विवाह सोहळा संपन्न झाला.या विवाह सोहळ्यात अकरा जोडपी सहभागी होऊन विवाहबद्ध झाली.

हा मंगल परिणय विधी पु.भंते पय्याबोधी महाथेरो (नांदेड) यांच्या हस्ते संपन्न झाला.या विवाह सोहळ्यास अध्यक्ष म्हणून समाजभूषण डॉ.भिमराव हत्तीअंबीरे हे होते, तर प्रमुख पाहुणेनगरपालिकेचे गटनेते श्रीराम बांगर, काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष सुरेशआप्पा सराफ, माजी नगरसेवक अनिल नेनवानी, शहर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष मिलिंद उबाळे, नगरसेवक रविंद्र वाढे, वंचित बहुजन आघाडी जिल्हाध्यक्ष योगेश नरवाडे, भिम शक्तीचे जिल्हाध्यक्ष तथा हिंगोली जिल्हा काँग्रेस रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे जिल्हाध्यक्ष विशाल इंगोले, ॲड. दिपक धांडे, भीमराव पतंगे, भगवान जगताप, शेषेराव जल्हारे, बाबुराव गवळी, एल.आर.कांबळे, रोहिदास साखरे, बाळासाहेब कीर्तने, शशिकांत हत्तीअंबिरे, बंडू नरवाडे, अक्षय इंगोले, आदी मान्यवर उपस्थित होते.

विवाह सोहळ्यास उपस्थित प्रमुख पाहुणे यांचा सत्कार सरस्वती महिला सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा, आयोजिका सौ.तारा खंदारे व आनंद खंदारे यांनी केला.विवाह सोहळा यशस्वी होण्यासाठी सचिन कूरवाडे, यश इंगोले, कूलदिप इंगळे, प्रकाश पंडित, रोहन नेतने, नामदेव कदम, गौतम श्रावणे, मुन्ना इंगोले, शंकर पोघे, सुनिताताई आवटे आदींनी परिश्रम घेतले.

# हिंगोली जिल्ह्यासाठी १४ व १५ मे रोजी यलो अलर्ट जारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ मे**

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी मंगळवार (दि.१२) रोजी दिलेल्या सूचनेनुसार हिंगोली जिल्ह्यासाठी दिनांक १४ व १५ मे २०२६ या कालावधीत यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या कालावधीत जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्माघाताची शक्यता अधिक असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित यंत्रणांनी तसेच नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, आजारी व्यक्ती तसेच स्थूल व्यक्तींनी उष्णतेपासून बचावासाठी विशेष काळजी घ्यावी, असे प्रशासनाने नमूद केले आहे.

तहान नसली तरी पुरेशा प्रमाणात पाणी पिणे आवश्यक आहे. अपस्मार, हृदयरोग, मूत्रपिंड किंवा यकृतविषयक आजार असलेल्या व्यक्तींनी डॉक्टरांच्या सल्ल्यानेच द्रवपदार्थ घ्यावेत. ओआरएस, लस्सी, भाताची पेज, लिंबूपाणी, ताक, नारळपाणी यांसारखे द्रवपदार्थ सेवन करावेत. हलक्या रंगाचे, सैलसर व सुती कपडे वापरावेत. घराबाहेर जाताना डोके झाकावे, टोपी, छत्री व गॉगलचा वापर करावा. त्वचेच्या संरक्षणासाठी सनस्क्रीनचा वापर करावा. अतिउष्णतेचा त्रास होण्याची शक्यता असलेल्या व्यक्तींवर विशेष लक्ष ठेवावे. विशेषतः दुपारी १२ ते ३ या वेळेत उन्हात जाणे व श्रमाची कामे करणे टाळावे. अनवाणी बाहेर फिरू नये. अतिउष्णतेच्या काळात स्वयंपाक करताना स्वयंपाकघर हवेशीर राहील याची काळजी घ्यावी. दारू, चहा, कॉफी व शीतपेये यांचे सेवन टाळावे, कारण त्यामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते. जास्त मीठ, तिखट, तेलकट तसेच उच्च प्रथिनयुक्त अन्नपदार्थ टाळावेत. शिळे अन्न सेवन करू नये. उभ्या असलेल्या चारचाकी वाहनात लहान मुले किंवा प्राणी ठेवू नयेत. अनावश्यक उष्णता निर्माण करणारे चमकदार दिवे किंवा बल्बचा वापर टाळावा. नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून स्वतःची व कुटुंबीयांची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### मुरघास संयंत्र वाटप योजना, पशुपालकांना संधी

हिंगोली- पशुसंवर्धन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून पशुपालकांना स्वावलंबी व उद्योजक बनविण्याच्या उद्देशाने शासनामार्फत मुरघास संयंत्र वाटप योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पशुपालकांना मुरघास हार्वेस्टर व बेलर संयंत्र खरेदीसाठी भरघोस अनुदान देण्यात येणार असून, पात्र पशुपालक तसेच शेतकरी समुहगटांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना एकाच वेळी चार ओळी हार्वेस्ट करणारे मुरघास हार्वेस्टर व मुरघास बेलर संयंत्र उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या उपकरणाची किंमत मर्यादा २६ लाख रुपये निश्चित करण्यात आली असून, सर्वसाधारण प्रवर्गासाठी ५० टक्के अनुदान (कमाल रु. १३ लाख) तर अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गासाठी ७५ टक्के अनुदान (कमाल रु. १९.५० लाख) देण्यात येणार आहे.

### अवैध वाळू वाहतुक करणारा टिप्पर पकडला



हिंगोली- स्थानिक गुन्हे शाखेचे पथक वसमत परिसरात रात्री पेट्रोलिंग करीत असतांना चिखली फाटा येथे टिप्पर थांबविले. त्यानंतर चालक संतोष चांगदेव नरवाडे रा ढऊळगाव ता वसमत याला विचारपूस केली. टिप्परमध्ये ५ ब्रास वाळू अंदाजे किंमत २५ हजार आढळून आली. पथकाने त्याच्याकडे वाळू वाहतुकीचा परवाना, पावती, इन्व्हाईस बाबत विचारपूस केली असता काहीही आढळले नाही. टिप्परचा मालक उध्दव जगताप रा हट्टा याच्या सांगण्यावरून पूर्णा नदीपात्रातून वाळू वाहतुक करीत असल्याचे सांगितले. पथकाने संबंधित तलाठी गजानन नागोरे व मंडळ अधिकारी सुशिला पांचाळ यांना बोलावून पंचनामा केला असता अवैध रेती वाहतुक केल्याचे स्पष्ट झाले. या पथकामध्ये स्थागुशाचे पोनि मोहन भोसले, उपनि माधव जिव्हारे, अंमलदार विक्की कुंदनानी, विशाल खंडागळे, किशोर सावंत, टी पी कासले, आजम प्यारेवाले यांचा समावेश होता. पथकाने सदरील टिप्पर हट्टा पोलिस ठाण्यात जमा केले असून टिप्परसह २५ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी चालक संतोष नरवाडे, मालक उध्दव जगताप यांच्याविरूध्द महसूल अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ६२ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६२ वाहन चालकांविरूध्द पोलिस विभागाच्यावतीने कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून ६९ हजार ७०० रूपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

# हिंगोली वैद्यकीय महाविद्यायात परिचारीका सप्ताह उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ मे**

वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय हिंगोली येथे दिनांक ५ मे २०२६ ते दिनांक १२ मे २०२६ हा परिचारिका सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या सप्ताहामध्ये परिचारिकांच्या सुप्त गुणांना पुढे आणण्यासाठी एक संधी दिले जाते. यामध्ये विविध प्रकारचे खेळ, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मोठ्या संख्येने परिचारीकांनी सहभाग नोंदवला. सप्ताहाची सुरूवात रोज फ्लॉरेज नाईटिंगेल यांचे प्रतिमा पूजन व प्रतिज्ञा तसेच दिपप्रज्वलन करून करण्यात आली. या सप्ताहाचा समारोप म्हणून सर्व रुग्णांना फळवाटप करण्यात आले.

या कार्यक्रमांमध्ये अधिष्ठाता डॉ चक्रधर मुंगल, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ नितीन तडस, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ दीपक मोरे, डॉ गोपाल कदम, डॉ सचिन बोधगिरे, डॉ नितीन, डॉ विशाल पवार, पुरोहित, मेट्रन बाळासाहेब चिंचकर, सहाय्यक अधिसेविका रागिनी जोशी, सहायक अधिसेविका आशा क्षीरसागर, सर्वपरिसेविका सर्व अधिपरिचारिका सर्व ब्रदर्स सर्व विद्यार्थी मित्र मैत्रिणी उपस्थित होत्या

# राजदरी येथे रानभाज्या महोत्सव



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ मे**

उगम ग्रामीण विकास संस्था आणि टेब टेब्बा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राजदरी, ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली येथे रानभाज्या महोत्सव संपन्न झाला.

आमदरी, सोनवाडी, पिंपळदरी आणि राजदरी या आदिवासी पट्ट्यातील गावांमध्ये पारंपारिक विविध पिकांच्या वाणांचे जतन व संवर्धन प्रकल्पांतर्गत दि ११ रोजी रानभाज्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या महोत्सवामध्ये गावांतील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.महिलांनी परंपरागत रानभाज्या, त्या बनवण्याचे तंत्र तसेच विविध पाककृती सर्वांना सांगितल्या व स्वतः बनवून आणल्या होत्या. रानभाज्या महोत्सवामध्ये आमदरी, राजदरी, सोनवाडी आणि पिंपळदरी या चार गावांमधील एकूण २५ महिलांचा सहभाग होता. उत्कृष्ट भाजी व पाककृती सादर करणाऱ्या निवडक महिलांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

तत्पूर्वी रानभाज्यांचे महत्त्व व आरोग्याविषयी कार्यक्रम समन्वयक धनंजय पडघन यांनी मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रम व्यवस्थापक विकास कांबळे यांनी रानभाज्यांची आवश्यकता, पूर्वीचे व सध्याचे आरोग्य यातील फरक, बदलत गेलेली शेती पद्धत, जमिनीची धूप तसेच रासायनिक खतांच्या दुष्परिणामांविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राम खंदारे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ओमकार भालेराव, चांदोजी लाखाडे आणि ज्ञानेश्वर दळवी यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमास टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचे विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच गावातील सुमारे ४० ग्रामस्थ उपस्थित होते.

# सांदीपनी पब्लीक स्कूलचा सलग १८ वर्षापासून दहावीचा निकाल शंभर टक्के



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ मे**

सांदीपनी पब्लिक स्कूल, सुनिल नगर, तरोडा (बु.), नांदेड यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा २०२६ मध्ये पुन्हा एकदा आपली परंपरा कायम ठेवत सलग १८ वर्षे १००% निकाल लावण्यात यश मिळाले आहे. या वर्षी एकूण ९८ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी विशेष प्राविण्यासह ६९ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत २४ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणीत ४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या निकालाने शाळेची शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत अधोरेखित झाली आहे.

दहावीच्या परीक्षेत यावर्षी प्रथम क्रमांक वेदांत पांडुरंग नाईक ९७.२०%, द्वितीय कु. सोनाक्षी अनिल राठोड ९६.६०%, तृतीय कु. अद्रिती संतोष नांदुरकर ९५.८०%, चतुर्थ क्रमांक कु. संचिता नारायण देशमुख ९५.२०% गुण मिळविले आहेत.

या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ. रेश्मा विपुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड, मुख्याध्यापिका सौ क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेखाले, समन्वयक केदार शर्मा सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक कौतुक करून त्यांना अभिनंदन केले. या निकालाने शाळेची शैक्षणिक परंपरा अधिक उज्ज्वल झाली असून विद्यार्थ्यांच्या भावी शैक्षणिक प्रगतीसाठी सर्वांनी शुभेच्छा दिल्या. शाळेच्या सातत्यपूर्ण यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत,पालकांचा विश्वास आणि व्यवस्थापनाचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व हे घटक महत्त्वाचे ठरले आहेत.

# दिव्यांगांचा निधी गायब... अधिकारी मात्र मस्त

## इस्लापूर ग्रामपंचायतीला 'अदृश्य शक्ती'चे संरक्षण?

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १३ मे-**

दिव्यांगांच्या हक्कासाठी शासनाकडून राखीव ठेवण्यात येणारा ५ टक्के निधी गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेला असल्याचा गंभीर आरोप इस्लापूर ग्रामपंचायतीवर होत असून, या प्रकरणी वारंवार तक्रारी, निवेदने आणि वृत्तपत्रांमधून बातम्या प्रसिद्ध होऊनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे आता गावात उघडपणे चर्चा सुरू झाली असून, ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना नेमकं कोणाचं अभेद्य संरक्षण आहे? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, सामान्य नागरिकाने कर अथवा इतर शासकीय देयक थकविल्यास प्रशासन तत्काळ कारवाईसाठी पुढे सरसावते; मात्र दिव्यांग बांधवांच्या हक्काचा निधी सहा-सहा वर्षे प्रलंबित राहूनही संबंधित अधिकारी आणि प्रशासनाकडून कोणतीही स्पष्ट भूमिका घेतली जात नसल्याने संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दिव्यांग लाभार्थ्यांनी अनेक वेळा ग्रामपंचायत कार्यालयात अर्ज, निवेदने आणि लेखी तक्रारी सादर केल्याचे सांगितले जाते. अनेकांनी कार्यालयाच्या वारंवार चकरा मारूनही त्यांना प्रक्रिया सुरू आहे, वर पाठविले आहे, लवकरच निर्णय होईल अशीच ठरलेली उत्तरे मिळत असल्याचा आरोप केला आहे. यामुळे लाभार्थ्यांमध्ये संतापाचे वातावरण असून, काहींनी उपरोधिक प्रतिक्रिया देताना



आमच्या अर्जांनाच ग्रामपंचायतीत कायमस्वरूपी मुक्काम मिळाला असावा, अशी खंत व्यक्त केली.

दरम्यान, दिव्यांग निधीचा नेमका वापर कशासाठी करण्यात आला, निधी खर्चास मंजुरी कोणी दिली, निधी दुसऱ्या कामांकडे वळविण्यात आला का, तसेच संबंधित आर्थिक व्यवहारांचा तपशील काय, याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, निधीचा हिशोब मागितल्यावर फाईलींची धूळ झटकली जाते; मात्र ठोस उत्तर दिले जात नाही.

गावात या प्रकरणावरून आता उपरोधिक चर्चा रंगू लागली आहे. दिव्यांगांचा निधी शोधण्यासाठी स्वतंत्र शोधमोहीम राबवावी लागेल का? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. काही ग्रामस्थांनी तर ग्रामपंचायत कार्यालयाबाहेर 'हरवले आहे ५ टक्के दिव्यांग निधी' अशी पाटी लावण्याची वेळ आली आहे, असा टोला लगावला.

सामाजिक कार्यकर्त्यांनीही प्रशासनावर जोरदार टीका केली असून, शासनाच्या योजना फलकांवर झळकत आहेत; मात्र प्रत्यक्ष लाभार्थी अजूनही प्रतीक्षेत आहेत, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

दरम्यान, नागरिकांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून मागील सहा वर्षांचा आर्थिक हिशोब सार्वजनिक करावा, निधी वितरणाबाबत पारदर्शकता ठेवावी आणि दोषींवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

एकूणच, इस्लापूर ग्रामपंचायतीतील हा प्रकार आता केवळ निष्काळजीपणाचा विषय राहिलेला नसून, प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरत आहे. आता तरी संबंधित यंत्रणा जागी होऊन दिव्यांग बांधवांना न्याय देणार की पुन्हा एखाद्या नव्या तक्रारीची वाट पाहणार, याकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे.

**दिव्यांग बांधवांच्या अधिकारांवर अन्याय : दिनेश जयस्वाल**

दिव्यांगांच्या हक्काच्या निधीबाबत प्रशासनाची भूमिका अत्यंत गंभीर आणि संशयास्पद वाटते. सहा वर्षांपासून निधी रखडणे ही केवळ निष्काळजीपणा नसून दिव्यांग बांधवांच्या अधिकारांवर अन्याय आहे. शासनाच्या योजना केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच थकीत निधी तात्काळ लाभार्थ्यांना वितरित करण्यात यावा, अशी मागणी किनवट तालुका संपर्कप्रमुख दिनेश जयस्वाल यांनी केली.

# जिल्हाधिकाऱ्यांची अर्धापूर तहसील कार्यालयास भेट

## विविध विभागांच्या कामकाजाची केली पाहणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ मे-**

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सोमवारी (दि. १२ मे) अर्धापूर तहसील कार्यालयास अचानक भेट देत विविध विभागांच्या कामकाजाची सविस्तर पाहणी केली. यावेळी त्यांनी महसूल विभागासह पंचायत समिती, गट विकास अधिकारी कार्यालय, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, रोजगार हमी योजना विभाग, पुरवठा विभाग, उपकोषागार कार्यालय आणि भूमि अभिलेख कार्यालयाला भेटी देऊन कामकाजाचा आढावा घेतला.

तहसील कार्यालयात त्यांनी महसूल विभागातील सर्व कार्यासनांना भेट देत प्रत्येक विभागाच्या जाबचार्टची तपासणी केली. तसेच 'आरटीएस' अंतर्गत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवांची पडताळणी करून प्रलंबित प्रकरणे नसल्याची खात्री केली. अभिलेख कक्षालाही भेट देऊन अभिलेखांच्या नक्कल वितरण प्रक्रियेची पाहणी केली व कामकाज अधिक सुलभ आणि प्रभावी करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

यावेळी तहसील कार्यालयाच्या सभागृहात शासकीय जमिनींच्या अभिलेख पडताळणीसाठी विशेष शिबिर सुरू होते. नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि कर्मचारी विविध गटांच्या नोंदींची पडताळणी करत होते. जिल्हाधिकाऱ्यांनी या कामाचा आढावा घेत उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांना



मार्गदर्शन केले. तसेच तहसील कार्यालयाच्या एकूण कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले.

त्यानंतर पंचायत समिती कार्यालयात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल योजनांची माहिती घेतली. शासकीय जमिनींवर निवासी प्रयोजनासाठी झालेल्या अतिक्रमणांच्या याद्या तयार करण्यात आल्या आहेत का, याबाबतही त्यांनी विचारणा केली. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) विभागाच्या कामांची माहिती घेऊन अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

याशिवाय उपकोषागार कार्यालय, भूमि अभिलेख कार्यालय आणि पुरवठा विभागाचीही पाहणी करण्यात आली. पुरवठा विभागाकडून इष्टांकासंदर्भातील माहिती घेऊन आवश्यक सूचना देण्यात आल्या.

इ या पाहणी दौऱ्यावेळी तहसीलदार रेणूकादास देवणीकर, नायब तहसीलदार राजेंद्र शिंदे, आश्विनी केंद्रे, अव्वल कारकून विश्वंभर सोळंके यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### जिल्हा परिषदेतील १३१ कर्मचाऱ्यांच्या बदल्या

**नांदेड** -शासन निर्णयानुसार नवीन जनगणना अधिनियम १९४८ व जनगणना नियम १९९० अंतर्गत जनगणना कार्य सुरळीतपणे पार पाडण्यासाठी जनगणना कामाशी संबंधित जिल्हा परिषदेतील गट क व गट ड संवर्गातील कर्मचारी वगळता नांदेड जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन, कृषी व आरोग्य विभागातील विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदली प्रक्रिया समुपदेशन पद्धतीने पार पडल्या.

### पत्रकार गंगाधर गंगासागरे यांना 'महाराष्ट्र भूषण जीवन गौरव पुरस्कार' जाहीर

**नरसी** -नायगाव तालुका डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष तथा नरसी येथील ज्येष्ठ, धाडसी व निर्भीड पत्रकार गंगाधर एम. गंगासागरे यांना महात्मा कबीर समता परिषद यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय



प्रतिष्ठेचा महाराष्ट्र भूषण जीवन गौरव पुरस्कार २०२६ जाहीर झाला आहे. त्यांच्या पत्रकारिता, सामाजिक बांधिलकी आणि बहुजन समाजातील प्रबोधनपर कार्याची दखल घेत हा मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आल्याने पत्रकारिता क्षेत्रासह सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. गंगाधर गंगासागरे यांनी मागील दोन दशकांहून अधिक काळ पत्रकारितेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडले. समाजातील दुर्लक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने लेखणी चालवली. सत्य, न्याय आणि समाजहित जपत त्यांनी निर्भीड पत्रकारितेची परंपरा कायम राखली आहे. पत्रकारितेबरोबरच सामाजिक, शैक्षणिक आणि बहुजन चळवळीमध्येही त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला असून सामाजिक ऐक्य, समता आणि जनजागृतीसाठी त्यांनी अनेक उपक्रम राबविले आहेत. महात्मा कबीर समता परिषद यांच्या निवड समितीने गंगाधर गंगासागरे यांच्या दीर्घकालीन सामाजिक व पत्रकारितेतील योगदानाची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली. सदर पुरस्कार वितरण सोहळा नांदेड येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत लवकरच संपन्न होणार असल्याची माहिती संयोजन समितीने निवडपत्राद्वारे दिली आहे. गंगाधर गंगासागरे यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल भाजपाचे नेते श्रावण पाटील भिलवंडे, जेष्ठ पत्रकार गोविंद नरसीकर, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते, विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच मित्रपरिवार व चाहत्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त स्कूल बॅग वाटप

**नांदेड** -वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त वंचित बहुजन आघाडीचे नांदेड उत्तर युवा जिल्हाध्यक्ष आकाश जोंधळे यांच्या वतीने सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. तरोडा (बू.) प्रभाग क्रमांक २ मधील वैशाली नगर परिसरातील लहान विद्यार्थ्यांना शालेय स्कूल बॅगांचे वाटप करण्यात आले. तसेच महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांना साड्यांचे वितरण करून त्यांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या नगरसेविका तथा स्थायी समिती सदस्या सुनिताताई रूपकराव जोंधळे, वंचित बहुजन आघाडीचे राज्य सदस्य अविनाश भोसीकर, जिल्हाध्यक्ष राज अटकोरे, जिल्हासचिव विनोद वाघमारे, नगरसेवक प्रतिनिधी आकाश रूपकराव जोंधळे, सामाजिक कार्यकर्ते महेंद्र पवळे, संजय कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून पालकांनीही समाधान व्यक्त केले. सामाजिक बांधिलकी जपत गरजू नागरिकांसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे.

### जैविक निविष्ठा निर्मिती महिला प्रशिक्षण कार्यक्रम

**नांदेड** -दि. १२ मे रोजी कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी नांदेड व मोहीम यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे सुगाव बुद्रुक ता. नांदेड येथे महिला बचत गटांसाठी जैविक निविष्ठा निर्मिती प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आली होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन कृषी विज्ञान केंद्राचे पीक संरक्षण तज्ज्ञ प्रा. माणिक कल्याणकर व महिला विकास महामंडळाचे विभागीय सल्लागार संदीप मराठे यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी नांदेडकडून जैविक निविष्ठा प्रशिक्षण कार्यक्रम माध्यमातून महिलांना जीवामृत व दशपर्णी अर्क बनवण्याचे प्रात्यक्षिक देण्यात आले. शेतीचा उत्पादन खर्च कमी करणे, जमिनीचे आरोग्य सुधारणे आणि विषमुक्त अन्नाचे उत्पादन घेणे. स्वतःच्या शेतात उपलब्ध साहित्यापासून तयार जैविक खतांमुळे जमिनीतील सूक्ष्मजीवांची संख्या वाढते आणि सेंद्रिय पदार्थांचे विघटन जलद होते. जैविक खतांच्या वापरामुळे धान्य, फुले आणि फळांचे भरघोस आणि दर्जेदार उत्पादन मिळते. सूक्ष्मजीव आणि गांडुळांसारख्या सजीवांना जिवंत ठेवून मातीचे आरोग्य सुधारते, असे प्रा. माणिक कल्याणकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले. यानंतर जीवामृत व दशपर्णी अर्क निर्मितीचे प्रात्यक्षिक प्रशिक्षणार्थींना करून दाखवण्यात आले. यावेळी कृषी विस्तारतज्ज्ञ डॉ. अमिता क्षत्रिय यांनी नैसर्गिक शेतीचा प्रसार व शासकीय योजनाचा लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन केले. गृहविज्ञान तज्ज्ञ प्रा. सौ. अलका पवळे यांनी महिलांना आरोग्यासाठी विषमुक्त अन्नाचे आहारातील महत्त्व व त्यासाठी परसबागेची लागवड याविषयी सखोल मार्गदर्शन केले. सेंद्रिय शेतीचे आहारतील महत्त्व या बाबत अलका पवळे यांनी सांगितले.

# तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या कायम समावेशनासाठी आमदार भीमराव केराम यांना निवेदन

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १३ मे-**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत कार्यरत शहर स्तरीय तांत्रिक तज्ञ कर्मचारी संघटनेच्या शिष्टमंडळाने किनवट-माहूरचे आमदार भीमराव केराम यांची भेट घेऊन म्हाडा व नगरविकास विभागामध्ये नवीन तांत्रिक संवर्ग निर्माण करून PMY-CLTC कर्मचाऱ्यांचे कायमस्वरूपी समावेशन करण्याची मागणी केली.

संघटनेच्या प्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत राज्यातील विविध महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायतींमध्ये कार्यरत तांत्रिक तज्ञ मागील ७ ते ८ वर्षांपासून सातत्याने सेवा देत आहेत. घरकुल योजनांचे प्रकल्प अहवाल तयार करणे, तांत्रिक मान्यता, जिओ-टॅगिंग तसेच लाभार्थ्यांपर्यंत योजनेचा लाभ पोहोचवण्यात या कर्मचाऱ्यांचा महत्त्वाचा वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले.

म्हाडाच्या वाढत्या कामकाजासाठी अनुभवी तांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता असून CLTC कर्मचाऱ्यांकडे आवश्यक कौशल्य असल्यामुळे स्वतंत्र 'स्पेशल टेक्निकल



कॅडर' तयार करून त्यात समाविष्ट करावे, अशी मागणी करण्यात आली. तसेच अनेक कर्मचाऱ्यांची इतर शासकीय भरतीसाठीची वयोमर्यादा संपल्याने त्यांच्या सेवेचा विचार करून सामाजिक न्यायाच्या दृष्टीने निर्णय घ्यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले.

यावेळी जिल्हाध्यक्ष मोहम्मद अहसान, उपाध्यक्ष जितेंद्र पाटील, मोहम्मद जुबेद, गजानन गादणे, समीर कुरेशी, माधव क्षीरसागर, सय्यद शारेख, राहुल पाटील, प्रसाद कदम, राहुल सातूरवार, विशाल ढोरे, सोमेश देसाई, संतोष पवार आदी उपस्थित होते.

संघटनेचे राज्याध्यक्ष विशाल बेडगे यांनी शासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करून तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# प्रधानमंत्र्यांच्या आवाहनाला प्रतिसाद; अमरनाथ यात्रेकरूंची राष्ट्रहिताची शपथ

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ मे-**

अमरनाथ यात्री संघाच्या वतीने आज सकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली इंधन बचत, स्वदेशीचा वापर, अनावश्यक खर्च टाळणे तसेच देशहित जपण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली. विशेष म्हणजे, भारतात सर्वप्रथम असा उपक्रम नांदेड येथे राबविण्यात आला.

अमरनाथ यात्रा अत्यंत अवघड व खडतर असल्याने यात्रेकरूंना शारीरिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी गेल्या २६ वर्षांपासून सलग तीन महिने दररोज सकाळी नियमित वॉकिंग, ओपन जिममधील व्यायाम तसेच प्राणायाम घेतला जात आहे. शरीरासोबत मनही प्रसन्न राहावे यासाठी दररोज विनोद सांगण्याचाही उपक्रम राबविला जात असून त्यामुळे वातावरणात उत्साह व सकारात्मकता निर्माण होत आहे.यावर्षी यात्रेकरूंची संख्या वाढल्यामुळे ३ व १७ जुलै रोजी दोन वेगवेगळे जथ्थे अमरनाथ यात्रेसाठी रवाना होणार आहेत. संपूर्ण भारतात फक्त नांदेड येथेच यात्रेकरूंची अशा प्रकारे पूर्वतयारी केली जाते, असे



आयोजकांनी सांगितले.

बुधवारी सकाळी झालेल्या कार्यक्रमात सुभाष देवकत्ते यांनी चालण्याचे महत्त्व विषद केले. संजय चौधरी यांनी ऑनलाईन बुकिंगविषयी माहिती दिली. छाया चौधरी यांनी भजन सादर केले, तर साईप्रसाद हळदे यांनी ओपन जिमचे फायदे समजावून सांगितले. प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या राजश्री हुरणे यांचा सत्कार जयश्री ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी दिलीप ठाकूर यांनी उपस्थितांकडून सामूहिक शपथ वदवून घेतली. प्रसंगी मंदाकिनी सुरनर, गौरी व साईप्रसाद देवकत्ते, शर्मिला व प्रशांत होट्टे, वंदना व हनुमानसिंह चौहान, सुचित्रा व प्रल्हादराव नवघरे, कैलाश महाराज वैष्णव, संगीता व प्रशांत जोशी, अन्नपूर्णा व श्यामराव खराणे, सलोना व विजयसिंह चव्हाण, छायाबाई व अशोक दालपे, शोभा व नारायण चव्हाण, राधा व किशन चव्हाण, श्रीकांत अकोलकर, नंदा व भारत चव्हाण, गंगामणी व बजरंग खंदारे, भाग्यश्री व नामदेव पांचाळ, मीरा व जयप्रकाश येवले, मीना व विश्वनाथ झुंजारे तसेच मेधा व रणजीत धर्मापुरीकर यांनी देश प्रथम ही भावना जपत राष्ट्रहितासाठी सदैव कार्यरत राहण्याची ग्वाही दिली.

यात्रेकरूंमध्ये मोठा उत्साह दिसून येत असून निरोगी शरीर, सकारात्मक मन आणि राष्ट्रभक्तीची भावना या त्रिसूत्रीवर विशेष भर दिला जात आहे.

# हिंदु खाटीक समाजाची लातूर येथे मराठवाड्याची बैठक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ मे-**

दिनांक ९ में २०२६ रोजी मराठवाड्यातील हिंदु खाटीक समाजाची बैठक डॉ भालचंद्र ब्लड बँक लातूर येथे अँड व्यंकटराव बेंद्रे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती

या बैठकीस प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा डॉ प्रशांत जी बनसोडे डॉ गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स पुणे यांची उपस्थिती होती.

बैठकीचे सुरुवातीस अध्यक्ष अँड व्यंकटराव बेंद्रे, प्रमुख मार्गदर्शक डॉ प्रशांत बनसोडे यांचे शाल, श्रीफळ , बुके देऊन स्वागत करण्यात आले.

अध्यक्षीय मनोगतात अँड व्यंकटराव बेंद्रे यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील विविध भागात खाटीक समाजास विविध स्थानिक नावाने ओळखले जाते जसे मराठवाड्यात कलाल, खाटीक कलाल, तर उर्वरित भागात क्षत्रिय खाटीक, मराठा खाटीक, धनगर खाटीक, लाड खाटीक, सूर्यवंशी खाटीक, बक्कर कसाब (तत्कालीन उर्दू फसली भाषेत) ही सामाजिक ओळख अशिक्षित पणामुळे व अश्यपृश्यता टाळण्यासाठी जात लपविली जात असत जे मूळ मांस विक्रीचा व्यवसाय करणारे रक्त नातेसंबधीत एकमेकांचे नातेवाईक आहेत चुकीच्या नोंदीमुळे गोरगरीब समाजबांधवांना जात प्रमाणपत्र,वैधता प्रमाणपत्र मिळण्याची अडचण दूर व्हावी म्हणून हा लढा सुरू केला त्यात माझे सहकारी स्व अशोक पेंढारी,विनोद गायकवाड, स्व.रत्नाकर लाड आदीनी सहकार्य केले तो लढा पुढे घेऊन जावयाचे आहे हे समाज ऋण फेडण्यासाठी हा लढा सुरू असून त्यात सर्वांनी सहकार्य करण्याची विनंती केली आहे. तर या बैठकीस प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शक म्हणून लाभलेले डॉ प्रशांत बनसोडे यांनी खाटीक जातीचे निकषांच्या आधारावर योग्य संशोधन होऊन सर्व समावेशक सर्वांना न्याय मिळण्यासाठी योग्य ते महसुली, शैक्षणिक पुरावे व माहिती उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे

# मयंकच्या वाढदिवसाला 'ज्ञानदानाचा' स्पर्श! वही-पेन वाटप व गुणवंतांचा विशेष सन्मान

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १३ मे-**

आजच्या स्पर्धेच्या आणि दिखाव्याच्या युगात वाढदिवस साजरे करण्याची पद्धत बदलत असताना, देगलूर तालुक्यातील कुशावाडी येथील दै. तरुण भारत पत्रकार मिलिंद वाघमारे यांनी आपला मुलगा मयंक वाघमारे यांच्या तृतीय वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप व गुणवंतांचा गौरव करीत सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. या स्तुत्य उपक्रमातून वाघमारे यांनी वाढदिवसाला सामाजिक जाणीवेची जोड देत एक आगळावेगळा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

सध्या वाढदिवस म्हटले की, केक, सजावट, जल्लोष आणि बॅनरबाजी हे चित्र सर्रास पहावयास मिळते. परंतु मिलिंद वाघमारे यांनी आपला मुलगा मयंक याच्या वाढदिवसानिमित्त गावातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना वही व पेनचे वाटप करून शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा उपक्रम राबविला आहे. केवळ वाढदिवस साजरा न करता समाजासाठी काहीतरी देण्याची भावना जपली पाहिजे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमात विशेष उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला. राष्ट्रीय धावपटू स्पर्धेत सहभाग



नोंदवणारी शिवानी सायलू रॅपनवाड आणि दहावीच्या परीक्षेत ९० टक्के गुण प्राप्त करणारी सौंदर्या विठ्ठल चंद्रे या विद्यार्थिनींचा पालकांसह मान्यवरांच्या हस्ते शाल पुष्पहार आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करताना उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे अभिनंदन केले.

या कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध, सम्राट अशोक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माता रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून करण्यात आले. सामाजिक समता, शिक्षण आणि प्रेरणा यांचा सुंदर संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला. यावेळी भाजपाचे जिल्हा चिटणीस अनिल पाटील खानापूरकर, काँग्रेस पक्षाचे जिल्हा प्रवक्ते कैलास येसगे, शिवसेनेचे जिल्हाउपप्रमुख महेश पाटील आदीं मान्यवरांची प्रमुख उपस्थित होती.

यावेळी भाजपा जिल्हा चिटणीस अनिल पाटील खानापूरकर म्हणाले की, वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करुन वाघमारे परिवारानी अनोख्या पद्धतीने वाढदिवस साजरा केला असून अशा उपक्रमांमुळे शैक्षणिक चळवळ सक्रिय होत असते, असे सांगितले. तर काँग्रेस जिल्हा प्रवक्ते कैलास येसगे यांनी या स्तुत्य उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. यावेळी येसगे म्हणाले की, तरुण पत्रकार मिलिंद वाघमारे यांनी आपल्या बातम्यांचा माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासली पण घरगुती आणि वाढदिवसासारख्या कार्यक्रमात सामाजिक जाणिवेचे भान ठेवत एक नवा आदर्श निर्माण केला आहे, असे येसगे म्हणाले. यावेळी उपस्थित असलेले शिवसेनेचे (उबाठा) जिल्हाउपप्रमुख महेश पाटील यांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. वाढदिवस हा केवळ आनंदाचा दिवस नसून समाजाशी नाते जोडण्याची संधी आहे, हे पत्रकार मिलिंद वाघमारे यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. त्यामुळे कुशावाडीतील हा वाढदिवस सोहळा गावकऱ्यांसाठी चर्चेचा आणि प्रेरणेचा विषय ठरला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजित माळगोंडे यांनी केले. तर प्रास्ताविक मिलिंद वाघमारे यांनी केले. यावेळी जळगाव विद्यापीठाचे सेवानिवृत्त कुलपती वाय.डी. वाघमारे भाजपा तालुका चिटणीस देविदास वाघमारे, सुनंदा वाघमारे, पत्रकार भिमराव दिपके, माजी सरपंच जयसिंग पाटील कोसंबे, माजी सरपंच राहुबाई कांबळे, कृ.उ.बा्.समितीचे माजी संचालक रणजित हिंगोले, मुख्याध्यापक सुभाष हिंगोले, जाधव सर, सहशिक्षक तानाजी हिंगोले, सहशिक्षक अभिजित माळगोंडे, मारोती कोसंबे, नबिसाब शेख, कपिल वाघमारे, महेश नरभागे, चंद्रकांत कांबळे, शिवानंद वाघमारे, विलास माळगोंडे, यांच्यासह अनेक मान्यंवर उपस्थित होते. तसेच मयंकचे आजोबा खंडू वाघमारे, आजी रमाबाई वाघमारे, काका दिलीप वाघमारे, उपसरपंच रोहिणी दिलीप वाघमारे, विकास वाघमारे तसेच आई-वडील कोमल व मिलिंद वाघमारे यांच्या उपस्थितीत वाढदिवसाचा सोहळा उत्साहात पार पडला.

# लातूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व
बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.**


## ■ महासाधना सप्ताह उपक्रमात लातूर मनपा राज्यात द्वितीय ■

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ मे : भारत सरकारच्या 'मिशन कर्मयोगी' अंतर्गत राबविण्यात आलेल्या महासाधना सप्ताह (२ मे ते १० मे २०२६) दरम्यान लातूर शहर महानगरपालिकेने संपूर्ण महाराष्ट्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. २५० ते १४९९ कर्मचारी, अधिकारी नोंदणी असलेल्या १०१ कार्यालयांच्या गटात लातूर मनपाने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

या दैदीप्यमान यशाबद्दल दि. ८ मे रोजी, मुंबई येथील मंत्रालय मुख्य इमारतीतील त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित टेक वारी २.० या विशेष कार्यक्रमात लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी यांचा विशेष सन्मान करण्यात आला. साधना सप्ताह २०२६ हा उपक्रम सरकारी कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करून प्रशासकीय कामात गुणात्मक सुधारणा करण्याच्या उद्देशाने राबवण्यात आला. यामध्ये देशातील ९३ हून अधिक केंद्रीय मंत्रालये, सर्व राज्ये आणि २०० हून अधिक प्रशिक्षण संस्थांनी सहभाग नोंदवला होता. या जागतिक स्तरावरील स्पर्धेत लातूर मनपाने आपले स्थान अधोरेखित केले आहे. या यशाबद्दल बोलताना आयुक्त श्रीमती मानसी आणि उपायुक्त पंजाब खानसोळे यांनी आनंद व्यक्त केला.

या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावणारे सिस्टिम मॅनेजर (ई-प्रशासन) प्रवीण इंगळे व त्यांच्या चमूच्या परिश्रमाबद्दल आयुक्तांनी समाधान व्यक्त करून त्यांचे विशेष कौतुक केले.



## शिवसेनेतर्फे गाव तेथे शाखा, घर तेथे शिवसैनिक अभियान



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ मे : आगामी काळात गाव तेथे शाखा व घर तेथे शिवसैनिक हे अभियान लातूर शहर मतदारसंघात राबविण्यात येणार असून लातूर शहर मतदार संघात शिवसेनेची बांधणी भक्कमपणे करून येथे सेनेला चांगले दिवस आणून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू, असे प्रतिपादन शिवसेना तालुकाप्रमुख बाबुराव शेळके यांनी

लातूर येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना केले.

यावेळी शिवसेनेची सोमनाथ स्वामी डिगोळकर, लातूर शहरप्रमुख मोहन दिवटे, शिवसेना पदाधिकारी संतोष पाटील, बाळासाहेब दंडिमे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना शेळके म्हणाले की, येणाऱ्या काळामध्ये शिवसेनेची पाळामुळे घराघरापर्यंत पोहोचले पाहिजेत आणि शिवसेना मोठ्या

प्रमाणात वाढली पाहिजे यासाठी जीवांचे रान करून शिवसेनेचा भगवा झेंडा आगामी काळात लातूर शहर महापालिका व लातूर शहर विधानसभेत फडकावण्याचा मानस आहे. तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी लातूर शहरात प्रभावीपणे कार्य करू यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत अशी माहिती मोहन दिवटे यांनी यावेळी पत्रकारांना दिली.

# नीट पेपर फुटी प्रकरणाचे लातुरात तीव्र पडसाद

## प्रकरणाचा 'खरा' सूत्रधार लागणार का पोलिसांच्या गळाला ? पालकांचे लक्ष

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १३ मे : नीट ( NEET ) पेपर फुटीच्या अनुषंगाने लातुरातही एका पालकाने या प्रकरणात लातूर शहरातील एका खाजगी शिकवणी क्लासेसचा समावेश असल्याची शक्यता पोलीस अधीक्षकांना दिलेल्या तक्रार अर्जामध्ये नमूद केली आहे. त्यानंतर या प्रकरणाचेतीव्र पडसाद लातूर शहर व परिसरात उमटत आहेत. यापूर्वीहीएकदा अशाचबाबीवरूनलातूरच्या खाजगी शिकवणी वर्गांकडे संशयाने पहिले गेल्याचे सर्वज्ञात आहे. त्यामुळे नाही म्हटले तरी अशा घोटाळ्याशी लातूरमधील काही मंडळींचा कमी - अधिक प्रमाणात वाटा आहे, असे म्हटल्यास ते फारसे चुकीचे होणार नाही. त्यामुळे किमान आगामी काळात तरी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या अशा स्वार्थी प्रवृत्तीचा ' खरा ' सूत्रधार पोलिसांच्या गळाला लागणार का ? असा प्रश्न पालक आणि विद्यार्थ्यांमधून उपस्थित केला जात आहे.

लातूर पॅटर्नचागवगवा झाल्यानंराज्यातून तसेच राज्याबाहेरूनहीविद्यार्थ्यांचा लोंढा लातूरच्या शिक्षण क्षेत्राकडे वाढला होता. मागच्या काही वर्षात कनिष्ठ महाविद्यालयांच्या तुलनेत लातूरच्या खाजगी शिकवणी क्लासेसचे प्रस्थबऱ्यापैकी वाढल्याचे पाहायला मिळाले. एखाद्या नामांकित शिकवणी वर्गात प्रवेश घेतला की, नाममात्र अकरावी बारावीसाठी कोणत्याही मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालयातप्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मागच्या काळात चांगलीच वाढल्याचे दिसून येत आहे. फक्त शाळा सोडल्याचा दाखला आवश्यक आहे, म्हणून सहा ठिकाणी प्रवेश घेतला जात आहे, हे कोणालाही कळण्यासारखी बाब आहे. तरीही स्वतःला सुजाण, सुशिक्षित म्हणून घेणारे पालकही आपल्या मुलांना अशा दर्जाचा नामशेष नसलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश येऊन खाजगी शिकवणी वर्ग परब वेळ करायला भाग पाडत असत. आजही हे परिस्थिती कायम आहे. लातूर शहर व परिसरात कार्यरत अकरावी बारावीच्या अनेक कनिष्ठ महाविद्यालयांची अवस्था अतिशय बिकट आहे. तरीही त्यांना खाजगी शिकवणी वर्गांमुळेविद्यार्थी मिळतात, असे दिसून येते.

लातूरच्या काही बड्या खाजगी शिकवणी वर्गांच्या संचालकांचे लागेबांधे अगदी वरपर्यंत असल्याची चर्चा नेहमीच पालकांतून , विद्यार्थ्यांतून ऐकायला मिळते. लातूरचे काही बडे शिकवणी संचालक मध्यंतरीहीअशा प्रकरणात अडकल्याची चर्चा ऐकावयास आली होती. शिक्षण क्षेत्रात वाढलेलामोठ्या प्रमाणावरील भ्रष्टाचार अशा बाबींना कारणीभूत असल्याचे आता सामान्यांचीहीलक्षात येताना दिसत आहे. आपल्याकडे पैसा टाकल्यास काहीही अशक्य नाही,अशा मनोवृत्तीच्या मंडळींची संख्या खूप वाढताना दिसत आहे. त्यातूनचस्वार्थाला प्राधान्य देणारी मंडळी कोणत्याही स्तराला जात असल्याचे निदर्शनास येते. त्यातून नीट सारख्या राष्ट्रीय पातळीवरील परीक्षेतही चुकीच्या पध्दती , पायंडे पाडण्याचा प्रयत्न काही मंडळींकडून केला जात असल्याचे आढळून येत आहे. शिक्षण क्षेत्रात लातूरची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. लातूरमध्येचएका खाजगी शिकवणी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थिनीच्या पालकाने पोलीस अधीक्षकांना प्रत्यक्ष भेटून तक्रार दिलीय की, छएएढ(णत्रः)-२०२६ चा पेपर होण्यापूर्वी लातूर येथील एका क्लासेसने एक मॉक टेस्ट पेपर त्यांच्या क्लासेसच्या विद्यार्थ्यांना दिला. त्या पेपरमधून ४२ प्रश्न हे छएएढ(णत्रः)-२०२६ या पेपर मध्ये जशाच्या तसे आलेले होते. NEET(UG)-२०२६ ही झालेली परीक्षा पेपर फुटी मुळे शासनाने रद्द केली आहे. त्याअनुषंगाने लातूर येथील क्लासेसचा या पेपर फुटीच्या प्रकरणांमध्ये समावेश असल्याची शक्यता तक्रारी मध्ये नमूद केले आहे. तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर यांना सदर अर्जाच्या अनुषंगाने त्वरित चौकशी करून दोषी विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

शिक्षण क्षेत्रात वाढत चाललेल्या चुकीच्या प्रथा बंद होणे आवश्यक आहे. विद्यार्थी या परीक्षेसाठी रात्रंदिवस परिश्रम करत असतात. त्यात मध्येचअशा चुकीच्या गोष्टींमुळे पुनः परीक्षा घेतली जाणार आहे. त्यात विद्यार्थ्यांचे सर्व श्रम वाया गेले, विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवरहीत्याचा परिणाम होऊ शकतो. या प्रकरणी वरिष्ठ पातळीवरील तपास यंत्रणा खऱ्या सूत्रधाराच्या शोध घेणारच आहेत. त्यांना अन्य ठिकाणाहूनही काही साथीदार सहकार्य करत असतील तर त्यांनाही संबंधित ठिकाणचेपोलीस प्रशासन निश्चित ताब्यात घेणार आहेत. भविष्यात असे प्रकार घडता कामा नये साठीही सर्वतोपरी उपाययोजना कार्यान्वित होणे आवश्यक असल्याच्या प्रतिक्रिया पालकांतून व्यक्त होत आहेत.

# ऊर्जा संकटात सरकार बनले ढाल



होर्मुज मार्ग बंद झाल्यामुळे जग ऊर्जा संकटाच्या आगीत होरपळत आहे. मोदी सरकारने आपल्या चातुर्याने या संकटाची झळ जनतेपर्यंत पोहोचू दिली नाही, स्वतः भार उचलला. भारतात सर्व कामे नेहमीप्रमाणे सुरळीत पार पडली. जनतेलाही संयम राखून देशाची साथ द्यावी लागेल. जागतिक युद्ध आणि होर्मुज संकटाचा परिणाम आज संपूर्ण जग अनुभवत आहे.

युध्दाच्या झळा केवळ सीमेपुरत्या मर्यादित नाहीत, तर त्यांचा परिणाम प्रत्येक घराच्या स्वयंपाकघरापर्यंत, प्रत्येक वाहनाच्या चाकापर्यंत आणि प्रत्येक कुटुंबाच्या बजेटपर्यंत पोहोचला आहे. अनेक देशांमध्ये पेट्रोल-डिझेलच्या किमती इतिहासातील सर्वोच्च पातळीवर पोहोचल्या आहेत, पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा लागल्या आहेत, महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे आणि सरकारे आपल्या नागरिकांच्या रोषाला सामोरे जाण्यास भाग पडली आहेत.

परंतु याच उलथापालथीच्या दरम्यान, आज युध्द सुरू होऊन साधारण ११ आठवडे उलटल्यानंतरही भारतात जीवनाची गती सामान्य राहिली, करोडो कुटुंबांच्या चुली पेटत राहिल्या, वाहने चालत राहिली. हे आपोआप घडले नाही. यामागे असे एक धोरण, अशी तयारी आणि असा संवेदनशील विचार होता ज्याने जागतिक वादळासमोर भारतीय नागरिकांना ढालीप्रमाणे संरक्षण दिले. जेव्हा जग ऊर्जा संकटाच्या आगीत होरपळत होते, तेव्हा मोदी सरकार एका पालकाप्रमाणे आपल्या नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. ज्याप्रमाणे द्वापर युगात भगवान श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत उचलून ब्रजवासीयांचे रक्षण केले होते, त्याचप्रमाणे या कठीण काळात सरकारने वाढत्या जागतिक किमतींचा आणि आर्थिक दबावाचा मोठा हिस्सा स्वतःवर घेतला, जेणेकरून त्याचा भार थेट जनतेच्या ताटापर्यंत, स्वयंपाकघरापर्यंत आणि खिशापर्यंत पोहोचू नये.

हेच कारण आहे की आज हे संकट केवळ आर्थिक व्यवस्थापनाची कथा राहिलेली नाही, तर संवेदनशील शासन, दूरदर्शी नेतृत्व आणि नागरिकांप्रती असलेल्या जबाबदारीचे उदाहरण बनले आहे. जगभरातील वाढत्या किमतींचे ओझे थेट जनतेवर टाकणे हा सर्वात सोपा मार्ग होता आणि अनेक देशांनी तसेच केले, परंतु भारताने हा मार्ग निवडला नाही. मोदी सरकारने स्वतः प्रचंड आर्थिक दबाव सोसला जेणेकरुन सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरावर आणि दैनंदिन जीवनावर कमीत कमी परिणाम व्हावा. सरकारने पेट्रोलवर साधारण २४ रुपये प्रति लिटर आणि डिझेलवर ३० रुपये प्रति लिटर इतका भार सहन केला. २८ फेब्रुवारीनंतर जागतिक स्तरावर पेट्रोल-डिझेलच्या किंमतीत प्रचंड वाढ नोंदवली गेली. युरोप आणि आशियातील अनेक देशांमध्ये पेट्रोल ३० ते ३५ टक्क्यांनी महाग झाले, तर भारतात कोणताही बदल केला गेला नाही. हाँगकाँगमध्ये आज पेट्रोल सर्वात महाग आहे. तिथे एका लिटरची किंमत सुमारे २९५ रुपयांवर पोहोचली आहे, जी २८ फेब्रुवारीनंतर २५ टक्क्यांनी वाढली आहे. सिंगापूरमध्ये दर ३० टक्क्यांनी वाढून सुमारे २४० रुपये प्रति लिटर झाला आहे. नेदरलँड्समध्ये पेट्रोल २२५ रुपये प्रति लिटरवर पोहोचले आहे, जी २८ टक्क्यांची वाढ आहे. युध्दग्रस्त इस्रायलमध्ये पेट्रोल ३० टक्क्यांनी महाग होऊन १८५ रुपये प्रति लिटरवर पोहोचले आहे. दुसरीकडे, भारतात अजूनही पेट्रोलची किंमत ९५ रुपये प्रति लिटर आहे.

दररोज सुमारे १,००० कोटी रुपयांचा तोटा सहन करणे ही साधी गोष्ट नाही. आतापर्यंत सुमारे ६८,००० कोटी रुपयांचा भार सरकार आणि तेल कंपन्यांनी स्वतःवर घेतला आहे. हा आकडा त्या संवेदनशील विचाराचा पुरावा आहे, ज्यामध्ये मोदी सरकारने आधी नागरिकांची काळजी केली आणि नंतर स्वतःच्या तिजोरीची. विचार करा, जर हे संकट कोणत्याही तयारीशिवाय आले असते तर काय परिस्थिती झाली असती? स्वयंपाकाचा गॅस महाग झाला असता, वाहतूक खर्च वाढला असता, महागाई प्रत्येक घरापर्यंत पोहोचली असती आणि मध्यमवर्गापासून गरिबांपर्यंत सर्वांचेच बजेट कोलमडले असते.

परंतु २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर परिस्थिती बदलू लागली. गेल्या काही वर्षांत ऊर्जा सुरक्षेबाबत जी दूरगामी तयारी करण्यात आली, तीच आज देशाची ढाल बनून उभी आहे. तेल साठे तयार करण्यात आले, इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण वाढवण्यात आले, पर्यायी इंधन नेटवर्क विकसित झाले आणि रिफायनिंग क्षमतेचा विस्तार सुरू झाला. पर्यायी इंधनाच्या माध्यमातून एलपीजीची मागणी दररोज ७० ते ७५ हजार टनांनी कमी करण्यात आली. हे केवळ म्हणूनच शक्य झाले कारण पीएनजी, रॉकेल, इंधन तेल आणि बायोमासची पर्यायी पायाभूत सुविधा संकटापूर्वीच तयार होती. जपान आणि दक्षिण कोरियानंतर भारत हा एकमेव असा देश आहे जो ३० दिवसांच्या एलपीजी साठ्याची योजना आखत आहे.

या युध्दामुळे निर्माण झालेल्या संकटावरून हे दिसून येते की, ही आपली आजची गरज आहे. आज भारताकडे ५.३३ दशलक्ष टनाचा धोरणात्मक (S>RTATEGIB) तेल साठा आहे आणि दुसर्या टप्प्यांतर्गत चंडीखोल, पादुर आणि बिकानेरमध्ये अतिरिक्त साठवणूक क्षमता तयार केली जात आहे. ह्या केवळ योजना नसून देशवासियांना भविष्यातील संकटांपासून सुरक्षित ठेवण्याची ही तयारी आहे. इथेनॉल मिश्रणाच्या धोरणानेही या कठीण काळात देशाला मोठा दिलासा दिला आहे. २० टक्के मिश्रणामुळे भारत परकीय चलनाची मोठी बचत करू शकत आहे. संकटाच्या काळात पर्यायी इंधन व्यवस्थेद्वारे एलपीजीच्या मागणीत दररोज ७० ते ७५ हजार टनांपर्यंत घट करण्यात आली. ही पावले दर्शवतात की, सरकारने केवळ आजसाठीच नव्हे, तर येणार्या वर्षांसाठीही सुरक्षेचा मार्ग तयार केला आहे.

युध्द अजूनही सुरूच आहे. येणाऱ्या काळात कठीण निर्णय घ्यावे लागू शकतात. परंतु देशाने हे विसरता कामा नये की, जेव्हा पूर्ण जग दबावाखाली होते, तेव्हा भारत सरकारने आपल्या नागरिकांना एकटे सोडले नाही. सरकारने एका पालकाप्रमाणे आपली जबाबदारी निभावली. सरकारे केवळ योजना आणि घोषणांनी मोठी होत नाहीत, तर कठीण काळात आपल्या लोकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्याने मोठी होतात. जागतिक संकटाच्या काळात भारताने हे करून दाखवले आहे.

हेच कारण आहे की आज देशाचा सामान्य नागरिक केवळ दिलासाच अनुभवत नाहीये, तर त्याच्या मनात हा विश्वासही दृढ झाला आहे की संकट कितीही मोठे असले तरी देश त्याच्या पाठीशी उभा आहे. तरीही, हे संकट अद्याप पूर्णपणे टळलेले नाही. काळाची गरज ही सुध्दा आहे की देशातील नागरिकांनीही येणाऱ्या आव्हानांबाबत सजग, संयमित आणि तयार राहावे. ऊर्जा काटकसरीने वापरणे हे नागरिकांचे कर्तव्य आहे. जागतिक संकटात ढाल बनलेल्या भारत सरकारला धैर्याने साथ द्या.

# 'होर्मुज'च्या धगीत सरकारच्या 'मायेची सावली'




स्ट्रेट ऑफ होर्मुज बंद झाल्यामुळे देशाच्या सरकारला दररोज १००० कोटी रुपयांचे नुकसान सोसावे लागत आहे. मोदी सरकारच्या दूरदृष्टीमुळे सर्व घरांमध्ये चुली पेटत राहिल्या आणि वाहने धावत राहिली. परिस्थिती पाहता ऊर्जा संकट वाढण्याची शक्यता आहे. जनतेची समज आणि सहकार्यच सरकारला या संकटाशी लढण्याचे बळ देईल.

घर-कुटुंब असो वा कोणताही देश, आकस्मिक आपत्ती कोणावरही आणि कधीही येऊ शकते. गेल्या काही दिवसांत इराण आणि अमेरिका यांच्यातील युध्दामुळे 'होर्मुज'ची सामुद्रधुनी (S>RTAIT OF H}$RMRY) बंद झाली, ज्यामुळे जहाजांची ये-जा थांबली. युध्दाच्या सुरुवातीच्या काळात असे वाटले होते की, तेल आणि वायूच्या टंचाईमुळे सर्वत्र हाहाकार माजेल, परंतु भारतात तसे झाले नाही. सर्व घरांमध्ये चुली पेटत राहिल्या, वाहने चालत राहिली आणि मुलांचे शिक्षणही सुव्यवस्थितपणे सुरु राहिले. हे सर्व केवळ म्हणूनच शक्य झाले कारण आपला कुटुंबप्रमुख, आपला रक्षक जबाबदार आणि दूरदर्शी आहे.

केंद्र सरकारने कुशल नेतृत्वाखाली या संकटाच्या काळात आपल्या बुध्दिमत्तेचा परिचय देत वाढत्या किंमतींचे ओझे स्वतःवरच मर्यादित ठेवले आणि जनतेला त्या त्रासाची झळ पोहचू दिली नाही. वास्तविकता अशी आहे की, आपल्या तेल कंपन्यांना दररोज १,००० कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागत आहे. थोडक्यात सांगायचे तर, या युध्दामुळे सरकारला ६८,००० कोटी रुपयांचे प्रचंड नुकसान झाले आहे. युध्दाचा भार आपल्या तेल साठ्यांवरही पडत असून, त्यांची पातळी सतत खाली जात आहे आणि ती टिकवून ठेवण्यासाठी गुंतवणुकीची आवश्यकता भासत आहे. या सर्वांचा परिणाम सरकारच्या केंद्रीय उत्पादन शुल्कावरही (CENRTAL EWBIRE) होत आहे. म्हणजेच तीन वेगवेगळ्या दिशांनी भारताला आर्थिक फटका बसत आहे.

नागरी कर्तव्य आणि सरकारी संवेदनशीलता : मोठ्या नुकसानीमुळे खालावणारी अर्थव्यवस्था वेळेत सुधारणे आवश्यक आहे आणि त्यासाठी सरकारसोबतच प्रत्येक नागरिकाने आपले उत्तरदायित्व समजून घेणे गरजेचे आहे. अशा कठीण काळात, जेव्हा आर्थिक झळ प्रत्येक घरापर्यंत पोहोचली असती आणि वाहने उभी राहण्याची वेळ आली असती, तेव्हा कोणत्याही सरकारसाठी हा आर्थिक भार जनतेवर टाकून मोकळे होणे सोपे होते. परंतु, संवेदनशील केंद्र सरकारने केवळ जनतेला दिलासाच दिला नाही, तर आपल्या धोरणात्मक कौशल्याने जनतेला अशी छत्रछाया दिली, ज्यामुळे सर्वसामान्यांचे जीवन विस्कळीत होण्यापासून वाचले. युध्द न थांबल्यामुळे जागतिक ऊर्जा संकट सतत वाढत आहे आणि होर्मुजचा मार्ग मोकळा होण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, भविष्यात युध्दविराम झाला तरी परिस्थिती सावरण्यासाठी किमान चार महिने लागतील, ज्यामुळे तेल आणि वायूचे दर दीर्घकाळ उच्च पातळीवर राहू शकतात. परंतु युध्दाच्या या अकराव्या आठवड्यात सरकारने अवलंबलेले सध्याचे मॉडेल जर पुढे नेले, तर त्याचे विपरित परिणाम आपल्या अर्थव्यवस्थेवर होऊ लागतील.

आपल्यासमोर असलेली तीन मोठी आव्हाने : या परिस्थितीत आपल्यासमोर प्रामुख्याने तीन आव्हाने आहेत. तेल साठा (S>RTATEGIB R>ERERVER) भारताचा तेल साठा आज ५.३३ दशलक्ष टन आहे, जो सुमारे दोन आठवड्यांची गरज पूर्ण करू शकतो. आयईए (खए-) मानक ९० दिवसांचे आहे. चंडीखोल, पादुर आणि बिकानेरमध्ये ६.५ दशलक्ष टनांचा दुसरा टप्पा बांधकामाधीन आहे, जो जलद गतीने पूर्ण करावा लागेल. तसेच, जपान आणि दक्षिण कोरियानंतर भारत हा ३० दिवसांच्या एलपीजी (L>PG$) साठ्याची योजना आखणारा एकमेव देश आहे. रिफायनिंग आणि घरगुती उत्पादन: आपल्याला आपली रिफायनिंग क्षमता वाढवावी लागेल. यासाठी आधीच पावले उचलली गेली आहेत. नुमालीगड, जिथे ३४,००० कोटी रुपये खर्चून ३ ते ९ एमएमटीपीए (MMT>P-) विस्तार होत आहे, तो वेळेपूर्वी कार्यान्वित करावा लागेल. बाडमेरचा प्लांट आता सुरू झाला आहे. तसेच घरगुती कच्च्या तेलाचे उत्पादन, जे आज मागणीच्या केवळ १२ टक्के आहे, ते वाढवावे लागेल.

इथेनॉल ब्लेंडिंग : आज २० टक्के इथेनॉल मिश्रण करून देश १.५ लाख कोटींहून अधिक परकीय चलन वाचवू शकत आहे. या कठीण काळात पर्यायी इंधनाद्वारे एलपीजीची मागणी दररोज ७० ते ७५ हजार टनांनी कमी केली जात आहे. तज्ज्ञांच्या मते, हे केवळ पीएनजी (PN>G$), रॉकेल, इंधन तेल आणि बायोगॅसची पर्यायी व्यवस्था संकट येण्यापूर्वीच तयार असल्याने शक्य झाले आहे.

निष्कर्ष : या क्षेत्रातील संशोधकांचे असे मानणे आहे की, आजच्या तुलनेत येणारा काळ अधिक कठीण असेल. तेव्हा आपल्याला या संकटकाळात केलेल्या खर्चातून सावरण्यासोबतच भविष्यात आपल्याला बळकटी देणार्या योजनांमध्ये गुंतवणूकही करावी लागेल.जागतिक संकटाच्या या काळात जेव्हा जवळपास सर्वच देशांत पेट्रोलचे दर वाढले, श्रीलंका आणि पाकिस्तानमध्ये चार दिवसांचा कामाचा आठवडा करण्यात आला, फिलिपिन्समध्ये राष्ट्रीय ऊर्जा आणीबाणी लागू करण्यात आली, तेव्हा भारतात जनजीवन सामान्य राहिले. भारतात ना इंधनाचे रेशनिंग झाले, ना 'वर्क फ्रॉम होम'ची सक्ती झाली, ना शाळा बंद झाल्या आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पेट्रोलचे दरही वाढले नाहीत. हे करून दाखवणे सोपे नव्हते, परंतु आपल्या पंतप्रधानांच्या कुशल नेतृत्वाखाली वर्तमान सरकारने शिवाप्रमाणे युद्धाचे सर्व विष (गरल) स्वतः प्राशन केले. आपल्या नागरिकांनाही हे समजून घ्यावे लागेल की ही सुखाची स्थिती कायम राहणार नाही. बदलत्या काळानुसार आपल्याला आपली कार्यपद्धती बदलावी लागेल. जनतेचे सहकार्य आणि समज हीच ती किल्ली आहे जी आपल्याला येणार्या संकटांशी लढण्याचे बळ देईल.